**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९१९
निर्णय दिनांक : १७.०३.२०१०

१. श्री. शेख बाबा मकबूल, : अपिलार्थी
रा.दशमीगव्हाण,ता. जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत दशमीगव्हाण,ता.जि.अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, अहमदनगर

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (तां.),
पंचायत समिती, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे १५.०६.२००९ रोजीचे दिनांक १९.१२.२००९ रोजी फेरसादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून चुकीची व उडवाउडवीची माहिती मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौ. दशमीगव्हाण या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रामध्ये सन २००५ ते २००९ या कालावधीतील दारिद्रयरेषेखालील व्यक्तींची संख्या व यादी, ते केव्हापासून दारिद्रयरेषेखाली आहेत, तसेच श्री.शेख बाबा मकबूल हे दारिद्रयरेषेमध्ये आहेत की नाहीत, याची सर्टीफाईड प्रत, ज्या

व्यक्ती दारिद्रयरेषेखालील आहेत, त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींच्या नावावरील मालमत्ता, त्यांच्या कुटुंबियांपैकी कोणी अथवा स्वतः नोकरीस किंवा कोणत्या पदावर पदाधिकारी आहेत, असल्यास त्यांचा खुलासा, अशी माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १६.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०४.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २८.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन व या पत्रासोबत दारिद्रयरेषेखालील व्यक्तींच्या मालमत्तेच्या उताऱ्यांच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य पुरवून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. अशाप्रकारे अपिलार्थीस जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त होऊनही ती चुकीची व अपूर्ण असल्याच्या कारणास्तव अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी दि. १६.०४.२००९ रोजी व्यक्तिशः व २८.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे, अशा दोन टप्प्यात माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात दारिद्रयरेषेखालील व्यक्तींची यादी व त्यांच्याकडील मालमत्तेसंदर्भात काही माहिती मागितली होती. ग्रामपंचायत

पातळीवर ग्रामस्थांच्या मालमत्तेचे उतारे नमुना क्रमांक ८ मध्ये जतन करुन ठेवण्यात येत असतात. त्यातील दारिद्रयरेषेखालील व्यक्तिंच्या नावे असलेल्या मालमत्तेची माहिती जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. अशाप्रकारे या प्रकरणी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या विषयासंदर्भात त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती दिली आहे. ग्रामपातळीवर दारिद्रयरेषेखालील व्यक्तींची यादी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत निश्चित केली जाते. तसेच अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील, दारिद्रयरेषेखालील व्यक्तींच्या कुटुंबातील कोणी व्यक्ती नोकरीला आहेत किंवा कसे, ही माहिती ग्रामपंचायतीकडे उपलब्ध नसते. यावरुन असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती दि. १६.०४.२००९ रोजी प्रथमतः व नंतर दि. २५.०५.२००९ रोजी पुरविली आहे. तथापि ही माहिती अपूर्ण व उडवाउडवीची कशी आहे, हे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या विचाराधीन द्वितीय अपील अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही अथवा यासंदर्भात त्यांचा हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सकृतदर्शनी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक १७-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख बाबा मकबूल, रा.दशमीगव्हाण,ता. जि. अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत दशमीगव्हाण,ता.जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (तां.), पंचायत समिती, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९२०

निर्णय दिनांक : १७.०३.२०१०

१. श्री. किरण नाथा वैरागर, : अपिलार्थी
रा.घोडेगाव,ता.नेवासा,जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता (उ),
सा.बां.(उत्तर) विभाग,
जि.प.अहमदनगर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम(उत्तर) विभाग,
जिल्हा परिषद, अहमदनगर

प्रत्यक्षत : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद, सा.बां.(उत्तर) विभाग,
अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५.१०.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत आणि जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दि. ०३.०३.२०१० रोजीचे निवेदन सादर केले असून या निवेदनामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक ती माहिती जन माहिती

अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झाली असल्याने ते स्वखुषीने, त्यांनी आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील, मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीचे आयोगाकडे दाखल केलेले विचाराधीन अपील त्यांनी त्यांच्या दि. ०३.०३.२०१० रोजीच्या निवेदनाद्वारे मागे घेतले असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : १७-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. किरण नाथा वैरागर, रा.घोडेगाव, ता.नेवासा, जि.अहमदनगर-४१४ ६०७.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद, सा.बां.(उत्तर) विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम(उत्तर) विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९२१
निर्णय दिनांक : १७.०३.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. दिपक चांदमल वर्मा,<br>रा.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.११.२००९ रोजी फेरसादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी न देता त्यांना उडवाउडवीची माहिती दिल्याने व आवश्यक ती माहिती देण्याचे हेतूपुरस्सर टाळल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असून या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "हद्दपार केस क्र. एस.आर.२५/९३ अहमदनगर दि. २२.०७.९६ मध्ये दर्शविलेल्या सर्व गुन्हयांच्या संदर्भातील सर्व कागदपत्रे", अशी माहिती व्यक्तिशः मागविली होती. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी विहित मुदतीत अपिलार्थीस उपलब्ध करुन न देऊ शकल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी

यांच्याकडे दि.०७.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०७.०४.२००९ रोजी निर्णय दिला. या निर्णयाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील अंशतः मान्य करुन त्यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित कागदपत्रे देण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी नगर व कोतवाली पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकास पत्र लिहिण्याच्या सूचना दिल्या. तथापि यानंतरही अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०७.०३.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०७.०४.२००९ रोजी दिलेल्या निर्णयाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने मागणी केलेली कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने त्यांच्याकडील दि. २७.१२.१९९६ रोजीच्या पत्राद्वारे रिट पिटीशन क्र.४२५/९६ च्या संदर्भात शासकीय अभियोक्ता, मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्याकडे पाठविल्याचे, दिसून येत आहे. तथापि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात ही कागदपत्रे शासकीय अभियोक्ता यांच्या कार्यालयातून जन माहिती अधिकारी यांना परत प्राप्त झाली आहेत किंवा कसे, हे यावरुन आढळून येत नाही. जर या प्रकरणातील संबंधित मूळ न्यायप्रविष्ट प्रकरणाचा निर्णय अद्यापपावेतो उच्च न्यायालयातर्फे दिला गेला नसेल तर ही कागदपत्रे शासकीय अभियोक्ता, औरंगाबाद यांच्या कार्यालयात निश्चितपणे उपलब्ध असणार. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील

तरतुदींशी सुसंगत आहे, त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपलब्ध असण्याचे दुसरे ठिकाण म्हणजे अहमदनगर शहरातील उपविभागीय पोलीस अधिकारी, नगर किंवा कोतवाली पोलीस स्टेशनचे कार्यालय हे होय. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देताना जन माहिती अधिकारी यांना उपविभागीय पोलीस अधिकारी नगर व कोतवाली पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकास अपिलार्थीच्या मूळ अर्जातील कागदपत्रांसंदर्भात पत्र लिहिण्याचे सूचित केले आहे. परंतु या दोन्ही टप्प्यावर जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्याचा कोणत्याही प्रकारे प्रयत्न केला नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जर अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असेल तर आणि ही माहिती दिल्याने अधिनियमातील कलम ८(१) व ९ चा भंग होणार नसेल तर अशी माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकाऱ्याचे प्रथम कर्तव्य असते. या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्याचे त्यांचे हे कर्तव्य योग्य प्रकारे पार पाडले नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती, शासकीय अभियोक्ता, उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांच्या कार्यालयातून किंवा उपविभागीय पोलीस अधिकारी नगर अथवा कोतवाली पोलीस स्टेशन, अहमदनगर यांच्या कार्यालयातून स्वतः प्राप्त करुन घेऊन त्या अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्याव्यात.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे, त्यामुळे अपिलार्थीस आता ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून, वरील कालावधीमध्ये, कोणत्याही कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पूर्वनियोजित वेळी जन

माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये स्वतः उपस्थित राहून ती संबंधितांकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी लागेल, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती,शासकीय अभियोक्ता, उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांच्या कार्यालयातून किंवा उपविभागीय पोलीस अधिकारी नगर अथवा कोतवाली पोलीस स्टेशन, अहमदनगर यांच्या कार्यालयातून स्वतः प्राप्त करुन घेऊन त्या अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्याव्यात.

**अहमदनगर**
**दिनांक : १७-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिपक चांदमल वर्मा, रा. ३५८६, माणिक चौक,अहमदनगर,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९२२

निर्णय दिनांक : १७.०३.२०१०

१. श्री. दादा गुलाब देशमुख व : अपिलार्थी
श्री. गोकुळ त्रिंबक शिंदे,
लोणी खुर्द, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
सहायक अधीक्षक अभियंता,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण मंडळ, नाशिक

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण मंडळ, नाशिक

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : १) सहायक अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण मंडळ, नाशिक
२) कार्यकारी अभियंता, मालेगाव पाटबंधारे विभाग, मालेगाव,जि.नाशिक.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७.११.२००९ रोजी फेरसादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली असल्याने व प्राप्त माहितीमध्ये त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १३ च्या संदर्भातील माहिती दिली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांना जन माहिती

अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना प्रतिदिनी रु.२५०/- एवढया रकमेची शास्ती लावावी, तसेच त्यांच्यावर योग्य ती शिस्तभंगविषयक कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १७ मुद्यांद्वारे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती.अपिलार्थीने मागणी केलेल्या १७ मुद्यांवरील माहितीपैकी मुद्दा क्र. १ ते ८ च्या संदर्भातील माहिती,अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयाशी सरळ संबंधित होती व उर्वरित मुद्दा क्र.९ ते १७ या मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील वेगळया विभागाकडे (मालेगाव उपविभाग) उपलब्ध होती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०६.१२.२००८ रोजी पोस्टाद्वारे पाठविली व त्या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली आणि त्यांच्या कार्यालयाशी सरळ संबंधित असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १३० अधिक टपाल खर्च रु. १५०/- असे एकूण रु. २८०/- इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे टपालखर्च वगळून माहितीपोटीचे शुल्क रु.१३०/- इतके मनीऑर्डरद्वारे दि. १९.०१.२००९ रोजी पाठविले. अपिलार्थीकडून टपालखर्च वगळून माहितीपोटीच्या शुल्काची रक्कम प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयातून व्यक्तिशः घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि या नंतर अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत. तसेच जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मालेगाव पाटबंधारे विभाग,मालेगाव यांनी अपिलार्थीस दि. १८.१२.२००८ रोजी सशुल्क (शुल्क रु.९०/-इतके स्वीकारुन) माहिती पुरविली. परंतु प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.

२४.०३.२००९ रोजी निर्णय देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे अनुमान काढून अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व संबंधित जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,नाशिक यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा (टपालखर्च वगळून) भरणा केल्यानंतर त्यांनी लगेचच उपलब्ध करुन ठेवली व अपिलार्थीस ते व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्याची तयारी त्यांच्या दि. २०.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे दर्शविली. तथापि अपिलार्थी ही माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयामध्ये कधीही उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थीने ज्या मुद्दा क्र. १३ च्या संदर्भात द्वितीय अपील केले आहे, त्यासंदर्भातील माहिती त्यांच्या अथवा त्यांच्या कार्यक्षेत्रात इतर कोणत्याही कार्यालयाकडे सार्वजनिक माहिती म्हणून जतन करुन ठेवली जात नाही. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १३ द्वारे मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाकडे तसेच त्यांच्या कार्यालयाशी संबंधित इतर कार्यालयाकडेही उपलब्ध असणे संभवत नाही.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,मालेगाव पाटबंधारे विभाग, मालेगाव यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती दि. १८.१२.२००८ रोजीच्या पत्रान्वये आर.पी.ए.डी.द्वारे पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, दोनही जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १३ शी

संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्णतः मिळाली नसल्याने आयोगाकडे द्वितीय अपील केले असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १३ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "शाखा अभियंते हे बदलीच्या ठिकाणी शासकीय निवासस्थानात राहतात कि खाजगी भाडोत्री निवासस्थानात?, त्यांचा वास्तव्याचा पुरावा म्हणून भाडे पावती, लाईट बील, गॅस कार्डची छायांकित प्रती", अशी माहिती मागविली होती. अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीच्या या मुद्यातील शाखा अभियंते हे खाजगी की भाडयाच्या निवासस्थानात राहतात, या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती मूळात देय होत नाही. कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती"या शब्दाच्या व्याख्येशी पूर्णपणे विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय अथवा त्यांच्या कृती अथवा निर्णयाबद्दल स्पष्टीकरण व कारणे अपेक्षित करणारी माहिती मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी अर्जादारास त्यांच्या कृतीबद्दलची आणि निर्णयाबद्दलची कारणे/स्पष्टीकरणे देणे अशाप्रकारच्या माहितीच्या देवाणघेवाणीच्या प्रक्रियेचा समावेश नाही. त्यामुळे या उपमुद्यावर अपिलार्थीस माहिती देय होत नाही. अपिलार्थीच्या या मुद्यातील उर्वरित भागासंदर्भात त्यांनी संबंधित शाखा अभियंता यांच्या वास्तव्याचा पुरावा म्हणून त्यांच्या भाडेपावत्या, लाईट बीले, गॅस कार्ड यांच्या छायांकित प्रती अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली आहे. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती पूर्णतः त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबींशी संबंधित आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात शाखा अभियंत्यांच्या खाजगी निवासस्थानाच्या भाडेपावत्यावरुन त्यांना घरभाडे भत्ता अदा करणे, अशाप्रकारची कार्यपध्दती प्रचलित नाही. लाईट बील, गॅस कार्ड ही माहिती संबंधित त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक माहिती आहे. ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची नाही, अशाप्रकारची त्रयस्थ पक्षाशी संबंधित खाजगी माहिती जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्षपणे ताब्यात असणे, हे प्रचलित शासकीय

कार्यप्रणालीनुसार मूळात अभिप्रेत नाही. तसेच माहिती अधिकार अधिनियम,२००५ मध्ये अर्जदाराने सार्वजनिक प्राधिकरणाकडे मागणी केलेली माहिती त्यांच्या कर्मचाऱ्याकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती पुरावे म्हणून अर्जदारास पुराव्याच्या स्वरुपात देण्याची कोणतीही तरतुद नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १३ मधील या भागावरील माहिती देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अशाप्रकारे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील ज्या मुद्यासंदर्भात अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे त्या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नसल्याने अपिलार्थीच्या विचाराधीन प्रकरणातील हा मुद्दा निकाली निघत आहे.

अपिलार्थीने विचाराधीन अपील प्रकरणासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांना अपूर्ण माहिती दिल्याबद्दल अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करावी, अशी विनंती केली आहे. तथापि या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांना देण्याचे कोणत्याही टप्प्यावर व कधीही हेतूपुरस्सर टाळलेले नाही. उलट अपिलार्थीनेच जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाची खाजगी माहिती मागविली असल्याने आणि ती त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय नसल्याने अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची आणि शिस्तभंगविषयक कारवाई आदेशित करण्याची विनंती आयोग अमान्य करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक १७-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दादा गुलाब देशमुख रा. लोणी खुर्द, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण मंडळ, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मालेगाव पाटबंधारे विभाग, मालेगाव, जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक,लाभक्षेत्र विकास प्राधिकरण मंडळ, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९२३
निर्णय दिनांक : १७.०३.२०१०

१. श्री. रामकृष्ण लक्ष्मण कोल्हे, : अपिलार्थी
रा.आखेगाव तितर्फा, ता.शेवगाव,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार,
तहसील कार्यालय,शेवगाव,जि.अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, शेवगाव,जि.अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय,शेवगाव,जि.अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१.०८.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, तहसीलदार,शेवगाव यांनी त्यांच्या दि. ०८.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर अद्यापपावेतो कोणताही लेखी आदेश पारित केला नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या स्वतःच्या जमिनीविषयी काही माहिती एकूण ११ मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन

अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०८.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.०७.२००९ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि यानंतर ही सुनावणी प्रत्यक्षात झाली किंवा कसे, हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. अशाप्रकारे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली आवश्यक ती माहिती त्यांना प्राप्त न झाल्याने व त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने आज रोजी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या दि. ०८.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय लिखित स्वरुपात पारित केला गेला नसल्याचे या प्रकरणी नि:संशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे योग्य राहिल, असे आयोगास या टप्प्यावर वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, शेवगाव,जि. अहमदनगर यांनी अपिलार्थीच्या दि. ०८.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,शेवगाव,जि.अहमदनगर यांनी अपिलार्थीच्या दि. ०८.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश नि-र्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**अहमदनगर**
**दिनांक १७-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रामकृष्ण लक्ष्मण कोल्हे,मु.पो.आखेगाव तितर्फा,ता.शेवगाव,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल),तहसील कार्यालय, शेवगाव, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, शेवगाव,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९२४

निर्णय दिनांक : १७.०३.२०१०

१. श्री. एकनाथ ग्यानबा धुमाळ, : अपिलार्थी
रा.गोसावी मठ (प्रभाग नं.७), ता.कोपरगाव,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
जॉईंट कमिशनर ऑफ सेल टॅक्स, नाशिक

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सह विक्रीकर आयुक्त, नाशिक

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक विक्रीकर आयुक्त, अहमदनगर
जन अपिलीय अधिकारी : विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशा.), नाशिक विभाग,नाशिक
त्रयस्थ पक्ष : कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समिती,कोपरगाव, जि.अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०१.२०१० रोजी फेरसादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी माहिती न देता, त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याचे कळवून अपिलार्थीस मानसिक व शारीरिक त्रास देऊन तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी त्यांनी योग्य ती माहिती न पुरविता, त्यांना मानसिक, शारीरिक व आर्थिक त्रास दिला. अशाप्रकारे सर्व संबंधितांनी खरी वस्तुस्थिती लपविण्याचा प्रयत्न केला असल्याने संबंधितांची चौकशी होऊन त्यांच्यावर योग्य ती कारवाई व्हावी, अशाप्रकारची विनंती त्यांनी आयोगास या अपील अर्जाच्या अखेरीस केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष - "कोपरगाव कृषि उत्पन्न बाजार समिती, कोपरगाव यांच्या सन २००६-०७ व २००७-०८ मधील सोयाबीन कराबाबतचा अहवाल", अशी माहिती शीघ्र पोस्टाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज सह आयुक्त, विक्रीकर नाशिक यांना उद्देशून केला होता. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सह आयुक्त विक्रीकर यांच्या कार्यालयाशी संबंधित नसल्याने त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीचा अर्ज त्यांच्या प्राधिकरणातील अहमदनगर शाखेकडे, त्यांच्याकडील दि. १६.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पाठवून दिला व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. यानंतर संबंधित जन माहिती अधिकार तथा सहायक विक्रीकर आयुक्त,अहमदनगर यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १३.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१२.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०६.२००९ रोजी आपला निर्णय पारित केला. जन अपिलीय अधिकारी यांनी या निर्णयाद्वारे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणताही ठोस आदेश पारित केलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आवश्यकता असून या प्रकरणी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न होता उलट विक्रीकर विभागाकडून त्यांना शारीरिक,मानसिक व आर्थिक त्रास देण्यात आलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही किंबहुना कृषि उत्पन्न बाजार समितीचे अशाप्रकारचे वस्तुनिहाय (Commodity wise) कोणतेही अभिलेखे त्यांच्याकडे जतन करुन ठेवले जात नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित कृषि उत्पन्न बाजार समितीकडून उपलब्ध करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस देण्याच्या दृष्टीने त्यांनी त्यांच्या कार्यालयातील विक्रीकर निरीक्षकास कोपरगाव कृषि उत्पन्न बाजार समितीकडे पाठविले होते. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती या समितीकडे देखील उपलब्ध नव्हती, कारण ज्या मालाची कृषि उत्पन्न बाजार समितीमार्फत विक्री होते, त्या मालाचे व्यापारी, त्यांच्या स्तरावर परस्पर विक्रीकर भरत असतात. त्यामुळे अशाप्रकारे वस्तुनिहाय (Commodity wise) मालाचा विक्रीकर भरणा केल्यासंदर्भातील कोणतीही माहिती कृषि उत्पन्न बाजार समितीकडे उपलब्ध नसल्यामुळे त्यांना अपिलार्थीस अपेक्षित माहिती पुरविता आली नाही.

त्रयस्थ पक्ष तथा प्रतिनिधी,कोपरगाव कृषि उत्पन्न बाजार समिती,कोपरगाव यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती मागविली आहे, त्या माहितीचा कृषि उत्पन्न बाजार समितीशी अर्थाअर्थी कोणताही संबंध येत नाही आणि अपिलार्थीने ज्या माहितीची मागणी केली आहे, त्या प्रकारची माहिती कृषि उत्पन्न बाजार समिती कोणत्याही प्रकारे संकलीत करीत नाही अथवा ती जतन करुन ठेवत नाही.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०४.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १३.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली आहे व अपिलार्थीस ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे अवगत केले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची नसल्यामुळे आणि ती कृषि उत्पन्न बाजार समितीतील व्यापाऱ्यांच्या त्यांच्याकडील वस्तुच्या खरेदी-विक्री संदर्भात असल्यामुळे ही माहिती खाजगी स्वरुपाची असल्याचे दिसून येत आहे. याही पेक्षा महत्त्वाचे असे आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे

ज्या प्रकारे माहिती मागविली आहे. त्याचप्रकारे ती माहिती केवळ जन माहिती अधिकारी यांच्याकडे नव्हे तर संबंधित त्रयस्थ पक्ष, कृषि उत्पन्न बाजार समिती यांच्याकडेही वस्तुनिहाय ठेवली जात नसल्याने, ती अपिलार्थीस आता उपलब्ध होऊ शकणार नाही, हे उघड आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि.१३.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. तथापि या प्रकरणी असेही आढळून येत आहे की, अपिलार्थीचा दि. ०४.०३.२००९ रोजीचा मूळ अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या प्राधिकरणाच्या अहमदनगर शाखेकडे अधिनियमातील कलम ६ (३)(एक) च्या तरतुदीनुसार, अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त होताच पाच दिवसांच्या आत म्हणजेच दि.०९.०३.२००९ रोजी अगर तत्पूर्वी पाठविणे अपेक्षित असताना त्यांनी तो सहायक विक्रीकर आयुक्त,अहमदनगर यांना दि.१६.०३.२००९ रोजी म्हणजेच सात दिवसांच्या विलंबाने हस्तांतरित करुन, अधिनियमातील कलम ६ (३)(एक) चा भंग केल्याचे स्पष्ट होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येऊन असे सूचित करण्यात येत आहे की, इत:पर त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जासंदर्भात सतर्कतेने कार्यवाही करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक १७-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. एकनाथ ग्यानबा धुमाळ,रा.गोसावी मठ (प्रभाग नं.७), कोपरगाव,जि.अहमदनगर-४२३ ६०१.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक विक्रीकर आयुक्त, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशा.),नाशिक विभाग,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९२५
निर्णय दिनांक : १७.०३.२०१०

१. श्री. दत्तात्रय प्रभाकर शेकटकर, : अपिलार्थी
रा.भराडगल्ली, नेहरु मार्केट,अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रसिध्दी विभाग प्रमुख,
महानगरपालिका, अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सा.प्र.),
महानगरपालिका,अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : १) प्रसिध्दी विभाग प्रमुख,
महानगरपालिका, अहमदनगर
२) नगर रचनाकार,
महानगरपालिका, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.१०.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ मधील माहिती बिनचूक न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांचा दिनांक २३.०५.२००९ रोजीचा मूळ अर्ज, जो जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २८.०५.२००९ रोजी प्राप्त झाला, त्याद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी माहितीच्या अधिकारात दिलेल्या अर्जासंदर्भात प्रधान सचिव,नगर विकास व संचालक, नगररचना आणि मूल्य निर्धारण विभाग यांच्याकडील पत्रव्यवहाराच्यासंदर्भात काही

माहिती एकूण तीन मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागितलेल्या माहितीमध्ये -संचालक, नगररचना आणि मूल्यनिर्धारण, म.रा.,पुणे यांच्या दि. ०२.०३.२००९ रोजीच्या पत्राची झेरॉक्स प्रत, प्रधान सचिव,नगर विकास विभाग, मुंबई यांच्या दि. २८.०१.२००९ रोजीच्या पत्राची झेरॉक्स प्रत व अपिलार्थीने नगररचनाकार यांना एकच माहिती उलटसुलट पध्दतीने १५-२० वेळा मागितली, असे उपायुक्त तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे मा.संचालक,नगररचना व मूल्य निर्धारण,म.रा.पुणे यांना कळविले आहे, ही माहिती ज्या अर्जामध्ये समाविष्ट आहे,त्या अपिलार्थीच्या सर्व अर्जांच्या झेरॉक्स प्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने त्यांचा विचाराधीन अर्ज प्रसिध्दी विभागाकडे केला होता. प्रसिध्दी विभागाने त्यांच्याकडील माहिती दि. ०३.०६.२००९ रोजी अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती पुरविली व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस, ती नगररचना विभागाशी संबंधित असल्यामुळे त्या विभागाकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. यानंतर नगर रचना विभागाने अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १६.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५४/- इतके भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा महानगरपालिकेकडे केला. परंतु शुल्क भरल्याची पावती नगररचना विभागाकडे सादर न केल्यामुळे नगररचना विभागाने अपिलार्थीस माहिती पुरविली नाही. अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०१.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०७.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १७.०८.२००९ रोजीच्या पत्रान्वये एकूण ५३ पृष्ठांची त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे. तथापि ही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहिती त्यांना आवश्यक असल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहिती दि. १७.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पुरविल्याचे व अपिलार्थीकडून प्राप्त झालेले माहितीपोटीचे शुल्क रु. ५४/- त्यांना परत केल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी अपिलार्थीस पोस्टाने माहिती पुरविली आहे. परंतु अपिलार्थीस ही माहिती प्राप्त न झाल्याचा अपिलार्थीचा दावा आहे. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात पुरविलेल्या कथित माहितीची त्यांनी त्यांच्या स्तरावर प्रथमतः तपासणी करावी आणि ती अचूक असल्याची खात्री करुन घेऊन नंतर ती जन माहिती अधिकारी यांचेमार्फत अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत उपायुक्त (सा.प्र.),महानगरपालिका,अहमदनगर यांच्याकडून

तपासून घेऊन तदनंतर ती, अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक १७-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्तात्रय प्रभाकर शेकटकर,रा.भराडगल्ली, नेहरु मार्केटमागे,अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी, प्रसिध्दी विभाग प्रमुख,महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार,महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.),महानगरपालिका,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९२६
निर्णय दिनांक : १७.०३.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. शंकर काशीनाथ वेताळ,<br>रा.सुलतानपूर खूर्द, ता. शेवगाव,जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती,शेवगाव,जि. अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, अहमदनगर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२.०३.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना इंदिरा आवास घरकुल योजना,२००७-०८ अंतर्गत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने मदत न पुरविल्याने आणि त्यांना गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शेवगाव आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शेवगाव यांच्याकडे त्यांनी दि. २८.०५.२००८ रोजी केलेल्या अर्जावर गट विकास अधिकारी यांनी काय कार्यवाही केली, अशी माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती ग्रामसेवक सुलतानपूर यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे त्यांना सूचित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने व संबंधित ग्रामसेवकाने अपिलार्थीस त्यांचा अर्ज त्यांच्या कार्यालयात नसल्याचे त्यांना कळविल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.२०.०८.२००८ रोजी उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमनगर यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी दि. २८.०५.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शेवगाव यांच्याकडे इंदिरा आवास घरकुल योजनेअंतर्गत अपिलार्थीने सन २००७ मध्ये बांधलेल्या घरकुलाकरिता त्या योजनेअंतर्गत देय असलेली आर्थिक मदत मागितली होती. त्यांचा दि. २८.०५.२००८ रोजीचा अर्ज गट विकास अधिकारी,पंचायत समिती, शेवगाव यांच्याकडे प्राप्त झालेला आहे. यासंदर्भात त्यांनी पंचायत समिती, शेवगाव कार्यालयातील संबंधित लिपीकाची पोचसही असलेल्या दि. २८.०५.२००८ रोजीच्या अर्जाची झेरॉक्स प्रत आयोगास दाखविली. यावरुन अपिलार्थीचा दि. २८.०५.२००८ रोजीचा अर्ज गट विकास अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे. या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी काय कार्यवाही केली ही माहिती अपिलार्थीस, विचाराधीन प्रकरणी, अपेक्षित आहे.अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती पुरविणे भाग आहे. अपिलार्थीच्या दि. २८.०५.२००८ रोजीच्या अर्जावर गट विकास अधिकारी कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीच्या माहितीसंदर्भात,अपिलार्थीचा अर्ज गट

विकास अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्यापासून ते दि. ०८.०७.२००८ पर्यंतच्या कालावधीमध्ये गट विकास अधिकारी, पंचायत समिती,शेवगाव यांच्या कार्यालयाने अपिलार्थीच्या दि.२८.०५.२००८ रोजीच्या अर्जातील विषयासंदर्भात विविध प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती आणि याच विषयासंदर्भात त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या अभिलेख्यातील टिपणीच्या प्रती ही माहिती, त्यांना अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल. जर अपिलार्थीचा दि. २८.०५.२००८ रोजीचा अर्ज गट विकास अधिकारी यांच्या कार्यालयातून गहाळ झाला असेल तर सदरचा अर्ज जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या कर्मचाऱ्यावर होती, त्या कर्मचाऱ्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी, असे त्यांना येथे सूचविण्यात येत आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना पुढे असेही सूचविण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या इंदिरा आवास घरकुल योजना,२००७-०८ च्या अर्थसहाय्य प्रकरणाची त्यांच्या पातळीवरुन स्वतः चौकशी करावी व अपिलार्थीचा प्रश्न मार्गी लावावा.

जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शेवगाव यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या दि. २८.०५.२००८ रोजीच्या अर्जावर, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीसंदर्भात, वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती,शेवगाव यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक १७-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शंकर काशीनाथ वेताळ, मु.पो.सुलतानपूर खूर्द, ता.शेवगाव,जि.अहमदनगर-४१४५०५.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शेवगाव, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९२७
निर्णय दिनांक : १७.०३.२०१०

१. श्री. दत्तात्रय यादवराव कवाणे, : अपिलार्थी
रा.राहुरी,जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सेक्रेटरी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ,
श्रीशिवाजीनगर,ता.राहुरी,जि. अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : श्रीमती शेळके सुलभा कृष्णाजी, श्रीमती बोरकर, श्री. चोथे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.११.२००९ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे त्यांनी जी माहिती मागितली, ती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये सचिव, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, श्रीशिवाजीनगर,ता.राहुरी,जि.अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या संस्थेसंदर्भात काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती. संस्थेकडून अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २४.०७.२००९ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,

अहमदनगर यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.अहमदनगर यांनी दि. २५.०९.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्याचे संबंधित संस्थेला सूचित केले. त्याप्रमाणे संबंधित संस्थेने अपिलार्थीस दि. ०६.१०.२००९ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविली. तथापि यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित संस्थेचे व जन अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

संस्थेचे प्रतिनिधी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती दि. ०६.१०.२००९ रोजी पुरविली असून अपिलार्थीस अपेक्षित असलेली सन २००३ ते २००६ या कालावधीतील माहिती त्यांना अपिलार्थीस पुरविता आली नाही. कारण ती माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. संस्थेच्या नवीन व्यवस्थापनाकडून दि. २५ जानेवारी, २००६ रोजी या संस्थेचे व्यवस्थापन हाती घेतले गेले आहे. २००६ सालापूर्वीची माहिती पूर्वीच्या व्यवस्थापनाकडे होती व त्यांनी नवीन व्यवस्थापनाकडे पदभार हस्तगत करताना त्यांच्याकडील जुने अभिलेखे हस्तांतरित केले नाहीत, त्यामुळे त्यांनी धर्मादाय आयुक्त व पोलीस विभागाकडे तक्रार देखील केलेली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील २००३ व मार्च, २००० या कालावधीशी संबंधित माहिती वगळता उर्वरित सर्व माहिती त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्यांच्या संस्थेला शासनाकडून कोणतेही अर्थसहाय्य सरळ प्राप्त होत नाही. तसेच त्यांच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे प्रत्यक्ष नियंत्रण नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने या प्रकरणी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्थेकडे या संस्थेच्या

शाळेसंदर्भात काही माहिती मागविली आहे. या संस्थेला शासनाकडून कोणत्याही प्रकारचे भरीव अर्थसहाय्य प्राप्त होत नाही. यासंदर्भात मा. उच्च न्यायालय,नागपूर खंडपीठाने त्यांच्याकडील रिट याचिका क्र.५१३२/२००८, नगर युवक शिक्षण संस्था आणि यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय, वनडोंगरी, नागपूर विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यासंदर्भात दि.२०.०८.२००९ रोजी दिलेला निर्णय व मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांच्याकडील रिट याचिका क्रमांक ५२९४/२००८, मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्‌गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर यांच्या संदर्भात दि. २८.०४.२००९ रोजी दिलेला निर्णय या प्रकरणी विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशाचा काही भाग खालीलप्रमाणे उध्दृत केला आहे.

".......... It is , therefore, clear from the provisions of this definition that the Act cannot apply to the Public Trust. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority. .......... If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the Public Trust Act to have such information, which the Charity Commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act."

रिट याचिका क्र. ५१३२/२००८, दि. २०.०८.२००९ रोजीच्या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने, अधिनियमातील "नियंत्रण" व "मोठया प्रमाणात वित्त पुरवठा" या मुद्यावरही पुरेसे भाष्य केले असून खाजगी संस्थांच्या महाविद्यालयांवर माहिती अधिकार

अधिनियमाद्वारे अभिप्रेत असलेले "नियंत्रण"व "वित्त सहाय्य" शासनाकडून केले जात नसल्याचा निष्कर्ष काढून, अशाप्रकारच्या संस्थांना माहिती अधिकार अधिनियम लागू होत नसल्याचा निर्णय दिला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(ज) मध्ये विहित केलेल्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये अशाप्रकारची खाजगी महाविद्यालये येत नसल्यामुळे सदर अपील फेटाळून राज्य माहिती आयोगाच्या नागपूर खंडपीठाचे अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे आदेश रद्द ठरविले आहेत. विचाराधीन प्रकरण देखील मा. उच्च न्यायालयाच्या वर संदर्भित केलेल्या प्रकरणाप्रमाणेच असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम हा या संस्थेस लागू होत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस या संस्थेच्या संदर्भात त्यांना आवश्यक असलेल्या उर्वरित माहितीकरिता त्यांना धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा लागेल, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज ज्या प्राधिकरणाकडे केला आहे, त्या प्राधिकरणास माहिती अधिकार अधिनियम,२००५ लागू होत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : १७-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्तात्रय यादवराव कवाणे,सुलभ इरीगेशन,१३, मार्केट यार्ड,राहुरी,जि.अहमदनगर

२. सेक्रेटरी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ,श्रीशिवाजीनगर, ता. राहुरी,जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, अहमदनगर यांना

या निकालपत्रातील नोंदी संदर्भात  पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९२८
निर्णय दिनांक : १७.०३.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. राजेश गणपतराव परकाळे,<br>रा.चिचोंडी पाटील, ता.जि.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक निबंधक, सहकारी संस्था,<br>अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,<br>अहमदनगर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मजूर सहकारी संस्थेच्या संदर्भात त्यांच्या कार्यालयाकडील सन २००५ ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण १८ मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २८.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपेक्षित असलेली व त्यांच्या स्तरावर उपलब्ध असलेली माहिती पुरविली आणि अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ८१७६/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या

तरतुदीनुसार दि. ०४.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.०९.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील नामंजूर केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आवश्यक असल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांच्याकडे न भरल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत, असे आयोगास सांगितले.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोनही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात अपेक्षिली आहे. यातील बव्हंशी माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय व स्पष्टीकरण अपेक्षित असलेल्या अशाप्रकारची असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना देय असलेल्या माहितीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाही. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील - मुद्दा क्र. १ व २ च्या संदर्भातील संपूर्ण, मुद्दा क्र. ३ मधील, 'मजूर सहकारी संस्थांवर जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय कशाप्रकारे नियंत्रण ठेवते', या मुद्यावर, मुद्दा क्र. ४ मधील, 'मजूर सहकारी संस्था काम वाटपानुसार काम मिळाल्यास संघाला किती टक्के रक्कम अधिकृतपणे देतात अथवा अनधिकृतपणे देतात', या मुद्यावरील माहिती, मुद्दा क्र. १० मधील 'सहकार आयुक्तांच्या दि. २३.०४.१९९८ च्या परिपत्रकानुसार गठीत केलेल्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीच्या इतर सदस्यांची पदनामे' या मुद्यावर, मुद्दा क्र. १२ संपूर्ण, मुद्दा क्र. १३ मधील,

'पासबुक वेळोवेळी भरले आहे का?' हा भाग वगळता उर्वरित संपूर्ण भागाशी संबंधित माहिती, मुद्दा क्र. १४, मुद्दा क्र. १६ व मुद्दा क्र. १७ मधील, 'यातील किती व कोणत्या मजूर संस्थांचे पुनर्जीवन झाले आहे', या मुद्यावर आणि मुद्दा क्र. १८ मधील,'जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील दि. ०१.०४.२००५ पासून अवसायानात गेलेल्या मजूर संस्थांची संख्या' या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे, असे दिसून येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती वीस दिवसांच्या आत उपलब्ध करुन देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ८१७६/- हे त्यांच्या कार्यालयात भरण्याच्या सूचना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत आणि योग्य त्या तपशीलासह दिल्या आहेत. त्यामुळे जर आता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील देय माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावयाची असेल तर त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून आवश्यक त्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयामध्ये प्रथमतः करुन नंतर ती माहिती त्यांच्या कार्यालयातर्फे प्राप्त करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली, अपिलार्थीस देय होत असलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांच्या आत सशुल्क व व्यक्तिशः पुरवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेश गणपतराव परकाळे,मु.पो.चिचोंडी पाटील, ता.जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९२९
निर्णय दिनांक : १७.०३.२०१०

१. श्री. प्रदीप खुशालचंद बंब, : अपिलार्थी
रा.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
अहमदनगर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक निबंधक, सहकारी संस्था,
अहमदनगर.

त्रयस्थ पक्ष : व्यवस्थापक,
श्री रामकृष्ण अर्बन को-ऑप.क्रेडिट
सोसायटी,लि.अहमदनगर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती संबंधित पतसंस्थेकडे उपलब्ध असूनही ती माहिती त्यांना देण्याचे संबंधित पतसंस्था जाणूनबुजून नाकारत आहे, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे,श्री रामकृष्ण अर्बन को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि. या पतसंस्थेकडून १९९५ मध्ये शेअर तारणावर घेतलेल्या कर्जासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी

केलेल्या माहितीमध्ये - त्यांनी पतसंस्थेकडे तारण ठेवलेले शेअर्स व डिबेंचर्स याच्या प्रमाणित नकला, शेअर ट्रान्सफर फॉर्मच्या प्रमाणित नकला, कर्ज तारखेपासून ते दि. ०२.१२.२००८ पर्यंतचा खाते उतारा आणि कर्ज मंजूरीच्या ठरावाच्या प्रमाणित नकलेची प्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०८.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत व्यवस्थापक, श्री रामकृष्ण अर्बन को-ऑप.क्रेडिट सोसायटी,लि.अहमदनगर यांच्याकडे पाठविली व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि संबंधित पतसंस्थेकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०३.०१.२००९ रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,अहमदनगर यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी दि. ११.०२.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे संबंधित पतसंस्थेस सूचित केले. तथापि या निर्णयानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी त्यांच्या युक्तिवादाद्वारे कायम ठेवली.

त्रयस्थ पक्षाने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती पतसंस्थेने त्यांच्या दि. १७.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे देऊ केली असता, अपिलार्थी ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्याकडे उपस्थित राहिले नाहीत, त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने ज्या त्रयस्थ पक्षाविषयी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली आहे, तो त्रयस्थ पक्ष म्हणजे श्री रामकृष्ण अर्बन को-ऑप.क्रेडिट सोसायटी,लि.अहमदनगर हा होय. या प्रकरणी, मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'सार्वजनिक प्राधिकरण' असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच

युक्तिवाद लागू होत असल्यामुळे मूळात या प्रकरणी त्रयस्थ पक्ष हा माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ (ज) च्या तरतुदीप्रमाणे 'सार्वजनिक प्राधिकरण' होऊ शकत नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांची संबंधित संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित करण्याची कृती चुकीची असल्याचे स्पष्ट होत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, संबंधित त्रयस्थ पक्ष अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार असल्याचे आयोगास अवगत करुन देण्यात आले व त्रयस्थ पक्षाने अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत सशुल्क माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे. त्याचबरोबर अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाकडून सशुल्क माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे आयोगासमोर कबूल केले आहे.

जन माहिती अधिकारी यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७९ च्या तरतुदीप्रमाणे त्रयस्थ पक्षाच्या कागदपत्रांची तपासणी करण्याचे व ती ताब्यात घेण्याचे अधिकार आहेत, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती प्रथमतः त्रयस्थ पक्षाकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार प्राप्त करुन घेऊन, तदनंतर अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क आकारुन, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत सशुल्क माहिती उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक १७-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रदीप खुशालचंद बंब,मोतीमहल, पुनममोतीनगर,अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९३०
निर्णय दिनांक : १७.०३.२०१०

१. श्री. लक्ष्मीनारायण शिवनारायण जाजू, : अपिलार्थी
रा.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक निबंधक, सहकारी संस्था,
अहमदनगर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : व्यवस्थापक,
श्री रामकृष्ण अर्बन को-ऑप.क्रेडिट
सोसायटी,लि.अहमदनगर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.०९.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री रामकृष्ण अर्बन को-ऑप.क्रेडिट सोसायटी,लि.अहमदनगर या पतसंस्थेसंदर्भात जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहमदनगर यांनी दि. ०९.०४.२००९ व दि. २१.०५.२००९ रोजी दिलेल्या आदेशावर त्यांच्या कार्यालयाने पुढे काय कार्यवाही केली, अशाप्रकारची माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीच्या मूळ

अर्जाची प्रत व्यवस्थापक, श्री रामकृष्ण अर्बन को.ऑप क्रेडिट सोसायटी लि.अहमदनगर यांच्याकडे पाठविली व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २३.०७.२००९ रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,अहमदनगर यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २८.०८.२००९ रोजी आपले आदेश पारित करुन माहिती अधिकार अधिनियम अर्बन को.ऑप.क्रेडिट सोसायटीस लागू होत नसल्याच्या कारणास्तव अपिलार्थीचे प्रथम अपील नामंजूर केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०३.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी त्यांच्या युक्तिवादाद्वारे कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज संबंधित क्रेडिट सोसायटीकडे पाठविल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने सहायक निबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांना त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती मागितली आहे. सहायक निबंधक, सहकारी संस्था हे शासकीय प्राधिकरणाचे प्रतिनिधीत्त्व करतात. त्याचप्रमाणे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना देणे हे सहायक निबंधक, सहकारी संस्था यांचे प्रथम कर्तव्य होते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे सहायक निबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयाने श्री रामकृष्ण अर्बन को-ऑप.क्रेडिट सोसायटी,लि.अहमदनगर यांना दि. ०९.०४.२००९ व २१.०५.२००९ रोजी दिलेल्या आदेशावर पुढे काय कार्यवाही केली, अशी माहिती मागितली होती. सदर माहिती, माहिती अधिकार

अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाच्या दि. ०९.०४.२००९ व २१.०५.२००९ रोजीच्या पत्रावर त्यांच्या कार्यालयाने दि. २२.०६.२००९ पर्यंत केलेल्या कार्यवाहीची माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल. अपिलार्थीस अपेक्षित असलेली कार्यवाही म्हणजे, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने दि. ०९.०४.२००९ व २१.०५.२००९ रोजीच्या अपिलार्थीच्या पत्रावर संबंधित सोसायटीशी अथवा या प्रकरणाशी संबंधित इतर प्राधिकरणाशी त्यांनी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती, ही होय. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने, ती आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल.

जन अपिलीय अधिकारी यांनी केवळ माहिती अधिकार अधिनियम, २००५ हा संबंधित सोसायटीला लागू होत नसल्याच्या कारणाचा आधार घेऊन अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले आहे. त्यांचा सदरचा निर्णय चुकीचा आहे. कारण अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा विषय जरी माहिती अधिकार अधिनियमाच्या व्याप्तीमध्ये येत नसला तरीही अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही निश्चितपणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होत असल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांचा दि. २८.०८.२००९ रोजीचा आदेश अधिक्रमित करुन जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक १७-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. लक्ष्मीनारायण शिवनारायण जाजू,२३४०,आडतेबाजार, अहमदनगर-४१४ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०९१
निर्णय दिनांक १८/०३/२०१०

१ सौ. एस.पी. नैण, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
लागवड अधिकारी,
सामाजिक वनीकरण, मुखेड परिक्षेत्र, मुखेड,
जि.नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
सामाजिक वनीकरण, नांदेड विभाग, नांदेड.

**निर्णय**

सौ. एस.पी. नैण यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १४.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. २८.११.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २६.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ४८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. एस.पी. नैण, व्दारा-मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०९२
निर्णय दिनांक १८/०३/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ सौ. एस.पी. नैण,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>लागवड अधिकारी,<br>सामाजिक वनीकरण, भोकर परिक्षेत्र, भोकर,<br>जि.नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसंचालक,<br>सामाजिक वनीकरण, नांदेड विभाग, नांदेड. | | |

**निर्णय**

सौ. एस.पी. नैण यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १४.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. २८.११.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २६.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ४८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. एस.पी. नैण, व्दारा-मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८४०

निर्णय दिनांक १८-०३-२०१०

१ श्री. ओमप्रकाश जगन्नाथजी डागा, : अपिलार्थी
रा. कोतवाली पो. स्टे. समोर, नवा मोंढा, परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
कार्यालय, अधीक्षक अभियंता (संवसु), महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता (संवसु), महारष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता (प्रशासन), महारष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०३-२००९ रोजी केलेल्या अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून बेस व टॉप, किटकॅटबाबत चुकीची व दिशाभूल करणारी माहिती मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, 'परभणी व हिंगोली जिल्ह्यातील कार्यान्वीत परंतु जळालेल्या विद्युत रोहित्र व ट्रान्सफॉर्मरसाठी किटकॅट व्यवस्था' या विषयावर दिनांक ०१-०१-२००९ ते २७-०१-२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ६ पैकी एकूण ५ मुद्यांवर माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या दिनांक २७-०१-२००९ रोजीच्या अर्जासंदर्भात संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४, ५ व ६ च्या संदर्भात अद्यापपावेतो त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होणे बाकी आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २६-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पाठविली आहे. अपिलार्थीस या संदर्भात अधिक तपशीलवार माहिती हवी असल्यास ते अपिलार्थीस ती १० दिवसाच्या आत ती देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कर्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे मागितली होती. तथापि अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास प्रथम प्रतिसाद देताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २६-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे फक्त पाचच मुद्यांची माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ द्वारे "अधीक्षक अभियंता, परभणी यांनी परभणी व हिंगोली जिल्ह्यातील जळालेल्या विद्युत रोहित्राबाबत आढावा बैठक घेऊन केलेली कार्यवाही व वरिष्ठ कार्यालयाकडे केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती" अशी माहिती मागविली होती. परंतु या मुद्याच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, "प्रत्येक आढावा बैठक यामध्ये बाबींचा विचार होतो व कार्यवाहीबाबत सूचना देण्यात येतात", अशी मोघम माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ द्वारे, अधीक्षक अभियंता यांनी या विषयासंदर्भात वरिष्ठ कार्यालयाकडे केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती मागितल्या आहेत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी देखील दिनांक ०१-०१-२००९ ते २७-०१-२००९ असा अत्यंत मर्यादित आहे. त्यामुळे या मुद्यावर अधीक्षक अभियंता कार्यालयाने अपिलार्थीने ज्या विषयावर माहितीची मागणी केली आहे त्या विषयासंदर्भात त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाकडे दिनांक ०१-०१-२००९ ते २७-०१-२००९ या कालावधीमध्ये केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांना अपिलार्थीस पुरवाव्या लागतील. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ द्वारे "दोन्ही जिल्ह्यातील कार्यान्वीत असलेल्या किती ट्रान्स फॉर्मरसाठी Base & Top किटकॅट कार्यान्वीत आहेत त्याची माहिती" अशी माहिती मागितली होती. तथापि या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस "सर्व रोहित्राच्या ठिकाणी किटकॅट असतात. नादुरुस्त किटकॅटच्या ठिकाणी ते उपलब्ध करुन देण्यात येतात ....................... " अशी माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीस ही माहिती संख्यात्मक स्वरुपात अपेक्षित होती. तथापि अपिलार्थीस माहिती देताना त्यांनी अशाप्रकारचे मोघम विधान केले आहे. या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांना असे स्पष्ट करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीने ज्या दिवशी अर्ज केला त्या दिवशी या मुद्यावरील उपलब्ध असलेली माहिती संख्यात्मक स्वरुपात पुरवावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ द्वारे अपिलार्थीने "किटकॅट नसलेल्या ठिकाणी सुरक्षेततेची जबाबदारी

काय? याबाबत एस. ई. परभणीचा सुस्पष्ट अहवाल" अशी माहिती मागविली आहे. या मुद्यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून या मुद्याद्वारे जी माहिती व ज्या स्वरुपात ती मागितली आहे ती, माहिती अधिकार अधिनियमतील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी विसंगत आहे. या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण अपेक्षित असणारी माहिती मागविली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाबद्दल अथवा कृतीबद्दल अर्जदाराने त्यांच्याकडे अशाप्रकारचे कारणे व खुलासे मागविणे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या कृतीबद्दलचे कारणे अथवा स्पष्टीकरणे देणे अशी प्रक्रिया अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

अशाप्रकरे अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी द्यावयाची राहिलेली माहिती व अपिलार्थीस देय माहिती याचे वरील परिच्छेदात केलेले विश्लेषण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ५ च्या संदर्भातील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ५ च्या संदर्भातील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. ओमप्रकाश जगन्नाथजी डागा, कोतवाली पो. स्टे. समोर, नवा मोंढा, परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प्रशासन), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता (संवसु), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८४१

निर्णय दिनांक १८-०३-२०१०

१ श्री. सावंत दत्तराव अण्णासाहेब, : अपिलार्थी
मु. पो. उखळी (बु.), ता. सोनपेठ, जि. परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,
सोनपेठ, जि. परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,
सोनपेठ, जि. परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाही.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जाची छाननी केली असता आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने एकाच माहितीसाठीच्या अर्जासाठी दिनांक ३०-०३-२००९ व दिनांक २७-०४-२००९ अशा दोन वेगवेगळ्या दिवशी आयोगाकडे दोन स्वतंत्र द्वितीय अपिले सादर केली आहेत. यापैकी अपिलार्थीच्या आयोगाकडे दाखल केलेल्या

दिनांक ३०-०३-२००९ रोजीच्या अपील अर्जावर आयोगाने दिनांक ०६-०३-२०१० रोजी सुनावणी घेऊन या संदर्भात निर्णय दिला असल्यामुळे, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर आयोगाने नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन उरत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ८४१/२००९, दिनांक २७-०४-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सावंत दत्तराव अण्णासाहेब, मु. पो. उखळी (बु.), ता. सोनपेठ, जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, सोनपेठ, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, सोनपेठ, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८४२

निर्णय दिनांक १८-०३-२०१०

१ सौ. निर्मला वामनराव पाटील, : अपिलार्थी

४७, नि.वा. कुंज, एकतानगर, तरोडा बु., नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (म. व बा.),

जिल्हा परिषद, हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्या दैनंदिनी संदर्भात सन २००५ ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ४ मुद्यांद्वारे टपालाने मागितली होती.

तथापि ही माहिती त्यांना न मिळाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांच्याकडे दिनांक २५-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची

सुनावणी न घेतल्याने अथवा या अर्जासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार न केल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (म. व बा.), जिल्हा परिषद, हिंगोली यांच्याकडे त्यांच्या दिनांक १०-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या या अर्जावर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मधील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे हे या प्रकरणी अभिप्रेत होते. परंतु उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर अधिनियमातील कलम ७ (१) मधील तरतुदीद्वारे अभिप्रेत असलेली कार्यवाही मूळात केली किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे व सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती न दिल्याचे अनुमान काढून, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांची बाजू स्पष्ट करण्यासाठी ते स्वतः अगर त्यांचा कोणताही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाही. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० (२) च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र

ठरविल्यामुळे या प्रकरणी त्यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (म. व बा.), जिल्हा परिषद, हिंगोली यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. निर्मला वामनराव पाटील, ४७, नि.वा. कुंज, एकतानगर, तरोडा बु., नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (म. व बा.), जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८४३

निर्णय दिनांक १८-०३-२०१०

१ श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव, : अपिलार्थी

मु. होंडाळा, पो. दापका (राजा), ता मुखेड, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करावी आणि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या विभागाअंतर्गत चालणाऱ्या सर्व शाळांच्या संदर्भात दिनांक १-०६-२००० ते ०१-०६-२००८ या कालावधीची व्यापक व्याप्ती असलेली माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली आणि त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ च्या संदर्भात संबंधित शाळेचे मुख्याध्यापक हे माहिती अधिकारी आहेत असे अपिलार्थीस अवगत केले व तसेच त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती देण्यासाठी अधिक कालावधी लागणार असल्याचे अपिलार्थीस स्पष्ट केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १२-०१-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेतल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडील उपलब्ध माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये आयोगाच्या असेही निदर्शनास आणले आहे की, अपिलार्थीने त्यांच्याकडील माहितीसाठीच्या अर्जासोबत जोडलेले दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र हे श्री. सुर्यवंशी विठ्ठल कोरबा यांच्या नावाचे आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी करीत असताना, ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते. तथापि त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज दाखल करतेवेळी त्यांच्या नावाचे दारिद्र्यरेषेचे प्रमाणपत्र न जोडता

श्री. सुर्यवंशी विठ्ठल कोरबा या व्यक्तीच्या नावाचे प्रमाणपत्र या अर्जासोबत जोडले आहे. हे पाहता, अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषे-खालील व्यक्ती असल्याचा सबळ पुरावा त्यांनी अर्जासोबत जोडला नाही, असे आयोगास आढळून येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, ही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती १५ दिवसाच्या आत देण्याचे आयोगास कबूल केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा केलेला अर्ज हा देखील त्यांनी अवैधरित्या केला असल्यामुळे व अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी नाकारल्याचे या घटनाक्रमामध्ये नि:संशयपणे सिध्द झाले नसल्याने, अपिलार्थीची, जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्यासाठीचे आदेश निर्गमित करण्याची विनंती, आयोग अमान्य करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव, मु. होंडाळा, पो. दापका (राजा), ता. मुखेड, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८४४

निर्णय दिनांक १८-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दिनेश शिवलाल राठोड,<br>सहजीवन नगर, विठ्ठल रुख्मीनी मंदिराजवळ, इंद्रप्रस्थ<br>लॉजच्या मागे, अंबड नाका, जालना - ४३१२०३ | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जालना | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | कार्यालय अधीक्षक, विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, जालना |
| | त्रयस्थ पक्ष | : | मुख्याध्यापक, शिवाजी पोष्ट बेसिक प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा, शिवणी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून श्री. शिवाजी प्राथमिक आश्रम शाळा शिवणी येथील स्वयंपाकी सौ. नाजुकाबाई फकिरा राठोड यांनी नौकरीवर रुजू होताना दाखल केलेल्या जन्म तारखेच्या संबंधातील पुराव्याची प्रत त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील

आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी मुख्याध्यापक, शिवाजी प्राथमिक आश्रम शाळा, शिवणी यांच्यावर दंडात्मक कारवाई करुन अपिलार्थीस माहिती न दिल्याबद्दल त्यांना निलंबीत करण्याचे आदेश पारित करावेत, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, श्री. शिवाजी पोस्ट बेसिक प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा, शिवणी यांच्या संदर्भात काही माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शाळेच्या २००६ - २००७ ते २००७ - २००८ या कालावधीतील ऑडिट रिपोर्ट, डिसेंबर २००८ चे पगार पत्रक, ८ वी ते १० वी वर्गांची तुकडी व वर्गनिहाय विद्यार्थी संख्या, सौ. नाजुकाबाई राठोड यांनी नौकरीत रुजू होताना दाखल केलेला जन्म तारखेच्या संबंधिचा पुरावा, वस्तीगृहातील मान्यता विद्यार्थ्यांची संख्या व यादी आणि शासनाकडून आश्रम शाळेला ज्या बाबींवर अनुदान मिळते त्या संदर्भात शासनाने जारी केलेल्या परिपत्रकाच्या प्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास मुख्याध्यापक, प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा, शिवणी यांनी दिनांक १२-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस पोस्टाने माहिती पुरविली. तथापि या माहितीमध्ये त्रयस्थ पक्ष सौ. नाजुकाबाई राठोड यांच्या जन्म तारखेबाबतचा पुरावा, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविला नाही. अशाप्रकारे अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याच्या कारणावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १७-०२-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस विना विलंब माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी हे आदेश मुख्याध्यापक, प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा, शिवणी यांना दिल्याचे या निर्णयावरुन दिसून येत आहे. तथापि संबंधिताने ही माहिती अपिलार्थीस न पुरविल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आयोगासमोर उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भातील माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. कारण त्रयस्थ पक्ष सौ. नाजुकाबाई राठोड या ७० वर्षाच्या असून त्यांना अद्यापपावेतो नौकरीत ठेवले गेले आहे. त्यांचा पगार अनुदानाच्या स्वरुपात शासनाकडून संबंधित संस्थेला प्राप्त होत असतो आणि सौ. राठोड या संस्था चालकांच्या पत्नी आहेत. या सर्व बाबीतील अवैधता उघड होण्यासाठी त्यांना या माहितीची आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती आणि त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली आहे. संस्थेमधील स्वयंपाकी या पदावरील नेमणूक संबंधित संस्थेच्या अध्यक्षांच्या मार्फत केली जाते व अपिलार्थीस ज्या मुद्यावर आता माहिती अपेक्षित आहे ती माहिती संबंधित संस्थेकडे उपलब्ध आहे.

संस्थेच्या मुख्याध्यापकाने असा युक्तिवाद केला की, सौ. नाजुकाबाई राठोड या ज्यावेळी त्यांच्या संस्थेकडे कामाला लागल्या त्यावेळी ही संस्था विनाअनुदानित होती. सौ. नाजुकाबाई राठोड या शिकलेल्या नसल्यामुळे त्यांनी जी जन्म तारीख संस्थेस सांगितली ती जन्म तारीख खरी असल्याचे गृहीत धरुन त्यांनी सौ. नाजुकाबाई राठोड यांना स्वयंपाकी या पदावर नेमणूक दिली आहे. सौ. नाजुकाबाई राठोड यांची सेवापुस्तिका संस्थेने ठेवली आहे.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ द्वारे मागणी केलेली माहिती मूळात अस्तित्वातच नाही व ती संबंधित जन माहिती अधिकारी व शाळेच्या मुख्याध्यापकांकडे उपलब्ध असणार नाही. सौ. नाजुकाबाई राठोड यांची स्वयंपाकी या पदावर नेमणुक कशा पध्दतीने

करण्यात आली हे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाने त्यांच्या वरील युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती देताना आता संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांच्याकडून ही वस्तुस्थिती स्पष्ट करुन घेऊन नंतर जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थीस ही माहिती, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केलेल्या संस्थेतील अवैध कारभारासंदर्भात विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी, त्यांना आवश्यक वाटल्यास, चौकशी करुन या संदर्भात पुढील कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दिनेश शिवलाल राठोड, सहजीवन नगर, विठ्ठल रुख्मीनी मंदिराजवळ, इंद्रप्रस्थ लॉजच्या मागे, अंबड नाका, जालना - ४३१२०३

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८४५

निर्णय दिनांक १८-०३-२०१०

१ श्री. दुमारे साहेबराव आनंदराव, : अपिलार्थी
मु. दहेगांव (साकूर), पो. वानोळा, ता. माहूर, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कृषि अधिकारी, कृषी कार्यालय, माहूर,
ता. माहूर, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, माहूर,
जि. नांदेड

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, माहूर, जि. नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो कोणतीही माहिती न दिल्याने आणि त्यांनी माहिती फेटाळण्यासाठीचे कोणतेही कारण न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाने सन २००७-२००८ मध्ये मौजे (साकुर) दहेगांव

येथील सर्वे नंबर ८५ मधील पाणलोट बंधाऱ्याचे कामाच्या संदर्भात माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कामाचे रक्कम, मोजमाप पुस्तिकेच्या प्रती, या संदर्भातील परिपत्रक व मजुरीचे दर - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १६-०२-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. परंतु त्यांनी त्यांच्याच कार्यालयातील जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी यांना, अपिलार्थीने ज्या कामासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली आहे अशा स्वरुपाचे काम त्यांच्या कार्यालयामध्ये सन २००७ - २००८ मध्ये झाले नाही, असे अपिलार्थीस कळविण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०३-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे, त्यांच्या कार्यालयातर्फे सन २००७ - २००८ मध्ये अशा स्वरुपाचे काम झाले नसल्याचे अपिलार्थीस कळविले. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे सन २००७-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली आहे. या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यालयाकडून अपिलार्थीने ज्या कामाच्या विषयी माहिती मागविली आहे, अशी कामे झालेली नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती

अधिकारी यांच्या मते त्यांच्या कार्यालयातर्फे सन २००७ - २००८ या कालावधीमध्ये अपिलार्थीने ज्या कामाच्या विषयी माहिती मागितली आहे अशी कामे झालेली नाहीत. परंतु तालुका कृषी अधिकारी, माहूर यांनी दिनांक २३-०१-२००९ रोजी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना दिलेल्या पत्राची प्रत अपिलार्थीस अग्रेषित केली आहे. या पत्रावरुन असे सिध्द होत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भीत केलेले काम अनधिकृतरित्या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून झालेले आहे. तालुका कृषी अधिकारी माहूर यांनी त्यांच्या या दिनांक २३-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे सन २००७ - २००८ मधील झालेल्या कामाच्या मंजूरीसाठी निधीची मागणी या पत्रामध्ये केलेली आहे. परंतु ही कामे झाली नाहीत असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. त्यामुळे या प्रकरणातील वस्तुस्थिती काय आहे, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. सबब कृषी आयुक्त महाराष्ट्र राज्य, पुणे यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या पातळीवर त्रयस्थ यंत्रणेमार्फत या प्रकरणाची सखोल चौकशी करावी. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, जर वर नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या कार्यालयातर्फे कोणतीही मंजूरी प्राप्त न करुन घेता त्यांच्या कार्यालयाकडून, अपिलार्थीने त्यांच्या अर्जान्वये निर्देशित केलेली कामे झाली असतील तर या कामाची माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दुमारे साहेबराव आनंदराव, मु. दहेगांव (साकूर), पो. वानोळा, ता. माहूर, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, माहूर, ता. माहूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, माहूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८४६

निर्णय दिनांक १८-०३-२०१०

१ श्री. सय्यद वजीर सय्यद अहमद, : अपिलार्थी

बरकतपुरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,

अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर,

तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही संबंधित जन माहिती अधिका-याने त्यांना माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर यांच्या कार्यक्षेत्रातील गायरान जमिनीसाठी

सन २००७ ते २००८ या कालावधीमध्ये किती लोकांनी, धार्मिक प्रतिष्ठान, संस्थेसाठी, व्यक्तिगत उपयोगासाठी व इतर कारणास्तव जमिनीत भोगवटा घेण्यासाठी अर्ज केले होते त्या अर्जांच्या प्रती, यापैकी किती जणांची शिफारस केली व यासंदर्भात केल्या गेलेल्या पत्रव्यवहाराच्या सत्यप्रती, याबाबत अर्जदारास लेखी सहाय्य केले असेल तर जागेचे क्षेत्रफळ, नकाशे, ठिकाण, गट क्रमांका-सहीत झेरॉक्स प्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०४-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या कालावधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरविल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०३-२०१० रोजी आवश्यक ती माहिती पोस्टाव्दारे विनामूल्य पुरविली आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले आहे की, अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयातील शिपायामार्फत देऊ केली असता अपिलार्थीने ही माहिती घेण्याचे नाकारले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमा-तील तरतुदीशी सुसंगत आहे, तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली

माहिती देण्याऐवजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे गायरान जमिनीच्या वापरास्तव आलेल्या अर्जांची यादी पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३ शी संबंधित माहितीचा यामध्ये कोणताही उल्लेख नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली कथित माहिती पाहता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी पूर्णतः विसंगत व दिशाभूल करणारी असल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना मुद्देनिहाय, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घेण्यासाठी, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वरील कालावधीमध्ये कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून ही माहिती संबंधितांकडून हस्तगत करुन घ्यावी लागेल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरवून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना, संबंधित ग्रामविकास अधिकारी श्री. उत्तम नागोराव देशमुख व श्री. जी. टी. कानडखेडकर यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सय्यद वजीर सय्यद अहमद, बरकतपुरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८४७

निर्णय दिनांक १८-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शर्मा राजेंद्र हरीनारायण,<br>संपादक, नांदेड पोलखोल, एस. पी. ऑफिसच्या मागे,<br>वजिराबाद, नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,<br>नांदेड | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली |
| | जन अपिलीय अधिकारी | : | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे रितसर प्रथम अपील दाखल केले असता त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून

कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे आणि जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याची विनंती करुन, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त होण्याचे आदेशित करावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पूर्णा या उपविभागाशी संबंधित सन २००७ ते २००८ मध्ये २०५९ व २२१६ या शीर्षाखाली प्राप्त झालेले अनुदान, झालेला खर्च, या कामांची नावे, अशी माहिती टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. परंतु त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक ०१-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पूर्णा यांना सात दिवसाच्या आत, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले व यानंतर परत दिनांक १६-१०-२००८ रोजी या विषयावर उप अभियंत्यास स्मरणपत्र पाठविले. परंतु अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांच्याकडे दिनांक २४-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली असल्याने अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी त्यांच्या दिनांक ०१-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांच्याकडे पाठवून दिला. परंतु त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेतल्यामुळे व परिणामी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती संबंधितांकडून

प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांनी पूर्णा सार्वजनिक बांधकाम उपविभागाकडून दिनांक ०१-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे संबंधित उप अभियंत्याकडून मागितली होती. यानंतर संबंधित उप अभियंत्यास दिनांक १६-१०-२००८ रोजी स्मरणपत्र देऊनही त्यांनी कार्यकारी अभियंत्यास ही माहिती न पुरविल्यामुळे ते अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पुरवू शकले नाहीत. तथापि आता त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती बरोबर आणली असून ही माहिती ते अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे, तथापि अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज कार्यकारी अभियंता यांना उद्देशून केला होता. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही उपविभागीय पातळीवरची आहे. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पूर्णा यांच्याकडे उपलब्ध होती. अशा वेळी कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाची प्रत उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पूर्णा यांच्याकडे अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत, पाठविण्याऐवजी त्यांनी दिनांक ०१-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती स्वतःकडे सादर करण्याची उपविभागीय अभियंता यांना सूचना दिली. संबंधित

उपविभागीय अभियंता, उपविभाग, पूर्णा यांनी कार्यकारी अभियंता यांच्या पत्रातील सूचनेप्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कधीही, कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नाही. परिणामी अपिलार्थी त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित राहिले. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार, अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सहायक यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे. ही तरतूद पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस अपेक्षित माहिती विहित मुदतीत प्राप्त न होण्यासाठी संबंधित उपविभागीय अभियंता (श्री. महंमद याकुब, सध्या पाथरी, जिल्हा परभणी येथे कार्यरत) हे जबाबदार असल्याचे आढळून येत आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे अशा निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. त्यांच्या अपिलार्थीस माहिती न देण्याच्या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस स्वतःला पात्र ठरविले आहे. सबब, सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना संबंधित उपविभागीय अभियंता (श्री. महंमद याकुब, सध्या पाथरी, जिल्हा परभणी येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाव्दारे पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाव्दारे पुरवावी.

३. सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना संबंधित उपविभागीय अभियंता (श्री. महंमद याकुब, सध्या पाथरी, जिल्हा परभणी येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शर्मा राजेंद्र हरीनारायण, संपादक, नांदेड पोलखोल, एस. पी. ऑफिसच्या मागे, वजिराबाद, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सार्वजनिक बांधकाम), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८४८

निर्णय दिनांक १८-०३-२०१०

१ श्री. मोहम्मद लतीफ अहमद, : अपिलार्थी
ब्लॉक नं. ७५, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड कॉलनी, शहाबाजार,
चम्पा चौक, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्र शिक्षण
विभाग, पुणे - ०१

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
पुणे - ०१

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१

त्रयस्थ पक्ष : श्री. अढागळे, श्री. गर्गे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपिलाचा निर्णय बेकायदेशीर असल्यामुळे, आणि त्यांच्या सेवेची मूळ सेवापुस्तिका त्यांना

अद्यापपावेतो प्राप्त झाली नसल्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान व शोषण थांबलेले नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २६-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०८-१०-२००८, दिनांक २९-१०-२००८ व दिनांक २९-११-२००८ रोजी केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, त्यांनी श्री. अढागळे व श्री. गर्गे यांच्याविरुध्द केलेल्या अर्जासंदर्भात कोणत्या प्रकारची कार्यवाही करण्यात आली, आणि त्यांच्या आर्थिक नुकसानीची भरपाई शासन कसे करणार - या मुद्दयांवर माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीचा अर्ज शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद यांच्याकडे पाठविला असल्याचे त्यांना कळविले. तथापि अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे दिनांक ३१-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून कोणताही निर्णय पारीत न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदा-मध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, त्रयस्थ पक्ष हजर व जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांना संबधितांनी जाणुनबुजून कमी पेन्शन मंजूर केली असल्यामुळे, त्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत

आहे आणि त्यांची मूळ सेवापुस्तिका गहाळ झाल्याबद्दल आणि त्यांना कमी सेवानिवृत्ती वेतन प्राप्त झाल्याबद्दल, संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांना योग्य ते शासन व्हावे, अशी त्यांनी आयोगास त्यांच्या युक्तिवादात अंतिमतः अपेक्षा व्यक्त केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीची मूळ सेवापुस्तिका गहाळ झाल्यामुळे, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ सेवापुस्तिकेच्या झेरॉक्स प्रतीवर आधारित अपिलार्थीचे सेवानिवृत्ती प्रकरण तयार करुन ते महालेखापालांकडे पाठविले होते, तथापि महालेखापालांनी अपिलार्थीचे सेवापुस्तिकेच्या झेरॉक्स प्रतीवर सेवानिवृत्ती वेतन निश्चित करण्याचे नाकारले, परंतु तदनंतर अपिलार्थीच्या मूळ सेवापुस्तिकेची प्रत शिक्षण संचालकाच्या कार्यालयात सापडल्यानंतर त्यांनी अपिलार्थीचे सेवानिवृत्ती प्रकरण त्यांच्या मूळ सेवापुस्तिकेसह महालेखापालांकडे दिनांक २९-०१-२०१० रोजी पाठविले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २६-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जावर शिक्षण संचालकांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. अपिलार्थीने शिक्षण संचालकाकडे त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबत तपशील मागितला असता त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत संबंधित महाविद्यालयाच्या मुख्याध्यापकाकडे पाठवून दिली. शिक्षण संचालक कार्यालयाने केलेली ही कृती सर्वथा गैर व चुकीची आहे, त्यामुळे आता यासंदर्भात अपिलार्थीच्या दिनांक ०८-१०-२००८, दिनांक २९-१०-२००८ व दिनांक २९-११-२००८ या दिनांकाच्या प्राप्त झालेल्या अर्जांवर शिक्षण संचालक यांच्या कार्यालयाने संबंधित प्राधिकरणांशी दिनांक २६-१२-२००८ पर्यंत केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या विषयासंदर्भात त्यांच्याकडील अभिलेख्यावरील असलेल्या टिपणीच्या प्रती त्यांना अपिलार्थीस पुरवाव्या लागतील. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील दुसरा मुद्दा, शिक्षण संचालकाने श्री. अढागळे व श्री. गर्गे यांच्याविरुध्द कोणत्या प्रकारची कायदेशीर कार्यवाही केली, असा आहे. या मुद्दयासंदर्भात शिक्षण संचालकांनी श्री. अढागळे व श्री. गर्गे यांच्यावर काही कारवाई केली असल्यास त्यांच्यावर

नेमकी कोणती कारवाई केली ते त्यांनी अपिलार्थीस कळवावे अथवा कोणतीही कारवाई केली नसल्यास अपिलार्थीस तसे कळवावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील तिस-या मुद्दयाव्दारे त्यांच्या आर्थिक नुकसानीची भरपाई शासन कशी करील, अशी भविष्यकाळातील व अमूर्त स्वरुपातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. अशा प्रकारची भविष्यकाळातील माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ' माहिती'च्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नसल्याने ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.

अशा प्रकारे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, त्यांनी शिक्षण संचालकाकडे केलेल्या तीन अर्जासंदर्भात शिक्षण संचालक कार्यालयाने संबंधित प्राधिकरणांशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या विषयासंदर्भातील टिपणीच्या प्रती आणि श्री. अढागळे व श्री. गर्गे यांच्यावर केलेल्या कारवाई संदर्भातील माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, त्यांनी शिक्षण संचालकाकडे केलेल्या तीन अर्जासंदर्भात शिक्षण संचालक कार्यालयाने संबंधित प्राधिकरणांशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या विषयासंदर्भातील टिपणीच्या प्रती आणि श्री. अढागळे व श्री. गर्गे यांच्यावर केलेल्या कारवाई संदर्भातील माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोहम्मद लतीफ अहमद, ब्लॉक नं. ७५, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड कॉलनी, शहाबाजार चम्पा चौक, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८४९

निर्णय दिनांक १८-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अभिमान्यू किसन झांजे,<br>मु. केकत सारणी, पो. कळमअंबा, तालुका केज,<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, केज, तालुका केज, जिल्हा बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, केज, तालुका केज,<br>जिल्हा बीड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (निवडणूक), तहसील कार्यालय, केज, तालुका केज, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक ०६-११-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाव्दारे पाठविलेला अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक १०-११-२००८ रोजी प्राप्त झाला. परंतु जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने त्यांनी दिनांक १९-१२-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिका-याने त्यांच्या अपील अर्जावर ४५ दिवसात निर्णय देणे

कायद्याने बंधनकारक असताना देखील जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे आणि आयोगास, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कार्यवाही करण्याची आणि त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ००-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, केज मतदारसंघामध्ये ०१ जानेवारी १९८७ ते ०३-११-२००८ या कालावधी-मध्ये निवडून आलेल्या आमदारांच्या संदर्भात माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - निवडून आलेल्या आमदारांनी उमेदवारी अर्ज भरतेवेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती, कागदपत्रे कोणत्या तारखेस दाखल केली, कोणत्या तारखेस मतदान होते आणि निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर कोणत्या कामासाठी किती खर्च केला यासंदर्भात त्या उमेदवारांनी सादर केलेल्या हिशोबांच्या पावत्या - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज तहसील कार्यालय, केज यांच्या जन माहिती अधिका-यास उद्देशून केला होता. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, केज यांच्याकडे दिनांक १९-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः दिनांक १५-०१-२००९ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीस अपिलार्थी गैरहजर राहिले, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १५-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे आणि या माहितीची फीस चलनाव्दारे भरुन माहिती घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि यानंतर अपिलार्थी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी कधीही

उपस्थित राहिले नाहीत आणि त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

तहसीलदार, केज यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या माहिती अधिका-याकडे या प्रकरणाशी संबंधित माहिती मागितली होती ते माहिती अधिकारी हे गेले दीड वर्ष कामावर हजर नाहीत, त्यामुळे त्यांचा अतिरिक्त कार्यभार दुस-या नायब तहसीलदाराकडे सोपविला होता, परंतु ते नायब तहसीलदार देखील आता नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असल्यामुळे, सध्या नायब तहसीलदार या पदावर कोणीही अधिकारी कार्यरत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाबरोबर ज्ञात झाली. अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांना दिनांक २४-१२-२००८ रोजी प्राप्त झाला. यानंतर त्यांनी या अपिलाची सुनावणी दिनांक १५-०१-२००९ रोजी ठेवली असता अपिलार्थी या सुनावणीसाठी गैरहजर राहिले, म्हणून त्यांनी अपिलार्थीस त्याच दिवशी त्यांना आवश्यक असलेली माहिती सशुल्क घेऊन जाण्याचे सूचित केले, तथापि अपिलार्थी ही माहिती घेऊन जाण्यासाठी त्यांच्याकडे कधीही उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आजही त्यांच्याकडे तयार असून, अपिलार्थीस ही माहिती सशुल्क देण्यासाठी ते तयार आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जतन करुन ठेवण्याच्या कालावधीसंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असा खुलासा केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जतन करुन ठेवण्याचा कालावधी पाच वर्षाचा होता, त्यामुळे त्यांना अपिलार्थीस सन २००४ आणि त्यापुढील माहिती देता येईल. यापूर्वीची माहिती जतन करुन ठेवण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्यामुळे व ती नष्ट केली असण्याच्या शक्यतेमुळे ते ही माहिती अपिलार्थीस पुरवू शकणार नाहीत.

तहसीलदार, केज यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, तहसीलदार, केज यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज तहसीलदार, केज यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी आवश्यक तो सकारात्मक प्रयत्न केला आहे, तथापि अपिलार्थी हे त्यांच्याकडील सुनावणीच्या वेळी गैरहजर राहिले, त्यामुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी काही अंशी ते जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही शीघ्र टपालाव्दारे मागितल्याचे आयोगास आढळून येत आहे, त्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे उपस्थित राहून स्वतः ती माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून सशुल्क घेऊन जाण्याची तहसीलदार, केज यांची अपेक्षा चुकीची आहे. तहसीलदार, केज यांच्या कार्यालयामध्ये नायब तहसीलदार या पदावर कोणीही अधिकारी कार्यरत नाही, याकरिता अपिलार्थीस दोषी समजता येणार नाही, त्यामुळे आता तहसीलदार, केज यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली आणि त्यांना देय असलेली व त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल. अपिलार्थीस देण्यासाठी तहसीलदार, केज यांच्याकडे तयार असलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे सकृतदर्शनी आयोगास आढळून आले आहे. सबब तहसीलदार, केज यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व शीघ्र टपालाव्दारे पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीचा दिनांक १९-१२-२००८ रोजीचा अपील अर्ज जो दिनांक २४-१२-२००८ रोजी प्रत्यक्षात प्राप्त झाला, यावर तहसीलदार, केज यांनी दिनांक १५-०१-२००९ रोजी सुनावणी ठेवली होती, परंतु त्या तारखेस अपिलार्थी गैरहजर राहिले, त्यामुळे, जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला नाही हे अपिलार्थीचे म्हणणे, चुकीचे आहे. तहसीलदार, केज यांच्या कार्यालयात माहिती अधिकारी हे पद सद्यस्थितीत रिक्त आहे, त्यामुळे अपिलार्थी म्हणतात

त्याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिका-यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईचे कोणतेही आदेश आयोग जारी करीत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. तहसीलदार, केज यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व शीघ्र टपालाव्दारे उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अभिमान्यू किसन झांजे, मु. केकत सारणी, पो. कळमअंबा, तालुका केज, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (निवडणूक), तहसील कार्यालय, केज, तालुका केज, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, केज, तालुका केज, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८५०

निर्णय दिनांक १८-०३-२०१०

१ श्री. विकास कुमार बागडी, : अपिलार्थी
नाथ गल्ली, सदर बाजार,
जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे सिंचन, जिल्हा परिषद, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, भोकरदन, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून उशीरा व अर्धवट माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या कामांच्यासंदर्भात एकूण १२ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीने हा अर्ज कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे केला होता. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती भोकरदन उपविभागाशी संबंधित असल्यामुळे कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना यांनी कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीचा दिनांक ०४-१०-२००८ रोजीचा मूळ अर्ज उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, भोकरदन यांच्याकडे दिनांक ०८-१०-२००८ रोजी पाठविला आणि अपिलार्थीस माहिती देण्याचे उप अभियंता यांना सूचित केले. या पत्राची प्रत कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थीस देऊन उप अभियंत्याशी संपर्क साधून त्यांच्याकडून माहिती घेण्याचे त्यांनी अपिलार्थीस या पत्रामध्ये सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दिनांक २९-१२-२००८ पर्यंत माहिती देण्याचे उप अभियंता यांना सूचित केले. त्याप्रमाणे उप अभियंता यांनी अपिलार्थीस दिनांक २२-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती अर्धवट असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उशीरा माहिती दिली आहे व दिलेली माहिती अर्धवट आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १२ शी संबंधित माहिती प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २२-१२-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १२ शी संबंधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी असाही युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे अंबड उपविभागाची माहिती मागितली होती, तथापि त्यांचे कार्यक्षेत्र भोकरदन असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस अंबड विभागाशी संबंधित माहिती पुरविली नाही. यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी भोकरदन उपविभागाचा अर्ज त्यांना दिला त्याप्रमाणे त्यांनी भोकरदन उपविभागाची माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०४-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या एकूण १२ मुद्दयांवरील माहितीपैकी त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ५, ७, ८, १० व ११ या मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण या मुद्दयांव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. अशा प्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याने ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २२-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, यामध्ये मुद्दा क्रमांक १२ व्यतिरिक्त जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती विनामूल्य पुरविल्याचे व ती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १२ व्दारे, ' जून २००६ ते ऑगस्ट २००८ या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे किती टेंडर मंजूर करण्यात आलेले आहेत, ' याची माहिती मागितली होती, तथापि टेंडर मागविणे आणि कामाचे टेंडर मंजूर करणे याबाबतची कार्यवाही उपविभाग स्तरावर निश्चित केली जात नसल्यामुळे आणि अपिलार्थीने कार्यकारी अभियंता यांच्याकडे माहिती मागितल्याने उप अभियंता यांनी अपिलार्थीस ही माहिती पुरविली नाही. या प्रकरणी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार उप अभियंता यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत परत कार्यकारी अभियंता यांच्याकडे पाठवून अपिलार्थीस या पत्राची प्रत देणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कृती या प्रकरणी केल्याचे आयोगास आढळून येत नाही. मूळात या प्रकरणी कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थी-च्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे योग्य प्रकारे वाचन न करता अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज घाईघाईने उप अभियंत्याकडे पाठवून दिला. जी माहिती कार्यकारी अभियंता यांनी त्यांच्या स्तरावरुन अपिलार्थीस देणे भाग होते ती त्यांनी अपिलार्थीस दिली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. तथापि या प्रकरणी ही बाब कार्यकारी अभियंता यांच्या निदर्शनास न आणल्यामुळे आणि परिणामी अपिलार्थी हे अपेक्षित माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिल्यामुळे आता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १२ शी संबंधित माहिती उप अभियंता यांना अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल. ही माहिती त्यांनी कार्यकारी अभियंता यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन व त्यांच्या स्तरावरील माहिती लक्षात घेऊन त्यासह ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १२ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विकास कुमार बागडी, नाथ गल्ली, सदर बाजार, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८५१

निर्णय दिनांक १८-०३-२०१०

१ श्री. सदाशिव काशीनाथअप्पा कुदमूळे, : अपिलार्थी
गवळी गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक,
सहकारी संस्था, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक निबंधक,
सहकारी संस्था, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

तत्कालीन : जन माहिती अधिकारी : प्रशासक, प्रियदर्शनी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

त्रयस्थ पक्ष : प्रशासक, प्रियदर्शनी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित, सेलू, जिल्हा परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, त्रयस्थ पक्ष गैरहजर व जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन अपिलीय अधिकारी श्री. पंढरीनाथ तुकाराम घुगे यांनी, अपिलार्थीच्या त्यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक १५-०३-२०१० रोजीच्या पत्राची प्रत आयोगास सादर केली असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना या प्रकरणाशी संबंधित संपूर्ण माहिती विनामूल्य प्राप्त झाली असल्यामुळे त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढावे अशी सहायक निबंधक, सहकारी संस्था, सेलू यांना विनंती केली आहे.

आजच्या सुनावणीस अपिलार्थी गैरहजर आहेत, आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्या-कारणामुळे अपिलार्थीस विचाराधीन अपील चालविण्यामध्ये स्वारस्य नसावे, असे अनुमान काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक ८५१/२००९, दिनांक १३-०४-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सदाशिव काशीनाथअप्पा कुदमूळे, गवळी गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२ प्रशासक, प्रियदर्शनी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११२३
निर्णय दिनांक १९/०३/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अब्दूल रहेमान ईस्माईल मलंग,<br>रा.दबीरपुरा, उदगीर, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, उदगीर, जि. लातूर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, उदगीर, जि.लातूर | | |

**निर्णय**

श्री. अब्दूल रहेमान ईस्माईल मलंग यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २९.०६.२००९ रोजी केलेले दि.०२.०७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. २६.१२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २९.०१.२००९ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर सुनावणी घेऊन दि.२१.०३.२००९ रोजी निर्णय दिला. तथापि यानंतर प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ११ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे.

सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अब्दूल रहेमान ईस्माईल मलंग, रा.दबीरपुरा, उदगीर, ता.उदगीर, जि.लातूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११२४
निर्णय दिनांक १९/०३/२०१०

१ श्री. संतोष यल्हाजी बांगर, : अपिलार्थी
रा.मंगळवारा बाजार, हिंगोली.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपजिल्हाधिकारी (रोहयो),
जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली.

**निर्णय**

श्री. संतोष यल्हाजी बांगर यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०४.०७.२००९ रोजी केलेले दिनांक १०.०७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १६.०१.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २७.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संतोष यल्हाजी बांगर, मंगळवारा बाजार, हिंगोली.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८६८
निर्णय दिनांक: १९-०३-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. महात्मा ज्योतिबा फुले सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, धुळे | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०७.२००८ रोजी फेरसादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी श्री. भाईदास भिलाजी चौधरी यांनी दि.०९.१०.२००६ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी, तालुका उपनिबंधक कार्यालय, धुळे यांच्याकडे महात्मा ज्योतिबा फुले सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, धुळे या संस्थेविषयी काही माहिती मागितली होती. संबंधित संस्थेस दि.१३.११.२००६ रोजी माहिती देण्याचे सूचित करुनही संस्थेकडून माहिती प्राप्त न झाल्याने श्री.चौधरी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.०१.१२.२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका धुळे यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ०६.०१.२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी श्री. चौधरी यांनी मागणी केलेली माहिती योग्य ते शुल्क आकारुन तात्काळ उपलब्ध करुन देण्याचे चेअरमन, महात्मा फुले सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, धुळे यांना आदेशित केले. जन

अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका धुळे हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जात असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेले आदेश पूर्णतः चुकीचे व बेकायदेशीर आहेत. सदर संस्था माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीच्या कार्यकक्षेबाहेर आहे. त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका धुळे यांच्या दि.०९.०१.२००७ रोजी प्राप्त झालेल्या आदेशाविरुध्द विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. येथे, विचाराधीन अपिलासंदर्भात, मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांच्याकडील रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, <u>wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the</u>**

**meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'सार्वजनिक प्राधिकरण' असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे, त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित गृहनिर्माण संस्थेस लागू होत नसल्याने उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका धुळे यांचे दि.०६.०१.२००७ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका धुळे यांचे दि.०६.०१.२००७ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः १९-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. महात्मा ज्योतीबा फुले सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, धुळे, ता.जि.धुळे

२. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका धुळे.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**अपील क्रमांक ६०१/२००९ व ६०२/२००९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६०१ व ६०२

निर्णय दिनांक १९-०३-२०१०

१ श्री. अल्लाउद्दीन खान पाशा खान, : अपिलार्थी

रा. अरमान कटपीस सेंटर, यासीन मस्जीद, कटकट गेट,

औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

अपील क्रमांक : ६०१/२००९ त्रयस्थ पक्ष : १) मुख्याध्यापक, दौलत प्राथमिक शाळा, कटकट गेट, औरंगाबाद

२) युसूफ हायस्कूल, मिसरवाडी, औरंगाबाद

अपील क्रमांक : ६०२/२००९ त्रयस्थ पक्ष : मुख्याध्यापक, जय शिवराय एज्युकेशन सोसायटी, दौलत प्रायमरी शाळा, युसूफ हायस्कूल

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०३-२००९ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेली ही दोन स्वतंत्र द्वितीय अपिले एकाच विषयाशी संबंधित असून, या दोनही अपिलांचा विषय एकच आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जय शिवराय एज्युकेशन सोसायटी संस्थेअंतर्गत दौलत प्रायमरी शाळा, कटकट गेट, औरंगाबाद व युसूफ हायस्कूल, मिसारवाडी या दोन शाळेसंदर्भात - या शाळेमध्ये सन २००२ ते २००७ पर्यंत सेवेत कार्यरत असलेल्या शिक्षकांची हजेरी मस्टरची प्रत, शाळेच्या मान्यतेसाठी दाखल केलेल्या संपूर्ण कागदपत्राची प्रत आणि शिक्षकांना सेवेतून कमी केल्याचे कारण व त्याबाबत माहिती - अशी त्यांच्या शाळेची सन २००२ - २००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीस अपेक्षित माहिती संबंधित शाळेकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने या मुद्यावर अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०८-२००८ रोजी या संदर्भात दोन स्वतंत्र प्रथम अपिले केली. या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ८ दिवसात माहिती देण्याचे संबंधित शाळेचे मुख्याध्यापक तथा जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या नंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेली विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

या दोनही प्रकरणाची एकत्रित सुनावणी आज दिनांक १९-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले आहे की, अपिलार्थीने ज्या शाळेच्या विषयी ही माहिती मागविली आहे त्या शाळा कायम स्वरुपी विनाअनुदानित आहेत. त्या शाळांना शासनाकडून कोणतेही अर्थसहाय्य केले जात नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने ज्या शाळेशी संबंधित माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत माहिती मागितली आहे त्या दोनही शाळा कायमस्वरुपी विनाअनुदानित आहेत. त्यांना शासनाकडून कोणत्याही प्रकारचे भरीव अर्थसाहय्य प्राप्त होत नाही आणि या शाळेवर शासनाचे सरळ नियंत्रण नाही. अशा प्रकारच्या विनाअनुदानित संस्थेबाबत मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांच्याकडील याचिका क्रमांक ५१३९/२००८, नगर युवक शिक्षण संस्था व यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी कॉलेज, वनडोंगरी नागपूर विरुध्द राज्य माहिती आयोग नागपूरच्या संदर्भात दिनांक २०-०८-२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये त्यांनी अशा प्रकारच्या विनाअनुदानित संस्था माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या 'सार्वजनिक प्राधिकरण' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नसल्यामुळे त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूद लागू होणार नाही, असा निर्णय दिला आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या वरील निर्णयाचे अवलोकन करता, अपिलार्थीने या प्रकरणी ज्या संस्थेविषयी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत माहिती मागितली आहे, त्या संस्थेस अधिनियमातील तरतूदी लागू होत नसल्यामुळे, अपिलार्थीची विचाराधीन अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. ६०१/२००९ व ६०२/२००९ फेटाळण्यात येत आहेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अल्लाउद्दीन खान पाशा खान, अरमान कटपीस सेंटर, यासीन मस्जीद, कटकट गेट, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६०३

निर्णय दिनांक १९-०३-२०१०

१ श्री. केशवराव पाटीलबा डापके, : अपिलार्थी
रा. खेडी (लिहा), ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय,
सिल्लोड, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे खेडी (लिहा), ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद येथील गट क्रमांक ५६० या शेत जमिनीत झालेल्या शाळा खोल्यांच्या बांधकामाबाबत काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शाळा खोल्यांच्या बांधकामास मिळालेली

मंजूरी, निविदा, बांधकाम करणाऱ्या ठेकेदाराचे नाव, काम सुरु व पुर्ण झाल्याचे दिनांक, बांधकामाचे निकष व संबंधित जमीन मालकाने दिलेल्या दानपत्राची सत्यप्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक ०४-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०१-२००९ रोजी निर्णय पारित करुन अपिलार्थीस विलंबाने माहिती दिल्याबद्दल जबाबदार कर्मचारी / अधिकारी यांच्यावर कार्यवाही करण्याचे आदेश दिले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. परंतु अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीचे प्रतिनिधी श्री. वाजेद खान यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून खरी माहिती प्राप्त झालेली नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती पुरविली असून, त्यांना प्राप्त झालेली माहिती ही चुकीची आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी असे कळविले आहे की, मौजे खेडी (लिहा) येथील शेत गट नंबर ५६० मध्ये शाळेचे बांधकाम झालेले नाही. तथापि त्यांना ग्रामपंचायतीकडून या बांधकामासंदर्भात अशी माहिती मिळाली आहे की, गट नंबर ५६० मध्ये या शाळेचे बांधकाम झाले आहे. या दोनही माहितीतील विसंगती पाहता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खोटी माहिती दिली आहे, असे त्यांना वाटत आहे. ही माहिती त्यांना संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाकडून प्राप्त झालेली आहे.

जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडील गट नंबर ५६० मध्ये केलेल्या शाळेच्या बांधकामासंदर्भात माहिती मागितली होती. तथापि त्यांनी गट नंबर ५६० मध्ये शाळेचे कोणतेही बांधकाम केलेले नाही व तसे त्यांनी अपिलार्थीस दिनांक १०-१२-२००८ रोजी कळविले आहे. अपिलार्थीने संदर्भीत केलेले बांधकाम गट नंबर ५५८ मध्ये झाले आहे आणि तसे पत्र त्यांना संबंधित ग्रामसेवकाने दिनांक ०६-१२-२००८ रोजी दिलेले आहे. अपिलार्थीने संदर्भित केलेले काम सर्वे नबंर ५५८ मध्ये झाले असून, या कामात त्यांनी संबंधित जमीन मालकाची सहमती घेतल्याची व सर्वे नंबर ५५८ चे पत्र ग्रामपंचायतीला दिल्याची आणि ७/१२ च्या उताऱ्यावरील नोंद आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना देण्यासंदर्भात संबंधित गट शिक्षणाधिकारी, श्रीमती व्ही. पी. टाकळकर यांनी अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीमध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये प्रतिसाद देणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कृती केल्याचे आयोगास आढळून येत नाही. त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास प्रथम प्रतिसाद, दिनांक ०४-११-२००८ रोजी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर दिलेला आहे. या प्रकरणी आयोगास पुढे असेही आढळून आले आहे की, तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत खेडी (लिहा) यांनी या शाळेच्या बांधकामाच्या गट क्रमांकाबाबत अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांना अनुक्रमे दिनांक ०२-०२-२००८ व ०६-१२-२००८ रोजी परस्पर विरोधी माहिती देऊन या प्रकरणामध्ये संभ्रम निर्माण केलेला आहे. त्यामुळे या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यामार्फत या शाळेचे बांधकाम नक्की कोणत्या गट क्रमांकामध्ये झाले आहे याची तपासणी करुन या संदर्भात तातडीने अपिलार्थीस सत्य माहिती उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. तसेच मौजे खेडी (लिहा) या ग्रामपंचायतीच्या तत्कालीन ग्रामसेवकाने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थी व जन माहिती

अधिकारी यांना विसंगत स्वरुपाची माहिती दिली असल्यामुळे, त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी, अशी त्यांना शिफारस करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे दिनांक ३०-१०-२००८ रोजी अगर तत्पूर्वी जन माहिती अधिकारी यांनी माहिती देणे अपेक्षित असताना, अपिलार्थीस, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत मागणी केलेली माहिती, त्यांना विहित मुदतीत न देता ती विलंबाने पुरवून तत्कालीन गट शिक्षणाधिकारी श्रीमती व्ही. पी. टाकळकर (सध्या मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्रशाला हायस्कूल, फुलंब्री या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीने मागणी केलेल्या बांधकामाच्या जागेच्या गट क्रमांकाची निश्चिती झाल्यानंतर ७ दिवसाच्या आत संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने संदर्भीत केलेल्या बांधकामाच्या गट क्रमांकाची निश्चिती झाल्यानंतर ७ दिवसाच्या आत अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती व्ही. पी. टाकळकर (सध्या मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्रशाला,

फुलंब्री येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. केशवराव पाटीलबा डापके, खेडी (लिहा), ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, सिल्लोड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६०४

निर्णय दिनांक १९-०३-२०१०

१ श्री. शेख सादेख शेख वाहेद, : अपिलार्थी
रा. फुलेनगर, न्यू मोंढा, गौसीमा मस्जीदजवळ, केज,
ता. केज, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षण विभाग,
शिक्षण कार्यालय, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
शिक्षण विभाग, परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी

त्रयस्थ पक्ष : कामेल उर्दू एज्युकेशन सोसायटी संचलित, कामेल उर्दू प्राथमिक शाळा

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपेक्षित माहितीपासून वंचित ठेवून, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा भंग केला असल्यामुळे त्यांच्यावर जास्तीत जास्त शास्ती लावण्याची कार्यवाही करुन अपिलार्थीने मागणी

केलेली माहिती त्यांना विनामूल्य व तात्काळ देण्याचे आदेशित करावे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २२-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामेल उर्दू एज्युकेशन सोसायटी परभणी अंतर्गत कामेल उर्दू प्राथमिक शाळा, युसूफ कॉलनी या शाळेतील स्थापनेपासून ते अपिलार्थीने अर्ज करेपर्यंतच्या कालावधीमध्ये संबंधित संस्थेने किंवा शाळेने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दाखल केलेल्या कर्मचाऱ्यांच्या "रुजू आदेशाच्या" सत्यप्रती, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत त्यांनी दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक संच मान्यतेच्या (APPROVAL) वर्षनिहाय सत्यप्रती, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी शाळा स्थापनेपासून ते दिनांक २२-११-२००८ पर्यंतचा होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शिघ्र टपालाद्वारे मागितली होती .

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २९-१२-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण स्वरुपात व विलंबाने माहिती प्राप्त झाली आहे. त्यांना प्राप्त झालेली माहिती त्यांनी मूळ अर्जामध्ये विनंती केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी सत्यप्रतीत दिलेली नाही. या कारणास्तव

त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही करावी व तसेच त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो द्यावयाची राहिलेली माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे वैयक्तिक संच मान्यता (APPROVAL) अशी माहिती मागितली आहे. शिक्षण विभागातर्फे अशाप्रकारे APPROVAL एकदाच दिला जातो, मात्र वैयक्तिक संच मान्यता या दरवर्षी दिल्या जातात. अपिलार्थीने ज्या संस्थेविषयी माहिती मागितली आहे ती संस्था १९९४ साली स्थापन झाली असून, तिला २००१ मध्ये शासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे त्यांच्या विभागामार्फत या शाळेस सन २००१ ते २००८ याच कालावधीमध्ये वैयक्तिक संच मान्यता दिलेली आहे. संस्थेकडून त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या सर्व रुजू आदेशाच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०६-२००९ रोजी पुरविल्या आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती जरी अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असली तरी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ द्वारे अपिलार्थीस सर्व कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक संच मान्यतेच्या प्रती हव्या आहेत की त्यांच्या नेमणूकीच्या मान्यतेच्या प्रती हव्या आहेत, हे यावरुन स्पष्ट होत नाही. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस, या संस्थेच्या सन २००१ ते २००८ या कालावधीतील सर्व कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक संच मान्यतेच्या सांक्षाकित प्रती पुरवाव्या लागतील, यापैकी काही प्रती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०६-२००९ रोजी पुरविल्या आहेत व उर्वरित प्रती अपिलार्थीस एक महिन्याच्या आत पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास आश्वासित केले आहे. याच बरोबर अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, जर त्यांना संस्थेकडून अद्यापपावेतो सन २००१ ते २००८ या कालावधीमधील रुजू आदेशाच्या प्रती प्राप्त होणे बाकी असेल तर त्यांनी या आदेशाच्या प्रती संबंधित संस्थेकडून किंवा शाळेकडून तात्काळ मागवून घ्याव्या व त्या अपिलार्थीस विनामूल्य पुरवाव्यात.

शासनाच्या शिक्षण विभागातर्फे अशाप्रकारच्या शाळांना दरवर्षी नियमीत अनुदान दिले जाते. या शाळांतील शिक्षकांचे वैयक्तिक मान्यतेचे आदेश संबंधित जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी हे दरवर्षी देत असतात. या शाळांमध्ये दरवर्षी शिक्षकांच्या नवीन नेमणुका होत असतात. या नेमणुकांना जिल्हा परिषद शिक्षण विभागातर्फे मान्यता दिली जाते. तथापि यानंतर सदर शिक्षक या शाळांमध्ये प्रत्यक्षात रुजू होतात किंवा कसे हे समजण्यासाठी शिक्षण विभागामध्ये कोणतीही व्यवस्था अस्तित्वात नाही, असे आयोगास आढळून येत आहे. प्रचलित व्यवस्थेतील या उणिवेचा आधार घेऊन एखाद्या शिक्षकाच्या नेमणूकीची मान्यता घेऊन नंतर त्यांचा पगार काढून संबंधितांच्या पगाराच्या रकमेचा अपहार होण्याची शक्यता येथे नाकारता येत नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या शाळांनी दरवर्षी केलेल्या शिक्षकांच्या नेमणूका, त्यांच्या वैयक्तिक संचेच्या मान्यतेच्या प्रती व त्यांना देण्यात येणारे वेतन या तीनही बाबींचा एकमेकांशी ताळमेळ साधण्याकरिता एखादी कायमस्वरुपी व्यवस्था शिक्षण विभागाने निर्माण केल्यास अशाप्रकारच्या प्रवृत्तीस आळा बसून शासनाच्या निधीचा अपव्यय थांबविता येईल, असे आयोगाचे मत आहे. या मताचा शिक्षण सचिवांनी त्यांच्या स्तरावर विचार करुन या संदर्भात आवश्यक ती उपाययोजना करावी, असे त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (८) (क) (चार) मधील तरतुदीनुसार सूचविण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास संबंधीत जन माहिती अधिकारी (श्री. एम. ए. पवार, सध्या शिक्षण उपसंचालक, लातूर) यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थीने सत्यप्रतीत माहिती मागितली असताना देखील त्यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती साक्षांकित करुन दिलेली नाही. त्यामुळे ते माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत.

उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस अशाप्रकारे अपूर्ण व विलंबाने माहिती देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल शिक्षण संचालक, पुणे यांना संबंधित शिक्षणाधिकारी तथा जन माहिती अधिकारी आणि या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व

सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. शिक्षण संचालक, पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख सादेख शेख वाहेद, फुलेनगर, न्यू मोंढा, गौसीमा मस्जीदजवळ केज, ता. केज, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षण संचालक (प्राथमिक व माध्यमिक) शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ.

बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटलजवळ, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (शालेय शिक्षण), मंत्रालय, मुंबई - ४०००३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६०५

निर्णय दिनांक १९-०३-२०१०

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, : अपिलार्थी

रा. मुळे गल्ली, शिवाजी रोड, पूर्णा, ता. पूर्णा, जि. परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), सर्व शिक्षा अभियान कार्यालय,

जिल्हा परिषद, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी

जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी

त्रयस्थ पक्ष : श्री. बी.आर. देसाई चुडावेकर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये एप्रिल २००४ ते मार्च २००८ या कालावधीमध्ये, सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत केल्या जाणाऱ्या बांधकामासंदर्भात एकूण ३ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जिल्हा परिषद सदस्य श्री. बी. आर. देसाई चुडावेकर यांच्या दिनांक ०६-०८-२००७ रोजीच्या मूळ तक्रार अर्जाची छायांकित सत्यप्रत, सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत चालू असलेल्या बांधकामासंदर्भात ग्राम शिक्षण समितीने करावयाच्या करार पत्राबाबत शासनाचे परिपत्रक अथवा शासनाच्या निर्णयाची छायांकित सत्यप्रत व सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत होत असलेली बांधकामे बदली कर्मचाऱ्यांच्यांकडे हस्तांतरित करता येतात काय? असल्यास त्याबाबतचे शासन परिपत्रक - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे दिनांक १८-०९-२००८ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-११-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-११-२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगाकडे फॅक्सद्वारे पाठविला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ मध्ये बांधकामासंदर्भात ग्राम शिक्षण समितीने करावयाचे करारपत्राबाबत परिपत्रक त्यांनी मागितले होते. परंतु त्यांना जन माहिती अधिकारी यांनी ग्राम शिक्षण समितीच्या रचनेबाबत माहिती पुरविली आहे व तसेच त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत होत असलेली बांधकामे बदली कर्मचाऱ्यांकडे हस्तांरित होत असल्यास त्या संदर्भातील शासन निर्णयाची व परिपत्रकाची छायांकित प्रत त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २५-११-२००८ रोजी संपूर्ण माहिती पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीची प्रत आयोगास सादर केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत करण्यात येणारे बांधकाम करताना संबंधितांनी करावयाच्या प्रारुप करारपत्राच्या छायांकित प्रतीचा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीमध्ये समावेश आहे. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २५-११-२००८ रोजी पुरविलेल्या माहितीमध्ये योग्य ती माहिती पुरविली आहे, असे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, या योजनेअंतर्गत करण्यात येत असलेले बांधकाम ही एक ठराविक कालावधीसाठी चालू राहणारी प्रक्रिया आहे. असे बांधकाम एखाद्या विशिष्ट ग्रामसेवकाच्या देखरेखीखालीच पूर्ण करुन घ्यावयाचे असे शासनाचे कोणतेही निर्णय अथवा आदेश मूळात अस्तित्वात असणे संभवत नाही. बांधकाम देखरेख करणारे कर्मचारी आणि त्यांच्या विविध कारणास्तव होणाऱ्या त्यांच्या बदल्या, नेमणूका या प्रक्रियेचा बांधकामाच्या प्रक्रियेशी अर्थाअर्थी कोणताही संबंध नसल्यामुळे अशा प्रकारचे बांधकाम हे बदली ग्रामसेवकाकडून करुन घेण्यास कोणताही प्रत्यवाय नाही. या संदर्भात आवश्यक तो

प्रशासकीय निर्णय संबंधित शासन यंत्रणेने परिस्थितीनुरुप घ्यावयाचा आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २५-११-२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेली माहिती योग्य आहे, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २५-११-२००८ रोजी पुरविलेल्या माहितीमध्ये समावेश आहे. हे पाहता, अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देणे बाकी नाही, असे आयोगास आढळून येत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती त्यांना साक्षांकित करुन दिली नसल्याचेही यावेळी आयोगास आढळून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत साक्षांकित स्वरुपात विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. राम इघारे तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १८-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत सांक्षाकित स्वरुपात विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना संबंधित उपशिक्षणाधिकारी तथा जन माहिती अधिकारी श्री. राम इघारे यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, मुळे गल्ली, शिवाजी रोड, पूर्णा, ता. पूर्णा, जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६०६

निर्णय दिनांक १९-०३-२०१०

१ श्री. बनकर देवचंद सर्जेराव : अपिलार्थी

रा.अण्णाभाऊ साठे समाज मंदीराजवळ, हर्सुल, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

विभागीय सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक

विभागीय मंडळ, ओरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च

माध्यमिक विभागीय मंडळ, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : विभागीय सहायक सचिव, महाराष्ट राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातर्फे नेमले गेलेले रोजंदार सहायक व कामगार, पुरवठा करणाऱ्या बदली कामगांराचे हजेरी पत्रक, संबंधित कंत्राटदारांने त्यांच्या भविष्य निर्वाह निधीची भरलेली रक्कम व निविदेची प्रत, अशी माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस टपालाद्वारे माहिती पाठविली. तथापि ही माहिती अपिलार्थीने न स्वीकारल्यामुळे ती जन माहिती अधिकारी यांना पोस्टामार्फत दिनांक ०९-०२-२००९ रोजी परत प्राप्त झाली. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०३-२००९ रोजी सुनावणीसाठी त्यांच्या दिनांक २४-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे बोलाविले, तथापि हे पत्र देखील पोस्टाकडून दिनांक ०७-०३-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांना, या पत्राचा अपिलार्थीने स्वीकार न केल्यामुळे परत प्राप्त झाले. यानंतर परत या अपील अर्जावर दुसरी सुनावणी घेण्यासाठी अपिलार्थी तयार आहे काय, अशी विचारणा जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे केली. तथापि हे पत्र देखील पोस्टाकडून जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक २४-०३-२००९ रोजी परत आले. त्यामुळे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०४-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील खारीज केले. तथापि मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त झाली नसल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे युक्तिवाद करुन अपिलार्थीस त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती देऊ केली असता, ही माहिती स्वीकारण्याचे अपिलार्थीने नाकारले तसेच या संदर्भात त्यांच्याकडे झालेल्या प्रथम अपिलाच्या सुनावणीचे पत्र देखील पोस्टाकडून परत प्राप्त झाल्याने त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढल्याचे आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आता बरोबर आणली असून, ही माहिती त्या अपिलार्थीस विनामूल्य देण्यासाठी तयार आहेत. अपिलार्थीने आयोगासमोर ही माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात आज दिनांक १९-०३-२०१० रोजी ४ वाजता स्वीकारण्याचे मान्य केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने माहितीसाठीच्या केलेल्या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. तथापि या संदर्भातील कोणताही सबळ पुरावा त्यांनी त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडलेला नाही. मूळ अर्जासोबत त्यांनी जोडलेल्या रेशन कार्डच्या छायांकित प्रतीचे अवलोकन केले असता, ही प्रत कोणत्याही राजपत्रित अधिकाऱ्याने साक्षांकित केल्याचे आयोगास आढळून येत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापूर्वी अपिलार्थी खरोखरीच दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे याची शहानिशा करुन घ्यावी व जर अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नसतील तर त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना सशुल्क अन्यथा विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना, आज दिनांक १९-०३-२०१० रोजी वरील निर्णयामध्ये सूचित केल्याप्रमाणे उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बनकर देवचंद सर्जेराव, अण्णाभाऊ साठे समाज मंदीराजवळ, हर्सुल, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहायक सचिव, महाराष्ट राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६०७

निर्णय दिनांक १९-०३-२०१०

१ श्रीमती प्रिया यशवीर यादव, : अपिलार्थी
ए-९, चौधरी स्टेट, म्हस्के पाटील पेट्रोलपंपाजवळ,
बीड बायपास रोड, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा डी. डी. आर. ऑफिसर, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपनिबंधक (जिल्हा), सहकारी संस्था, डी. डी. आर.
कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद
त्रयस्थ पक्ष : चैतन्य गगनगिरी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त न झाल्याने आणि त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष ' चैतन्य गगनगिरी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित ' यांच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या संस्थेचा २००७ ते जानेवारी २००८ या कालावधीतील लेखा परीक्षण अहवाल आणि संस्थेच्या संचालक मंडळाची नावे व संपूर्ण पत्ते - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०५-२००८ रोजी, अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे, जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी हजर व त्रयस्थ पक्ष गैरहजर आहे.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो कोणतीही माहिती दिली गेली नाही. त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिल्या असता, संबंधितांनी त्यांना माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असून, ती अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०२-२००८ रोजी व्यक्तिशः उपलब्ध करुन दिली आहे. यावर आयोगाने जन माहिती अधिका-यास यासंदर्भातील पुरावा सादर करण्याचे सूचित केले असता, जन माहिती अधिकारी असा पुरावा आयोगासमोर सादर करु शकले नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक १६-०५-२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. त्यांच्या या विधानापुष्ट्यर्थ त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील निर्णयाची प्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय दिल्याचे सिध्द होत आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असून, तिची व्याप्ती व स्वरुप अत्यंत मर्यादित आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये या संस्थेचे सन २००७-०८ चे लेखा परीक्षण झाले नसल्याने, ती माहिती त्यांना अपिलार्थीस देता येणार नाही असे स्पष्ट केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या वस्तुस्थितीवरुन, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्रयस्थ पक्षाच्या लेखा परीक्षणासंदर्भात मागितलेली माहिती ही आज रोजी मूळात अस्तित्वात नसल्याने, ती अपिलार्थीस प्राप्त होऊ शकणार नाही, तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्दयांवरील - सर्व संचालक मंडळाची नावे व पत्ते ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देणे सहज शक्य आहे. त्यांनी, जरी त्यांच्या युक्तिवादामध्ये ही माहिती अपिलार्थीस दिल्याचे स्पष्ट केले असले तरी, यासंदर्भात ते आयोगास कोणताही सबळ पुरावा सादर न करु शकल्यामुळे त्यांचा, अपिलार्थीस माहिती दिल्याचा युक्तिवाद, आयोग अमान्य करत आहे, आणि जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील, संचालक

मंडळाच्या नावासंदर्भात मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे त्यांना या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाव्दारे अपेक्षित असलेली माहिती त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपरोक्त कालावधीमध्ये, कोणत्याही कार्यालयीन दिवशी, पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून ती संबंधितांकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात् या प्रकरणी असे आढळून आले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी, जरी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक २१-०५-२००८ रोजी त्यांचे आदेश पारीत केले असले तरीही, त्यांनी या आदेशाची प्रत अपिलार्थीस दिलेली नाही. त्यांची ही कृती चुकीची आहे. तेव्हा इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय दिल्यानंतर सदर निर्णयाची प्रत अपिलार्थीस व सर्व संबंधितांना न चुकता पाठविली जाईल याची दक्षता घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील, चैतन्य गगनगिरी नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळाची नावे व पत्ते ही माहिती, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक १९-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती प्रिया यशवीर यादव, ए-९, चौधरी स्टेट, म्हस्के पाटील पेट्रोलपंपाजवळ, बीड बायपास रोड, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था तालुका औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६०८

निर्णय दिनांक १९-०३-२०१०

१ श्री. मनोहर गणपतराव गरुडकर, : अपिलार्थी

रा. रेणुकामाता मंदिराजवळ, गांधीनगर, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना

त्रयस्थ पक्ष : रेणुकादेवी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये, अपिलार्थीने त्यांना कोणत्याही प्रकारे संबंधित प्राधिकरणाकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष रेणुकादेवी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, गांधीनगर, जालना या संस्थेच्या एकूण शेअर्स सभासदांची व नाममात्र सभासदांच्या यादीची प्रत आणि एकूण सभासद

कर्ज व नाममात्र सभासद कर्ज यादी, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन सहकार आयुक्त तथा निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक ०८-०२-२००६ रोजीच्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनेचा आधार घेऊन अपिलार्थीस माहिती नाकारली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांच्याकडे दिनांक १७-०४-२००८ रोजी या टप्प्यावर प्रथम अपील करण्याऐवजी त्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जातील माहिती परत मागितली. अपिलार्थीने मूळात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले नसल्यामुळे, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय झाला नाही. परंतु यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या-कडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही अपिलार्थी ही माहिती घेण्यासाठी कधीही उपस्थित झाले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते संबंधित पतसंस्थेकडून महाराष्ट्र सहकार अधिनियम १९६० च्या कलम ७९ चा वापर करुन प्राप्त करुन घेतील आणि नंतर ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवतील.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थीस प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उघड करण्याचे नाकारले आहे. अपिलार्थीस माहिती नाकारताना त्यांनी सहकार आयुक्त तथा निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक ०८-०२-२००६ रोजीच्या आदेशाचा संदर्भ दिला आहे. तथापि येथे असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियम २००५ हे संबंधित पतसंस्थेला लागू नाही याचा अर्थ तो जन माहिती अधिकारी यांना लागू नाही असा होत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना महाराष्ट्र सहकार अधिनियम १९६० मधील कलम ७९ च्या तरतुदीप्रमाणे संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेता येते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील तरतुदीशी सुसंगत आहे, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ नुसार देणे भाग आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, आणि ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय असू शकत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मनोहर गणपतराव गरुडकर, रा. रेणुकामाता मंदिराजवळ, गांधीनगर, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६०९

निर्णय दिनांक १९-०३-२०१०

१ श्री. सुभाष विठ्ठलराव मुळके, : अपिलार्थी
नवीन वसाहत, हडोळती, तालुका अहमदपूर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, अहमदपूर,
तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, अहमदपूर,
तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

तत्कालीन जन माहिती अधिकारी : चेअरमन, डायमंड मजूर सहकारी संस्था मर्यादित
हडोळती, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

त्रयस्थ पक्ष : चेअरमन, डायमंड मजूर सहकारी संस्था.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबधित जन माहिती अधिकारी यांच्यावर रोख दंडाची व शिस्तभंगाची कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष डायमंड मजूर सहकारी संस्था, हडोळती यांच्यासंदर्भात काही माहिती एकूण सात मुद्दयांव्दारे टपालाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - एकूण प्रवर्तक सभासदांची संख्या, त्यापैकी मागासवर्गीय सभासदांची संख्या, कुशल व अकुशल किती, आणि त्यांची यादी, कार्यकारी मंडळाच्या निवडणूका कधी घेतल्या, संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव कोण, या संस्थेने दिनांक ०१-०४-१९९८ ते ३१-०३-१९९८ या कालावधीमध्ये प्रत्येक वर्षी किती कामे घेतली, यापैकी पूर्ण व अपूर्ण कामांची संख्या, कार्यारंभ आदेशाच्या प्रती, आयकर परतावा मिळालेली रक्कम, सभासदांना मजूरी बोनस म्हणून किती वेळा वाटप केले, सर्व प्रवर्तक सभासदांची ओळखपत्राची छायांकीत प्रत, वर्षनिहाय कंत्राट पत्रकाची सत्यप्रत, कार्यकारी मंडळाच्या सभा किती, वार्षिक सभेच्या वर्षनिहाय इतिवृत्ताची सत्यप्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीने सदर अर्ज सहायक निबंधक, सहकारी संस्था, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना उद्देशून केला होता. त्यांनी अपिलार्थीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार डायमंड मजूर सहकारी संस्था, हडोळती, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांच्याकडे पाठविला आणि त्याची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि संबंधित मजूर सहकारी संस्थेकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सहायक निबंधक, सहकारी संस्था, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांच्याकडे दिनांक ०८-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सहायक निबंधक, सहकारी संस्था, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांनी दिनांक ३०-१२-२००८ रोजी आदेश देऊन डायमंड मजूर सहकारी संस्था, हडोळती, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरच्या कालावधीमध्ये देखील कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे वकील, जन अपिलीय अधिकारी हजर व जन माहिती अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे त्यांचे वकील श्री. प्रकाश ग. महाळंकर यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक असून या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुदतीत माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर शास्ती लावावी व या प्रकरणी त्यांना झालेली नुकसानभरपाई जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना मिळावी आणि त्याचप्रमाणे त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी अशीही अपेक्षा त्यांनी आपल्या युक्तिवादाच्या अखेरीस व्यक्त केली.

जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्यावेळी त्यांच्याकडे मजूर सहकारी संस्थेच्यासंदर्भात माहिती मागितली होती, त्यावेळी संबंधित मजूर सहकारी संस्थेचे अध्यक्ष हे माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले होते व सहायक निबंधक, सहकारी संस्था यांना या प्रकरणातील अपिलीय अधिकारी म्हणून नेमले होते, त्यामुळे त्यांनी या प्रकरणात जन अपिलीय अधिकारी म्हणून काम पाहिले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना सदर संस्थेकडून महाराष्ट्र सहकार अधिनियम १९६० मधील कलम ७९ च्या तरतुदीप्रमाणे प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस पुरवता येणे शक्य आहे. तथापि याकरिता त्यांना तीस दिवसांचा कालावधी लागेल.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीच्या वेळी असलेली परिस्थिती व आजची या प्रकरणातील परिस्थिती यामध्ये तफावत आहे. मध्यंतरीच्या काळात मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या नागपूर खंडपीठाने दिनांक ०२-०३-२००९ रोजी रिट याचिका क्रमांक ३६४८/२००७, श्री.

बालाजी स्पिनींग मिल्स लि. रिसोड, जिल्हा वाशिम विरुध्द राज्य माहिती आयुक्त नागपूरच्या संदर्भात दिलेल्या निर्णयानुसार, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थेला माहिती अधिकार अधिनियम लागू होत नाही, असा निर्णय दिला आहे, त्यामुळे आजही अपिलार्थीने ज्या त्रयस्थ पक्षाच्यासंदर्भात माहिती मागितली आहे, त्या त्रयस्थ पक्षास माहिती अधिकार अधिनियम लागू होत नाही असे आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये " माहिती " या शब्दाची व्याख्या खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

कलम २ (च)

" "माहिती" याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो."

वरील परिच्छेदाच्या शेवटच्या भागाचे अवलोकन केले असता " माहिती " या शब्दाच्या व्याख्येमध्ये, कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती याचा समावेश होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी महाराष्ट्र सहकार अधिनियम १९६० च्या कलम ७९ चा वापर करुन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, जी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे ती त्यांनी संबधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत ती अपिलार्थीस विनामूल्य व टपाला-व्दारे उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कार्यवाही आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे, तथापि अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ज्या संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती त्या जन माहिती अधिकारी यांना आता मा. उच्च न्यायालयाच्या वरील परिच्छेदामधील संदर्भीत निर्णयानुसार माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी लागू होत नसल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे आयोग कोणतीही कार्यवाही आदेशित करत नाही.

प्रसंगावशात् सहकार आयुक्त, पुणे यांना त्यांनी ज्या आदेशान्वये मजूर सहकारी संस्थेच्या संदर्भात सहायक निबंधक, सहकारी संस्था यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे ते आदेश त्यांनी मा. उच्च न्यायालयाच्या वरील आदेशाच्या आधारे आता रद्द करुन सुधारीत आदेश तात्काळ निर्गमित करावेत असे त्यांना अधिनियमातील कलम १९ (८) (क) (चार) मधील तरतुदीनुसार सुचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, जी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे ती त्यांनी संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन तदनंतर ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व टपालाव्दारे उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुभाष विठ्ठलराव मुळके, नवीन वसाहत, हडोळती, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६१०

निर्णय दिनांक १९-०३-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. किशोर भबुतमल शहा,<br>प्लॉट नं. २०+२१/३, पार्वतीनगर,<br>जळगांव | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, जळगांव | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, जळगांव | : प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक

त्रयस्थ पक्ष : श्री. महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन, जन माहिती अधिकारी, श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था लि. यावल यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दंड करण्याची व अपिलार्थीस या प्रकरणी लागलेला खर्च त्यांना देण्याबाबतचे आदेश पारीत करावे अशी विनंती आयोगास केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था लि. यावल यांच्या-संदर्भात काही माहिती एकूण १५ मुद्दयांव्दारे टपालाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मधील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करुन अपिलार्थीस संबंधित पतसंस्थेकडून माहिती घेण्याचे सूचित केले, आणि या पत्राची प्रत त्यांनी श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था लि. यावल यांच्या व्यवस्थापकाकडे अग्रेषित केली, तथापि अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-१२-२००८ रोजी निर्णय देऊन संबंधित पतसंस्थेस अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पुरविण्याचे सूचित केले, तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

अपिलार्थीने प्रथम अपील अर्ज जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव यांच्याकडे केला होता, या संदर्भातील निर्णय विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी दिनांक १०-१२-२००८ रोजी दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी व्यवस्थापक महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेशित केले आहे, परंतु अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी, त्रयस्थ पक्ष गैरहजर व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, आयोगाने आदेश दिल्यास ते अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ११-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी, मुद्दा क्रमांक ११ मधील " ........ एकरकमी कर्जफेड योजना सदर पतसंस्थेने स्वीकारली आहे काय ? " हा भाग वगळता पूर्णपणे सुसंगत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या त्रयस्थ पक्षास मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांच्याकडील रिट याचिका क्रमांक ३६४८/२००७, श्री. बालाजी स्पिनींग मिल्स लि., रिसोड जिल्हा वाशिम विरुध्द राज्य माहिती आयुक्त, नागपूर च्या संदर्भात दिनांक ०२-०३-२००९ रोजी दिलेल्या निर्णयान्वये माहिती अधिकार अधिनियम लागू होत नाही, तथापि माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांना अशा प्रकारची माहिती, ती जरी खाजगी निकायाशी संबंधित असली तरी त्यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन ती अर्जदारास पुरविता येईल, या तरतुदीचा आधार घेऊन जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी महाराष्ट्र सहकार अधिनियम १९६० मधील कलम ७९ किंवा इतर कलमांच्या आधारे त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती संबंधित संस्थेकडून हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत प्राप्त करुन घ्यावी व तदनंतर ही माहिती अपिलार्थीस याच कालावधीमध्ये विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे संबंधित सहकारी संस्थेस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार शास्ती लावण्याची आणि या प्रकरणी अपिलार्थीस झालेल्या खर्चाची

नुकसानभरपाई मंजूर करण्याची आयोगास विनंती केली आहे, तथापि या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, आता माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदी त्रयस्थ पक्षास लागू होत नसल्यामुळे, अपिलार्थीची, अपिलार्थीने आयोगाकडे केलेली ही विनंती आयोग अमान्य करत आहे.

मुद्दा क्रमांक ११ मधील " ......... एकरकमी कर्जफेड योजना सदर पतसंस्थेने स्वीकारली आहे काय ? " या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली असल्याने आणि अशा प्रकारची माहिती, माहिती माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने, ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या दिनांक ११-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ११ मधील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेला भाग वगळता, उर्वरित सर्व मुद्दयांवरील संपूर्ण माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत रजिस्टर्ड टपालाव्दारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. किशोर भबुतमल शहा, प्लॉट नंबर २०+२१/३, पार्वतीनगर, जळगांव.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७०६

निर्णय दिनांक १९-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सौ. कविता अ. गौर,<br>प्लॉट क्रमांक २, एन-१, सिडको, सारानगर, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय<br>जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सदस्य, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती<br>क्रमांक १, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०२-२००९ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी आजतागायत निर्णय न दिल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व जातीच्या प्रकरणाबाबत काही माहिती एकूण तीन

मुद्दयांव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिति त्यांना कोणत्या माध्यमाव्दारे अपेक्षित आहे त्याचा आणि त्यांनी मागणी केलेली माहिती कोणत्या कालावधीशी संबंधित आहे, याचा स्पष्ट उल्लेख या अर्जामध्ये केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारीत न केल्याने, आणि परिणामी अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून वंचित राहावे लागल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगा-समोर उपस्थित नाही.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती आणि स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या दिनांक २४-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन तदनंतर आपले आदेश निर्गमित करणे, हे या टप्प्यावर आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा सदस्य, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २४-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

# <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा सदस्य, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २४-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झ ाालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. कविता अ. गौर, प्लॉट क्रमांक २, एन-१, सिडको, सारानगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सदस्य, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८५६
निर्णय दिनांक : २०.०३.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. दत्तराव संभाजी गोरे,<br>रा.परभणी. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक,नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक,नांदेड | | |

प्रत्यक्षातः जन माहिती अधिकारी : पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
जन अपिलीय अधिकारी : अति. पोलीस अधीक्षक,नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.०४.२००९ रोजी नोंदविलेले केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, पोलीस निरीक्षक,इतवारा यांनी शिफारशीसह पाठविलेली फाईल प्रलंबित ठेवल्याबद्दल त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.या अपील अर्जासोबत अपिलार्थीने त्यांचे दि. १५.०४.२००९ रोजीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. ११.११.२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून समाधानकारक माहिती दिली गेली नाही आणि ही माहिती देण्यासाठी तीस दिवसांचा कालावधी असताना त्यांना त्यासाठी अडीच महिने इतका वेळ लावला. तसेच त्यांनी अर्जामध्ये विचारलेल्या माहितीशी संबंधित तक्रारीची दखल जन माहिती अधिकारी यांच्याकडून घेतली गेलेली नाही. पोलीस निरीक्षक,इतवारा नांदेड यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या अर्जाच्या संदर्भात, गैरअर्जदाराने हेतुपूरस्सर अर्जदाराची फसवणूक

केली असल्याची शिफारस करुनही उपविभागीय अधिकारी यांनी एकतर्फी निर्णय देऊन अपिलार्थीस असमाधानकारक व थातूरमातूर उत्तरे दिली. या अर्जाच्या अखेरीस त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने व गैरअर्जदाराने दिलेला जबाब व पोलीस निरीक्षक, इतवारा नांदेड यांनी केलेल्या शिफारशीच्या प्रमाणित प्रत त्यांना देण्यात यावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये अपर पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

"उपविभागीय अधिकारी यांनी दि. ११.१०.२००८ रोजी पाठविलेली माहिती ती दि.१८.१०.२००८ रोजी मिळाली."

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील 'आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन/तपशील' या सदरासमोरील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०५.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या अर्जास रु. २०/- इतक्या किमतीचे तिकीट लावण्याच्या सूचना दिल्या. यानंतर अपिलार्थीने या संदर्भात काय कार्यवाही केली हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांअभावी कळण्यास मार्ग नाही. तथापि अपिलार्थीने त्यानंतर अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२०.१२.२००८ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केल्याचे आढळून येत आहे. या अपील अर्जाच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांच्या दि. ११.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी संदर्भित केलेल्या दि. ०१.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. ११.१०.२००८ रोजी माहिती दिल्याच्या कारणस्तव अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.११.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाही. या अर्जामध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून जी माहिती अपेक्षित आहे, ती माहिती, या अर्जामध्ये नमूद केली नसून फक्त उपविभागीय अधिकारी यांनी दि. ११.१०.२००८ रोजी पाठविलेली माहिती दि. १८.१०.२००८ रोजी मिळाली, अशी वस्तुस्थिती नमूद केली आहे. अपिलार्थीच्या या अर्जावरुन अपिलार्थीस निश्चितपणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती अपेक्षित आहे, याचा बोध होत नाही. परिणामी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मूळात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नसल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेल्या दि. १५.०४.२००९ रोजीच्या पत्रामध्ये त्यांनी दिलेला जबाब व गैरअर्जदार व पोलीस निरीक्षक यांनी केलेल्या शिफारशीच्या प्रमाणित प्रती, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहेत, असे नमूद केले आहे. परंतु हे मुद्दे त्यांनी त्यांच्या दि. ११.११.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये नमूद केले नसल्यामुळे, अपिलार्थीस या माहितीकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वतंत्र अर्ज करावा लागेल, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| **औरंगाबाद** | **( वि. बा. बोरगे )** |
| **दिनांक : २०-०३-२०१०** | **राज्य माहिती आयुक्त** |
| | **खंडपीठ औरंगाबाद** |

प्रत,

१. श्री. दत्तराव संभाजी गोरे,रा.वडेपूरी, ह.मु.विठ्ठलराव रासवे, माळी गल्ली, परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक (मुख्यालय),पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अति. पोलीस अधीक्षक,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८५७

निर्णय दिनांक : २०.०३.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मधुकर हिराजी मुळे,<br>रा.पूर्णा, जि.परभणी. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, परभणी. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, परभणी. | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,परभणी

जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना दि. ३०.०१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती दिशाभूल करणारी असल्यामुळे त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर कोणताही निर्णय न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "सिध्देश्वर विद्यालय कळगाव Index NO. 60.02.030 ता.पूर्णा जि.परभणी या

शाळेकडून जानेवारी, २००७ ते डिसेंबर, २००७ या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यकाळामध्ये दाखल केलेल्या शाळा अनुदान तपासणी (फाईल) दस्तऐवजासोबत जोडलेली संपूर्ण कागदपत्रांच्या छायांकित प्रमाणित प्रती", अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी मूळ स्वरुपात शिक्षण संचालक कार्यालयाकडे पाठविली असल्याचे कळविले व ही माहिती शिक्षण संचालक कार्यालयाकडे उपलब्ध असल्याने शिक्षण संचालकांकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. यानंतर अपिलार्थीने शिक्षण संचालकांकडे या संदर्भातील माहिती मागितली असता, शिक्षण संचालक यांनी परत अपिलार्थीस ही माहिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडून घेण्याचे सूचित केले. यानंतरच्या कालावधीत अपिलार्थी व शिक्षण संचालक आणि शिक्षणाधिकारी यांच्यामध्ये बराच पत्रव्यवहार होत राहिला. अंतिमतः अपिलार्थीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २७.०१.२००९ रोजी प्रथम अपील केले. त्यांनी दि. ०७.०२.२००९ रोजीच्या पत्रान्वये सदर अपील अर्ज शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जि.प.परभणी यांच्याकडे पाठविला. तथापि या अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.परभणी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेऊन निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगाच्या कार्यालयात दाखल केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली फाईल शिक्षण संचालक, म.रा.पुणे यांच्याकडे रितसर मागणी करुन प्राप्त करुन घेण्याचे सूचित करुन त्यांची दिशाभूल केली आहे व तसेच ही माहिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे उपलब्ध

असूनही त्यांना ती प्राप्त होऊ शकत नाही, ती त्यांना त्वरित प्राप्त व्हावी,अशी या निवेदनाच्या अखेरीस त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने,त्यांनी अपिलार्थीस दि. १७.०३.२०१० रोजी म्हणजेच आजच्या सुनावणीच्या दिवसापूर्वी तीन दिवस अगोदर ही माहिती पोस्टाद्वारे पाठविल्याचे आयोगास अवगत केले. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीस पाठविलेली माहिती आयोगाच्या अवलोकनास्तव सादर केली. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्यांना संबंधित शिक्षण संस्थेकडून त्यांच्या संस्थेविषयीचा प्रस्ताव एकूण दोन प्रतीमध्ये प्राप्त झाला होता. या दोनही प्रती त्यांनी मूळ स्वरुपात शिक्षण संचालकांकडे पाठविल्या होत्या. त्यामुळे त्यांनी त्यांच्याकडील दि. ३०.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविलेली माहिती बरोबर आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस त्यांच्या दि. १७.०३.२०१० रोजीच्या पत्राद्वारे देऊ केलेली माहिती ही सकृतदर्शनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे अंशतः सुसंगत नसल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने जन महिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जामध्ये माहितीच्या प्रमाणित प्रती नोंदणीकृत टपालाद्वारे मागविल्या होत्या. परंतु आता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती प्रमाणित केली नसल्याचे व ती त्यांनी साध्या पोस्टाने पाठविली असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी जन अपिलीय अधिकारी यांनी पाठविलेली ही माहिती अशाप्रकारे काही प्रमाणात विसंगत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीस त्यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य व प्रमाणित प्रतीच्या स्वरुपात रजिस्टर्ड पोस्टाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व प्रमाणित प्रतीच्या स्वरुपात रजिस्टर्ड पोस्टाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २०-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, ता.पूर्णा, परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८५८

निर्णय दिनांक : २०.०३.२०१०

१. श्री. होळे दशरथ अच्युतराव, : अपिलार्थी
रा.अष्टामोड, ता.जि.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तालुका कृषि कार्यालय, चाकूर,
जि.लातूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, चाकूर,
जि.लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय, चाकूर,
जि.लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.०४.२००९ रोजी नोंदविलेले केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांनी जाणीवपूर्वक दुष्ट हेतूने दडवून ठेवून अर्जदाराचे नुकसान करुन व ती अपिलार्थीस न देऊन माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा जन माहिती अधिकारी यांनी भंग केल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जाद्वारे त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी

यांच्याकडे, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, लातूर यांनी त्यांच्या जा.क्र. ३६७४ दि. ०७.१०.२००८ रोजी दिलेल्या आदेशावर तालुका कृषि कार्यालय, चाकूर यांनी केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची सत्यप्रत, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १०.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४/- इतके त्यांना चलनाद्वारे त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मंडळ कृषि कार्यालयाकडून उपलब्ध होताच ती अपिलार्थीस पुरविण्यात येईल, असे अपिलार्थीस आश्वासित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.०२.२००९ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.०४.२००९ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर राहिल्याने त्यांनी यासंदर्भात कोणताही निर्णय दिला नाही. या सर्व प्रकाराने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. २०.१०.२००९ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती व्यक्तिशः हस्तांतरित केली आहे. यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीची ही माहिती मिळाल्याची पोचसही आयोगास दाखविली. तथापि या पत्राचे अवलोकन केले असता या पत्राद्वारे दिलेली माहिती अपिलार्थीच्या दि. १३.०१.२००९ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात दिली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी

सुसंगत असून या माहितीची व्याप्ती अत्यंत मर्यादित व स्वरुप अत्यंत सोपे होते.तसेच अपिलार्थीने ही माहिती टपालाद्वारे मागितलेली होती. एवढे असूनही, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १०.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले व अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.४/- इतके त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने टपालाद्वारे माहिती मागितली असताना त्यांच्या स्वतःच्याच कार्यालयात येऊन माहिती व्यक्तिशः घेऊन जाण्याची जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस केलेली सूचना ही सर्वथा गैर व चुकीची आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.१०.२००९ रोजी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, या पत्रामध्ये अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाचा संदर्भ दर्शविला नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी खरोखरीच त्यांनी दि. १३.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती दिली आहे किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालयाकडून दि. ०७.१०.२००८ रोजी दिल्या गेलेल्या आदेशावर त्यांनी केलेली कार्यवाही ही माहिती मागवली आहे, ही माहिती म्हणजे, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांचे संदर्भिय पत्र जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्यापासून ते अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दाखल करण्याच्या दिनांकापर्यंत जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात विविध प्राधिकरणांशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती आणि या विषयावरील त्यांच्याकडील उपलब्ध अभिलेख्यामधील टिपणीच्या प्रती, ही होय. तथापि या प्रकरणी अशाप्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे.सबब जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी वर निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना,हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द झ

ााले असल्याने कृषि आयुक्त, पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य व पोस्टाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

३. आयुक्त (कृषि), म.रा.पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २०-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दशरथ अच्युतराव होळे, रा.अष्टामोड, पो. गांजूर, ता.चाकूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,तालुका कृषि कार्यालय, चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, चाकूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे-५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८५९
निर्णय दिनांक : २०.०३.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. प्रशांत नानासाहेब पंडित,<br>रा.भूम, जि.उस्मानाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>नोंदणी उपमहानिरीक्षक तथा मुद्रांक उपनियंत्रक,<br>लातूर विभाग, लातूर. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,<br>लातूर विभाग, लातूर. | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सह जिल्हा निबंधक वर्ग-२, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरविल्यामुळे आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याशी संगनमत करुन चुकीचा निर्णय दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. रामराजा पंडित यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या अर्जासंदर्भात व इतर मुद्यांसंदर्भात एकूण पाच मुद्यांद्वारे माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २५.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०३.२००९ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.०४.२००९ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत बरोबर माहिती दिली असल्यामुळे, निकाली काढले. जन अपिलीय अधिकरी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला असून या युक्तिवादामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ४८ पानांची अपूर्ण,खोटी व खोडसाळपणे दिशाभूल करणारी माहिती पुरविली आहे. त्यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी त्यांच्या म्हणण्याचा कोणताही विचार केला नाही. अपिलार्थीने त्यांच्या लेखी युक्तिवादामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती कशाप्रकारे चुकीची व दिशाभूल करणारी आहे, याच्या वस्तुस्थितीचे विवेचन केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस यासंदर्भात दि. २५.०२.२००९ रोजी एकूण २९ पृष्ठांची आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. रामराजा पंडीत यांना विनामूल्य माहिती दिल्यामुळे शासनाचा किती महसूल बुडाला, अशी माहिती विचारली असता, जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्ष श्री. रामराजा पंडित यांना माहिती देण्यासाठी काढलेल्या झेरॉक्स

प्रतीचा खर्च जन माहिती अधिकारी यांनी स्वत: केल्याचे व ही माहिती श्री. रामराजा पंडित यांना देण्यासाठी रु. २५/- इतका खर्च आल्याचे अपिलार्थीस कळविले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, यामुळे शासनाचा कोणताही महसूल बुडाला नाही. यासंदर्भात श्री. रामराजा पंडित यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. १५.०१.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. २१.०१.२००९ रोजी विनामूल्य पुरविली आहे. श्री. रामराजा पंडित हे अर्जदार दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नव्हते, त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास सशुल्क माहिती पुरविण्याऐवजी त्यांनी ती विनामूल्य पुरविल्यामुळे शासनाचा महसूल बुडाला असल्याची अपिलार्थीची धारणा आहे व ती बरोबर आहे. परंतु या प्रकरणी शासनाचा महसूल बुडाला नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली ही माहिती चुकीची असून श्री. रामराजा पंडित यांच्या प्रकरणी शासनाला रु.२५/- इतका भुर्दंड निश्चितपणे पडला असल्याचे आयोगास आढळून येत आहे.अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे, त्रयस्थ पक्ष, 'श्री. रामराजा पंडित यांनी मागणी केलेली माहिती किती तारखेला जावक क्रमांकाच्या रजिस्टरला नोंदविण्यात आली व किती तारखेला पोस्टामध्ये टाकण्यात आली व माहितीचे पाकीट पोस्टात टाकण्यास किती दिवसाची दिरंगाई झाली व ती कशामुळे', अशी माहिती विचारली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अशी माहिती दिली आहे की, श्री. रामराजा पंडित यांच्या दि. १५.०१.२००९ रोजीच्या पत्राच्या संदर्भातील माहिती त्यांना दि. २१.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आली असून हे टपाल त्यांनी दि. ३०.०१.२००९ पोस्टात टाकले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने माहितीची मागणी केली असता, ही माहिती अर्जदारास देण्यासाठी तीस दिवस इतका कालावधी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असतो, त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे श्री. रामराजा पंडित यांच्या माहितीचे पाकीट पोस्टात टाकण्यासाठी कोणतीही दिरंगाई झाली नाही, हे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे बरोबर आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित, जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्ष श्री. रामराजा पंडित यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेले माहितीपोटीचे शुल्क व ते कधी प्राप्त झाले, ही माहिती त्यांना बरोबर दिली आहे. तथापि पोस्टाच्या खर्चासंदर्भात त्यांनी

अपिलार्थीस, "वेगवेगळया तारखांना सर्वसाधारणपणे रु. ४००/- इतका खर्च झाला", अशी माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. श्री. रामराजा पंडित यांना माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना पोस्टाचा निश्चित किती खर्च आला, याची माहिती त्यांनी अपिलार्थीस या मुद्यावर माहिती देताना दिली नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ मधील, श्री. रामराजा पंडित यांना माहिती देण्यासाठी लागलेला निश्चित पोस्टाचा खर्च या संदर्भातील माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य कळवावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ द्वारे, "अपिलीय अधिकारी या नात्याने कार्यालयीन पत्राद्वारे अधिकार नसताना माहितीचे शुल्काची मागणी करणे व अधिकारहीन वसूल केलेल्या शुल्कापोटी माहिती पुरविणे याचा अर्थ माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(१) खालील अपिलाचा निर्णय होऊ शकतो काय?", अशी माहिती विचारली होती. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, या मुद्याद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली असल्यामुळे आणि अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ (च) मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्यामुळे, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय व स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दलची स्पष्टीकरणे अर्जदारास देणे अशाप्रकारच्या प्रक्रियांचा समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. त्यामुळे या मुद्यावर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना, 'त्यांच्याकडे दाखल झालेल्या प्रथम अपील अर्जांची संख्या व अपिलाच्या व त्यावरील निर्णयांच्या प्रती', अशी माहिती मागविली आहे. तथापि या मुद्यावर देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अपिलाची संख्या दिलेली नाही. ही संख्या जन माहिती अधिकारी

यांनी आता अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील परिच्छेदात अपिलार्थीने मागणी केलेली आणि जन माहिती अधिकारी यांनी पोस्टाने अपिलार्थीस पुरविलेली माहिती यातील विसंगती नमूद केलेली आहे. या विसंगतीचे निराकरण जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुनश्च् सुधारित माहिती देऊन करावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,३ व ५ च्या संदर्भातील, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, सुधारित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्र. १,३ व ५ च्या संदर्भातील, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे सुधारित माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २०-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रशांत नानासाहेब पंडित, द्वारा पंडित जॉबवर्क सेंटर, कोर्टाशेजारी भूम,ता.भूम, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात  पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०९३
निर्णय दिनांकः २०-०३-२०१०

१. श्री. अनिलकुमार द.खैरनार, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. सचिव, : प्रतिवादी
किर्ती गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित, एन-८,
हडको, औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपनिबंधक,
सहकारी संस्था, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०२.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी, किर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, हडको, औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेच्या सचिवांनी त्यांच्या दि.२६.०७.२००८ रोजीच्या पत्रान्वये, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(६) मध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधित संस्था येत नसल्यामुळे माहिती देता येत नसल्याचे अपिलार्थीस कळवून त्यांचा अर्ज निकाली काढला. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.३१.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ०२.०२.२००९ रोजी पारित

केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य केले व त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना देण्याचे सचिव, किर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, औरंगाबाद यांना आदेशित केले. तथापि यानंतर पाहिजे असलेली माहिती न देता दुसरी माहिती दिल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २०.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व संबंधित संस्थेचे सचिव व उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद हे उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित संस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, <u>wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra</u>**

**Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'सार्वजनिक प्राधिकरण' असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे, त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित गृहनिर्माण संस्थेस लागू होत नसल्याने उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांचे दि. ०२.०२.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.१०९३/०९ फेटाळण्यात येत आहे.

२. उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांचे दि. ०२.०२.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः २०-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अनिलकुमार द. खैरनार, २०, सदानिधी कॉलनी, औरंगपुरा, औरंगाबाद.

२. सचिव, किर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सी-२, एन-८, सिडको, औरंगाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०९५
निर्णय दिनांकः २०-०३-२०१०

१. श्री. नारायण निवृत्तीराव कदम, : अपिलार्थी
रा.परभणी

**विरुध्द**

१. अध्यक्ष, : प्रतिवादी
आचार्य नगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,
परभणी

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.११.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे अध्यक्ष, आचार्य नगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., परभणी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने सहायक निबंधक, सहकारी संस्था, परभणी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.२१.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर सहायक निबंधक, सहकारी संस्था, तालुका परभणी यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ०५.०५.२००९ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य केले व त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे सचिव / अध्यक्ष, आचार्य नगर गृहनिर्माण सहकारी संस्था, परभणी यांना आदेशित केले. तथापि यानंतर

माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २०.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, संबंधित संस्थेचे अध्यक्ष व सहायक निबंधक, सहकारी संस्था, तालुका परभणी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे संबंधित संस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने त्यांचे रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७, श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स मर्या.,रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे दिलेला निर्णय तत्पूर्वी विचारात घेणे आवश्यक आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a Co-operative Society, registered under the Maharashtra Co-Operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State**

**within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable."**

वरील निर्णयाचे अवलोकन करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'सार्वजनिक प्राधिकरण' असे मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेकडे माहिती मागितली आहे, त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत.

अशाप्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, माहिती अधिकार अधिनियम २००५ आता संबंधित गृहनिर्माण संस्थेस लागू होत नसल्याने सहायक निबंधक, सहकारी संस्था, तालुका परभणी यांचे दि. ०५.०५.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्याचे आदेशित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.१०९५/०९ फेटाळण्यात येत आहे.
२. सहायक निबंधक, सहकारी संस्था, तालुका परभणी यांचे दि. ०५.०५.२००९ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांकः २०-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नारायण निवृत्तीराव कदम, आचार्य नगर, जागृती हनुमान मंदिराच्या पाठीमागे, वसमत रोड, परभणी.

२. अध्यक्ष, आचार्य नगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, वसमत रोड, परभणी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, नवा मोंढा, परभणी

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८५२

निर्णय दिनांक २०-०३-२०१०

१ श्री. शंकरराव रामराव गरुड, : अपिलार्थी
मु. पो. पिंगळी, ता. जि. परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.२,
परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप विभागीय अधिकारी, जायकवाडी पाटबंधारे उपविभाग क्र.९, लोहगांव, जि. परभणी

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र. २, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जायकवाडी धरणात शेतीसाठी पाणी उपलब्ध असून व गाळ काढण्यासाठी निधी उपलब्ध असूनही गाळ व पाण्याचा वापर चुकीचा होत आहे, असे त्यांना वाटत आहे. सर्व सामान्य नागरिकांना बुद्धिजीवी अधिकारी काही जमू देत

नाहीत, त्यांना सत्य न्याय मिळत नाही व मागणी केल्यानंतरही कागदपत्रे मिळाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी असेही नमूद केले आहे की, त्यांना पुढेही पाणी मिळेल किंवा नाही याची शंका असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित दिनांक १५-१०-१९८७ ते १८-१०-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ३६ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात दिनांक २१-१०-२००८ रोजी प्राप्त झाला.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २७-११-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २२/- आणि पोस्टेज खर्च रु. २५/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक १२-१२-२००८ रोजी रु. २२/- इतक्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-१२-२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांच्याकडे दिनांक १४-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर अधीक्षक अभियंता यांनी कोणताही निर्णय न देता सहायक अधीक्षक अभियंता यांच्या सहीने अपिलार्थीस दिनांक १७-०१-२००९ रोजी पत्र पाठवून, अपिलार्थीने विहित मुदतीत अपील न केल्याने व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येत बसत नसल्याने ती अपिलार्थीस पुरविणे त्यांना बंधनकारक नसल्याने त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती दिनांक १५-१२-२००८ रोजी सशुल्क पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १५-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेली माहिती आयोगास सादर केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी बरीचशी माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-१०-२००८ रोजी प्राप्त झाल्यानंतर अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क व माहिती त्यांना दिनांक २०-११-२००८ रोजी अगर तत्पूर्वी कळविण्याऐवजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास प्रथमतः अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा ६ दिवस विलंबाने प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती पाहता त्यांनी अपिलार्थीचा अर्ज उपविभागीय अभियंता, जायकवाडी पाटबंधारे उपविभाग क्र.९ यांच्याकडे पाठवून त्यांच्याकडून जी माहिती प्राप्त झाली ती तशीच्या तशी त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे, असे दिसून येते. कार्यकारी अभियंता यांनी मूळात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज नीट वाचला नसल्याचे या प्रकरणी आयोगास आढळून येत आहे. कारण अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २७, २८, २९ व ३० च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस देताना त्यांनी मुद्दा क्रमांक २७ व २८ हा मंडळ कार्यालयाशी आणि मुद्दा क्रमांक २९ व ३० च्या संदर्भात अपिलार्थीस माहिती देताना अपिलार्थीस त्यांच्या शाखा कार्यालयाशी संपर्क साधण्याचे सूचित केले आहे. त्याचबरोबर

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३१ च्या संदर्भात संबंधित उप अभियंता यांनी अपिलार्थीस त्यांनी या मुद्याद्वारे मागणी केलेली माहिती प्रत्येक उप विभागाकडून प्राप्त करुन घेण्याचे सुचविले आहे. हे सुचवित असताना त्यांनी स्वतःच्या उपविभागाची माहिती मात्र अपिलार्थीस देण्याचे शिताफीने टाळले आहे, असे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३४, ३५ व ३६ च्या बाबतीत देखिल जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले आहे. अपिलार्थीस त्यांच्या वरिष्ठ कार्यालयास आणि त्यांच्या कार्यालयाच्या शाखेशी संपर्क साधण्याचे सूचित केले आहे. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस माहिती देण्याची ही पध्दत सर्वस्वी चुकीची असून, अशा वेळी त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत या अर्जाची प्रत त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मधील तरतुदीप्रमाणे, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाचा भाग असलेल्या ज्या कार्यालयाकडे उपलब्ध आहे त्या कार्यालयास पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस पाठवावयास हवी होती. परंतु कार्यकारी अभियंता यांनी व संबंधित उपविभागीय अभियंता यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती न केल्यामुळे आता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील द्यावयाची राहिलेली उर्वरित सर्व माहिती कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.२, परभणी यांनाच देणे भाग आहे. अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी द्यावयाच्या राहिलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी कार्यकारी अभियंता यांना ३० दिवसाचा कालावधी देण्यात येत असून, त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ११,१२,१६,१७,२६,२७,२८,२९,३०,३१,३४,३५ व ३६ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास मूळात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा ७ दिवस विलंबाने प्रतिसाद दिला असल्यामुळे, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. २२/- इतके त्यांना आता अपिलार्थीस परत करावे लागेल. सदर शुल्क

त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत परत करावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देता अपिलार्थीस मोघम स्वरुपाची माहिती पुरवून, त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे व अशाप्रकारच्या त्यांच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (जलसंपदा) यांना या प्रकरणाशी संबंधित कार्यकारी अभियंता आणि संबंधित उपविभागीय अभियंता यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज करताना जलसंपदा विभागाकडून जायकवाडी धरणावर गाळ आणि पाणी वापर चुकीचा होत असल्याचे त्यांना वाटत आहे, असे नमूद केले आहे व तसेच त्यांनी जलसंपदा विभागाचे अधिकारी शेतकऱ्यांची सभा घेत नाहीत व चर्चा करीत नाहीत अशी तक्रार आयोगाकडे केली आहे. या तक्रारीवर निर्णय घेण्याची कार्यवाही ही पूर्णतः प्रशासकीय स्वरुपाची असल्याने आणि अशी कार्यवाही माहिती आयोगाच्या कक्षेत नसल्यामुळे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, जायकवाडी धरणातील पाण्याचा व गाळाचा वापर या संदर्भात त्यांच्या काही तक्रारी असतील तर त्यांनी जलसंपदा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी त्यांच्या पातळीवर परस्पर संपर्क साधून आपल्या तक्रारीचे निवारण करुन घ्यावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग क्र. २, परभणी यांनी, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली उर्वरित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. २२/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत परत करावे.

४. सचिव (जलसंपदा) यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शंकरराव रामराव गरुड, मु. पो. पिंगळी, ता. जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, जायकवाडी पाटबंधारे उपविभाग क्र.९, लोहगांव, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र. २, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८५३

निर्णय दिनांक २०-०३-२०१०

१ श्री. हरिदास शेषराव भालेराव, : अपिलार्थी
मु. कौडगांव, पो. मालेवाडी, ता. गंगाखेड, जि. परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,
गंगाखेड, जि. परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड,
जि. परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक (सर्व), पंचायत समिती कार्यालय, गंगाखेड, जि. परभणी
जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, गंगाखेड, जि. परभणी

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या संदर्भात सन २००८-२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सर्व कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीच्या ठरावाची झेरॉक्स प्रत, सेवापुस्तिकेची झेरॉक्स प्रत, दिनांक २०-०१-२००९ रोजी पर्यंतच्या फॉर्म २२, फॉर्म २४ व फॉर्म १६ च्या आणि कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या पासबुकाची झेरॉक्स प्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड यांना उद्देशून केला होता. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावर उपलब्ध नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत, अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार, सर्व ग्रामसेवकांच्याकडे त्यांच्या दिनांक २७-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे पाठवून दिली. तथापि यानंतर अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी संबंधित ग्रामसेवकाने उडवाउडवीची उत्तरे दिल्याचे कारण दर्शवून अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २१-०२-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड यांच्याकडे प्रथम अपील केले. या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी हे गट विकास अधिकारी नसून या पंचायत समितीचे विस्तार अधिकारी यांची जन अपिलीय अधिकारी या पदावर दिनांक ०२-०७-२००८ रोजी नेमणूक झाली होती. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज पंचायत समितीच्या विस्तार अधिकाऱ्यांकडे पाठवून दिला. विस्तार अधिकाऱ्याने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक २६-०३-२००९ रोजी सर्व ग्रामसेवकांची बैठक घेऊन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात बैठकीचे इतिवृत्त जारी केले. या इतिवृत्तामध्ये त्यांनी "सर्वानुमते अपिलार्थीस पुढील अपील करण्यास काहीही हरकत नाही" असे नमूद केले आहे. जन

अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो कोणत्याही ग्रामसेवकाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती दिलेली नाही. ही माहिती घेण्यासाठी ते संबंधित ग्रामसेवकांकडे वारंवार गेले असता संबंधित ग्रामसेवकांनी त्यांना ही माहिती देण्याचे टाळले. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर अपिलार्थी प्रत्येक ग्रामसेवकांकडे कधी गेले या संदर्भातील एखादा सबळ पुरावा अपिलार्थीकडे उपलब्ध आहे काय असे अपिलार्थीस विचारल्यानंतर, अपिलार्थीने आयोगास नकारार्थी उत्तर दिले.

संबंधित ग्रामसेवकांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे त्यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ही माहिती घेण्यासाठी कधीही उपस्थित राहिले नाहीत. त्यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, त्यांनी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीचे कोणत्याही बँकेत खाते उघडलेले नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या एकूण ६ मुद्यांवरील माहितीपैकी मुद्दा क्रमांक ६ शी संबंधित - सर्व ग्रामपंचायतीच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या पासबुकच्या सत्यप्रती - ही माहिती अपिलार्थीस देय होणार नाही. कारण ही माहिती त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक स्वरुपाची माहिती असून ही माहिती उघड झाल्याने कोणतेही व्यापक जनहित साध्य होऊ शकेल असे आयोगास वाटत नाही. परंतु त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप होण्याची मात्र शक्यता नाकारता येत नाही व अशा प्रकारे अधिनियमातील कलम ८ (१) (ज) चा भंग होण्याची शक्यता असल्याने अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांना

अपिलार्थीस उघड करता येणार नाही. मात्र त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित पाचही मुद्यांवरील माहिती त्यांना अपिलार्थीस पुरवावी लागेल.

या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही त्यांना एकाही ग्रामसेवकाने, त्यांनी संबंधित ग्रामसेवकांकडे वेळोवेळी जावूनही माहिती पुरविली नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. तथापि या संदर्भातील ते संबंधित ग्रामसेवकाकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी उपस्थित राहिल्याचा कोणताही सबळ पुरावा ते आयोगास सादर करु न शकल्यामुळे त्यांचा, ते संबंधित ग्रामसेवकाकडे माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता वेळोवेळी उपस्थित राहिले हा मुद्दा, आयोग अमान्य करीत आहे. परंतु येथे असेही स्पष्ट होत आहे की, विस्तार अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड यांनी दिनांक २६-०३-२००९ रोजी दिलेल्या निर्णयाच्या वेळी अपिलार्थी त्यांच्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी हजर होते व पंचायत समितीमधील काही ग्रामसेवकही या बैठकीस हजर होते. त्यामुळे अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती द्यावयाची आहे, याची कल्पना ग्रामसेवकांना आलेली आहे व एक प्रकारे अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपस्थित राहिले असल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे आता सर्व ग्रामसेवकांना, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ६ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस, विनामूल्य पुरवावी लागेल. ही माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. या आदेशाच्या प्रती संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांना, गट विकास अधिकारी, पंचायत समिती गंगाखेड यांनी त्यांच्या स्तरावरुन तात्काळ पाठवाव्यात, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती सर्व संबंधित ग्रामसेवकांच्या कार्यालयात वरील कालावधीमध्ये कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी उपस्थित राहून ती संबंधितांच्याकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी लागेल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ६ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. हरिदास शेषराव भालेराव, मु. कौडगांव, पो. मालेवाडी, ता. गंगाखेड, जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक (सर्व), पंचायत समिती कार्यालय, गंगाखेड, जि. परभणी (मार्फत गट विकास अधिकारी, पंचायत समिती गंगाखेड, जि. परभणी) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, गंगाखेड, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८५४

निर्णय दिनांक २०-०३-२०१०

१ श्री. भारत आनंदा सावंत, : अपिलार्थी

द्वारा, कृषि विभाग, जिल्हा परिषद, परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

उपअभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद उपविभाग, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे आणि त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयामार्फत जिल्हा परिषदेच्या परभणी शहरातील शिवाजीनगर येथे असलेल्या वर्ग ३ कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानावर, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून सन २००३-२००४ ते २००८-२००९ या कालावधीमध्ये झालेल्या खर्चाचा तपशील, प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेच्या आदेशाची, मोजमाप पुस्तिकेची व अंदाजपत्रकाची प्रमाणित प्रत,

अशी माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्याकडे दिनांक ३०-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १९-०३-२०१० रोजी या प्रकरणाशी संबंधित माहिती प्राप्त झाली आहे. तथापि या माहितीमध्ये त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ व ३ चा समावेश नाही. ही माहिती त्यांना आता तात्काळ हवी असून त्यांना विलंबाने व अपूर्ण माहिती पुरविल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई आदेशित व्हावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक १९-०३-२०१० रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. या माहितीमध्ये मोजमाप पुस्तिकेच्या प्रतीचा व खर्चाच्या मुद्यांवरील माहितीचा समावेश नसल्याचे त्यांनी मान्य केले व ही माहिती अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे आयोगास आश्वासित केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १७-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. तथापि अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून

व्यक्तिशः मागितली असून ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ही माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी कधी उपस्थित राहिले याचा सबळ पुरावा त्यांच्याकडे नाही. आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अंदाजे सव्वा वर्षाच्या कालावधीनंतर त्यांच्या मूळ अर्जाच्या संदर्भात काही माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे, या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ च्या माहितीचा समावेश नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. याचाच अर्थ असा की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अंदाजे सव्वा वर्षाच्या कालावधीनंतरही अपूर्ण माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरविण्याच्या जन माहिती अधिकारी यांच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. या प्रकरणाशी संबंधित एकूण २ जन माहिती अधिकारी असून तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. खडेकर (सध्या सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बदनापूर येथे उप विभागीय अभियंता या पदावर कार्यरत) व सध्याचे जन माहिती अधिकारी श्री. दिलीप चिद्रेवार हे जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अद्यापपावेतो मोजमाप पुस्तिकेची प्रत अपिलार्थीस न देण्याचे कारण विचारले असता, श्री. चिद्रेवार यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अपिलार्थीने मागणी केलेल्या कामाच्या संबंधीत त्यांच्या कार्यालयातील मोजमापपुस्तिका सापडत नाहीत, या पुस्तिका त्यांच्या सहायकांच्याकडे जतन करुन ठेवल्या जातात. श्री. चिद्रेवार यांच्या या युक्तिवादावरुन अपिलार्थीस अपूर्ण माहिती प्राप्त होण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील कनिष्ठ अभियंता श्री. सलीम हे देखिल जबाबदार असल्याचे आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे. हे पाहता या प्रकरणी श्री. सलीम कनिष्ठ अभियंता हे देखिल अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. संबंधित उपविभागीय अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती उपलब्ध करुन देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल श्री. खडेकर व

श्री. चिद्रेवार यांच्यावर सचिव, सार्वजनिक बांधकाम यांना आणि श्री. सलीम कनिष्ठ अभियंता यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती पुरविण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ आणि ३ शी संबंधित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. या कालावधीमध्ये जर संबंधित कनिष्ठ अभियंत्यांकडून संबंधित मोजमापपुस्तिकेच्या प्रती त्यांना उपलब्ध होऊ शकल्या नाहीत तर त्यांनी, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित सहायकाने गहाळ केल्याचे गृहीत धरुन संबंधितांच्यावर आवश्यक वाटल्यास फौजदारी स्वरुपाची कारवाई प्रस्तावित करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. सचिव, सार्वजनिक बांधकाम यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. खडेकर (सध्या उपविभागीय अभियंता, बदनापूर या पदावर कार्यरत) व श्री. दिलीप चिद्रेवार (उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम, जिल्हा परिषद उपविभाग परभणी या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता श्री. सलीम यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भारत आनंदा सावंत, द्वारा, कृषि विभाग, जिल्हा परिषद, परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद उपविभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (सार्वजनिक बांधकाम), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/ ८५५
निर्णय दिनांक २०-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. ओमप्रकाश जगन्नाथजी डागा,<br>रा. कोतवाली पो.स्टे. समोर, नवा मोंढा, परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>कार्यालय अधीक्षक अभियंता (संवसू), महाराष्ट्र राज्य<br>विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता (संवसू), महाराष्ट्र राज्य विद्युत<br>वितरण कंपनी मर्यादित, परभणी | : | प्रतिवादी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत्यक्षात | : | जन माहिती अधिकारी | : | कार्यकारी अभियंता (संवसू), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी |
| | | जन अपिलीय अधिकारी | : | अधीक्षक अभियंता (संवसू) मंडळ, महावितरण, परभणी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०४-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०३-२०१० रोजी स्वतः सादर केलेले पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील क्रमांक ८५५/२००९ हे ते स्वखुषीने मागे घेत आहेत व ते रद्द करण्यात यावे, अशी विनंती त्यांनी आयोगास केलेली आहे. त्यांनी या अर्जामध्ये असेही नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याने ते स्वतःचे अपील मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे द्वितीय अपील, दिनांक १८-०३-२०१० रोजीच्या पत्राद्वारे मागे घेतले असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ८५५/२००९, दिनांक ०६-०४-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. ओमप्रकाश जगन्नाथजी डागा, कोतवाली पो.स्टे. समोर, नवा मोंढा, परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (संवसू), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता (संवसू) मंडळ, महावितरण, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८६०

निर्णय दिनांक २०-०३-२०१०

१ श्री. विजयकुमार दगडोपंत गरड, : अपिलार्थी

रा. फडकुले निवास, रामनगर, उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ,

सार्वजनिक बांधकाम खाते, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील माहिती देण्यास दिरंगाई केल्याने, अपूर्ण माहिती दिल्याने आणि उर्वरित माहिती देण्यास जाणीवपूर्वक विलंब केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व त्यांच्या मूळ अर्जातील अंदाजपत्रक क्रमांक १२८/०६-०७ कामासंबंधी केलेल्या संपूर्ण पत्रव्यवहाराच्या सत्यप्रती, पुरवणी 'अ', जोडपत्र 'ब' व आदेशाच्या झेरॉक्स प्रती, अशा माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण सहा मुद्दयांव्दारे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६,२६० इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता ते या शुल्कासंदर्भात आणि माहिती हस्तगत करुन घेण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याशी वेळोवेळी पत्रव्यवहार करत राहिले. अंतिमतः त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील काही माहिती दिनांक २३-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे रुपये ५२ इतके शुल्क अपिलार्थीकडून प्राप्त करुन घेऊन दिनांक ०४-०२-२००९ रोजी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०३-२००९ रोजी आदेश पारीत करुन अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दिनांक १३-०४-२००९ रोजी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अंदाजपत्रक क्रमांक १२८/०६-०७ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १६-०४-२००९ रोजीच्या पत्राव्दारे रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०४-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-०४-२००९ रोजी म्हणजे, अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जानंतर रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली असल्याने आणि यासंदर्भातील योग्य तो पुरावा आयोगास दाखविला असल्यामुळे, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त झाली आहे, असे अनुमान काढण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विजयकुमार दगडोपंत गरड, रा. फडकुले निवास, रामनगर, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ, सार्वजनिक बांधकाम खाते, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२३१

निर्णय दिनांक २०-०३-२०१०

१ श्री. अंबादास तात्यासाहेब गायकवाड, : अपिलार्थी
नवगण कॉलेज रोड, मित्रनगर, एकनाथ आबूज यांचे
घराशेजारी, साई अपसाना बिल्डींग, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,
वडवणी, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, वडवणी, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती अधिका-याने माहिती दिली नसल्याने त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी व अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करण्यात यावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, वडवणी तालुक्यातील " मौजे उपळी येथील गट नंबर २२३, २२५, २२७, २२८, २३०, २३१, व २५१ या गटांवर कलम १४५ प्रमाणे लावणीबाबत " या विषयावर एकूण १४

मुद्दयांव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी वेळ लागण्याची शक्यता असल्याकारणाने अपिलार्थीस त्यांना माहिती देण्यासाठी मुदत मागितली आणि यानंतर परत अपिलार्थीस अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, वडवणी यांनी विना दिनांकाच्या पत्रान्वये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क प्रतिपृष्ठ रुपये दोन या दराने शासन कोषात भरण्याची विनंती केली. तथापि अशा प्रकारच्या प्रतिसादांनी समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, वडवणी यांच्याकडे दिनांक १३-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या मुदतीनंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आणि अपिलार्थी हजर आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. त्यांनी या प्रकरणी मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ व्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची आहे, आणि मुद्दा क्रमांक ६ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास या प्रकरणाची वस्तुस्थिती आणली आहे. या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती

अधिकारी यांच्याकडे कोणतीही माहिती मागितलेली नाही. अपिलार्थीच्या अर्जातील उर्वरित मुद्दा क्रमांक ३, ४, ५, ७, ८, ९, १० व १३ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. अशा प्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नसल्याने ती माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे ती माहिती देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ११, १२ व १४ शी संबंधित माहिती मात्र, ती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ११, १२ व १४ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत तर दिली नाहीच, परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-१२-२००८ रोजीच्या आदेशाव्दारे सूचना देऊनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो कोणतीही माहिती न पुरवून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (महसूल) यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अंबादास तात्यासाहेब गायकवाड, नवगण कॉलेज रोड, मित्रनगर, एकनाथ आबूज यांचे घराशेजारी, साई अपसाना बिल्डींग, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, वडवणी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, वडवणी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२३२

निर्णय दिनांक २०-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. रामप्रसाद माधवराव पोरवाल,<br>बालाजी मंदिर रोड, मोंढा, परतूर, तालुका परतूर,<br>जिल्हा जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परतूर,<br>तालुका परतूर, जिल्हा जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप आयुक्त (नगरपरिषद प्रशासन),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०७-२००८ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, डिपॉझिट मूळ पावती शोधून अपिलार्थीस पावती परत देण्याचे आदेश देऊनही त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी पावती परत न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे आणि आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन संबंधित मुख्याधिकारी, नगर परिषद यांना दंडीत करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास विनंती अर्ज सादर करुन, नळ कनेक्शनपोटी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे जमा केलेली अनामत रक्कम रुपये ३०० इतकी, नळ कनेक्शन बंद असल्याने परत देण्याची किंवा मूळ पावती परत देण्याची मागणी केली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या पावतीची प्रत त्यांच्या कार्यालयात सापडत नसल्याचे अपिलार्थीस कळविले व या पत्रासोबत अपिलार्थीने परतूर नगरपरिषदेतील एक कर्मचारी श्री. खनपटे यांच्याकडे त्यांच्या ३०० रुपये डिपॉझिटच्या मूळ पावतीची प्रत दिली होती त्यांचा खुलासा अपिलार्थीस पाठविला, तथापि अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०१-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले आणि जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने दिनांक १७-०७-१९९९ रोजी मूळ पावती जमा केली असल्याबद्दल शासकीय जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने दिलेल्या पोच पावतीबाबत शहानिशा करण्याची व या पावतीचा शोध घेऊन या पावतीची प्रत अपिलार्थीस देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस त्यांनी भरलेल्या अनामत रकमेची पावती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी हजर आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची त्यांना आवश्यकता असल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्या पावतीची प्रत मागितली आहे, ती आता त्यांच्या कार्यालयात शोध घेऊनही सापडत नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम क्रमांक २३ च्या तरतुदीन्वये त्यांनी ३०० रुपये इतकी अनामत रक्कम नगरपरिषदेकडे जमा केली आहे असे प्रमाणपत्र दिनांक ०६-०२-२००८ रोजी दिले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या अनामत रकमेच्या पावतीची प्रत मागितली आहे, त्या अनामत रकमेची मूळ पावती परतूर नगरपरिषदेच्या कार्यालयात दिनांक १७-०७-१९९९ रोजी जमा केलेली आहे. तथापि आता या पावतीची प्रत अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागितल्यानंतर मात्र, ती प्रत जन माहिती अधिकारी यांना सापडत नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले आहे. तेव्हा यासंदर्भात मुख्याधिकारी, नगरपरिषद, परतूर यांना त्यांनी अपिलार्थीने नगरपरिषदेस त्यांच्या नळ कनेक्शन संदर्भात सादर केलेली मूळ पावती (दिनांक १७-०७-१९९९) जतन करुन ठेवण्याची जबाबदारी नगरपरिषदेच्या ज्या कर्मचा-यावर होती त्या कर्मचा-यावर आता प्रशासकीय स्वरुपाची कारवाई हे आदेश निर्गमित होताच एक महिन्याच्या आत करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती संदर्भातील वस्तुस्थिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य कळवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या अनामत रकमेच्या पावती संदर्भातील वस्तुस्थितीदर्शक माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने नगरपरिषदेस त्यांच्या नळ कनेक्शन संदर्भात सादर केलेली मूळ पावती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी नगरपरिषदेच्या ज्या कर्मचा-यावर होती त्या कर्मचा-यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंग-विषयक कारवाई हे आदेश निर्गमित होताच एक महिन्याच्या आत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रामप्रसाद माधवराव पोरवाल, बालाजी मंदिर रोड, मोंढा, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (नगरपरिषद प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२३३

निर्णय दिनांक २०-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अब्दुल मतीन अब्दुल रशीद,<br>स्ट्रीट नं. २, अल्लामा इक्बाल शाळेच्या बाजूला (पश्चिम बाजू), दुःखीनगर, जुना जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप अभियंता, (सिंचन), जिल्हा परिषद, उपविभाग, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, (सिंचन), जिल्हा परिषद, जालना | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-१२-२००९ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे आणि आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, मंठा व परतूर तालुक्यातील वर्ष २००३ ते दिनांक २९-१२-२००७ या कालावधीमध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत केलेल्या पाझर तलावाची यादी, कामावर झालेला खर्च, या कामावर हजर असलेल्या मजुरांच्या हजेरीपत्रकाच्या सत्यप्रती, अशी माहिती रजिस्टर्ड पोस्टाने मागितली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमा-तील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-०३-२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस पुढील अपिलात जाण्याची संमती देण्यात येत आहे, असा निर्णय दिला. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नसल्याचे आयोगासमोर कबूल केले. त्यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तत्कालीन उप अभियंता श्री. डी. बी. जाधव (सध्या निलंबीत) यांच्याकडे उपलब्ध असून, ते अपिलार्थीने मागणी केलेली माहिती श्री. डी. बी. जाधव यांच्याकडून उपलब्ध करुन घेऊन नंतर ती एक महिन्याच्या आत अपिलार्थीस पुरवू शकतील.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देणे भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली

संपूर्ण माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. डी. बी. जाधव यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर श्री. डी. बी. जाधव यांच्याकडून प्राप्त झाली नाही तर, त्यांनी श्री. डी. बी. जाधव यांच्यावर फौजदारी कारवाई करण्याच्या संदर्भात पुढील कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने ज्या जन माहिती अधिका-याकडे या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाव्दारे माहिती मागितली आहे त्या जन माहिती अधिका-याने (श्री. डी. बी. जाधव) अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली कोणतीही माहिती न पुरवून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (जलसंपदा) यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत रजिस्टर्ड टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (जलसंपदा) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी (श्री. डी. बी. जाधव) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २०-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अब्दुल मतीन अब्दुल रशीद, स्ट्रीट नं. २, अल्लामा इक्बाल शाळेच्या बाजूला (पश्चिम बाजू), दु:खीनगर, जुना जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, (सिंचन), जिल्हा परिषद, उपविभाग, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८६५

निर्णय दिनांक : २२.०३.२०१०

१. श्री. विजयकुमार दगडोपंत गरड, :अपिलार्थी
उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा :प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (विद्युत),उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (विद्युत), औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जाची तपासणी केली असता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या याच विषयासंदर्भातील अपिलाची आयोगाकडे दि. २०.०३.२०१० रोजी सुनावणी झाली असून यासंदर्भात आयोगाने आपले आदेश पारित केले आहेत. अपिलार्थीच्या दि. २०.०३.२०१० रोजीच्या अपील निर्णयाशी संबंधित असलेला प्रथम अर्ज व आज रोजी विचाराधीन अपिलाशी संबंधित माहितीसाठीचा अर्ज एकसमान आहेत. ही वस्तुस्थिती पाहता,

अपिलार्थीच्या आज रोजीच्या विचाराधीन अपील अर्जावर आयोगाने अपिलार्थीच्या अशाचप्रकारच्या दुसऱ्या अपील अर्जावर दि. २०.०३.२०१० रोजी निर्णय दिला असल्याने, वेगळयाने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २२-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विजयकुमार दगडोपंत गरड,फडकुले निवास, रामनगर,उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम (विद्युत),उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम (विद्युत), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८६६
निर्णय दिनांक : २२.०३.२०१०

१. श्री. एस.व्ही. वादोने, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
सोलापूर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय समाज कल्याण अधिकारी,
पुणे विभाग, पुणे.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक,
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी
कार्यालय, सोलापूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न देऊन व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन माहिती अधिकार कायदा २००५ चा अनादर केला असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई करण्याची त्यांनी आयोगास पुढे विनंती केली असून आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दि. ०१ डिसेंबर, २००५ ते ३० नोव्हेंबर, २००८ या कालावधीतील प्राप्त झालेले

माहितीसाठीचे अर्ज, मुदतीत माहिती दिलेल्या अर्जांची संख्या, तसेच जन माहिती अधिकारी यांच्याविरोधात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रथम अपील अर्जांची व राज्य माहिती आयुक्तांकडे दाखल झालेल्या द्वितीय अपील अर्जांची संख्या, याचबरोबर प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रथम अपील अर्जांची संख्या व मुदतीत सुनावणी घेतलेल्या अपील अर्जांची संख्या, त्या निर्णयासंदर्भात मा.राज्य माहिती आयुक्त यांच्याकडे दुसरे अपील दाखल झालेल्या अर्जांची संख्या, अशी माहिती विशिष्ट विवरणामध्ये नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती संकलीत करण्याचे काम सुरु असून माहिती देण्यासाठी एक महिन्याची मुदतवाढ मागितली. यानंतर अपिलार्थीने त्यांच्या दि. २४.०१.२००९ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना दि. १७.०२.२००९ पर्यंत मुदतवाढ दिली. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, पुणे यांच्याकडे दि. १८.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिला असल्याचे, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. तथापि तदनंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून १४४ दिवसांच्या विलंबाने माहिती प्राप्त झाली आहे. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर रु.२५०/- प्रमाणे एकूण रु. ३६,६००/- इतकी शास्ती लावण्यात यावी. त्यांनी रजिस्टर्ड टपालाद्वारे माहिती मागितली असताना जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहितीसाठी

त्यांच्या कार्यालयात बोलाविण्याची गरज नव्हती. त्यांना झालेल्या आर्थिक नुकसानापोटी त्यांना नुकसान भरपाई मंजूर करण्यात यावी, अशी त्यांनी त्यांच्या युक्तिवादाच्या अखेरीस आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी त्यांच्या दि. १७.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती देण्याकरिता एक महिन्याची मुदतवाढ मागितली होती. सदर माहिती त्यांना संकलीत करुन द्यावयाची होती. त्यांनी दि. १०.०७.२००९ रोजी अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती हस्तांतरित केली आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रतिसाद हा चुकीचा आहे. या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीकडून त्यांना माहिती देण्यासाठी एक महिन्याची मुदतवाढ मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये अशाप्रकारे अर्जदाराकडून मुदतवाढ मागून घेण्याची कोणतीही तरतुद नाही. अपिलार्थीने त्यांच्या दि. १७.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने पुरवून त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब संचालक, समाजकल्याण यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता माहिती प्राप्त झाली असल्याचे अपिलार्थीने मान्य केले असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आता आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

प्रसंगावशात, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांना नुकसानभरपाई मंजूर करण्याची आयोगास केलेली विनंती पाहता, जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम १९(८) (ख) ची तरतुदीअन्वये असे आदेशित करण्यात येत आहे की, आयोगाकडील सुनावणीस हजर राहण्यासाठी अपिलार्थीस उस्मानाबाद ते औरंगाबाद या प्रवासाकरिता लागलेल्या एस.टी.च्या जाण्यायेण्याच्या भाडयाची रक्कम

रु.३७०/- इतकी त्यांनी अपिलार्थीस नुकसान भरपाईपोटी, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत अदा करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, उस्मानाबाद ते औरंगाबाद या एस.टी.प्रवासाचे येण्याजाण्याचे एकूण भाडे रु. ३७०/- इतके नुकसान भरपाईपोटी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत अदा करावे.

३. संचालक, समाजकल्याण,म.रा.पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. एस.व्ही. वादोने,नॅशलन मशीन सप्लाईज कं.,ताज कॉम्प्लेक्ससमोर, नवीन पूल, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय, सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, समाज कल्याण संचालनालय,३/३,चर्चरोड, पोलीस आयुक्त कार्यालयाच्या पाठीमागे, जी.पी.ओ.पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८६७
निर्णय दिनांक : २२.०३.२०१०

१. श्री. अंबादास बाळासाहेब वऱ्हाडे, : अपिलार्थी
रा.तुळजापूर,जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत सारोळा, ता.जि.उस्मानाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पं.),
पंचायत समिती, उस्मानाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी जाणूनबुजून टाळाटाळ केल्याने व माहिती अधिकार अधिनियमाची पायमल्ली केल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयामार्फत झालेल्या कामासंदर्भात सन २००० ते २००८ या कालावधीतील विस्तृत स्वरुपाची माहिती एकूण १८ मुद्यांद्वारे, नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. या अर्जावर

अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. यासंदर्भात सबळ पुरावा म्हणजे त्यांच्या कुटुंबाच्या रेशन कार्डाची झेरॉक्स प्रत त्यांनी या अर्जासोबत जोडली होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे देताना त्यावर दि. २४.१२.२००८ अशी तारीख दर्शविली असून जन माहिती अधिकारी यांना देखील तो दि. २४.१२.२००८ रोजीच प्राप्त झाला आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०९.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्याच्या सहीचे प्रमाणपत्र अपिलार्थीस सादर करण्याचे सूचित केले. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १२.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.०३.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबत आवश्यक ते प्रमाणपत्र दर्शविल्यानंतर अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीसाठीच्या अर्जासोबत त्यांनी ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचा सबळ पुरावा जोडला नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ०९.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस हा पुरावा मागितला तथापि अपिलार्थीने अशाप्रकारचा कोणताही पुरावा न दाखविता, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलाच्या सुनावणीच्या वेळी देखील जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी जर दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा सबळ पुरावा दाखल केला तर त्यांना विनामूल्य माहिती प्राप्त होऊ शकेल, असे अपिलार्थीस सूचित केले होते, यावर अपिलार्थीने त्यांच्या कुटुंबाच्या रेशनकार्डची मूळ प्रत जन अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करण्याची तयारी

दर्शविली होती. तथापि यानंतर अपिलार्थीने अशाप्रकारचा पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही स्वरुपात व कधीही सादर केला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार आहे. अपिलार्थीने त्यांच्याकडे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचा सबळ पुरावा सादर केला तर ते अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्यास तयार आहेत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही आठ वर्षे कालावधीची व विस्तृत व्याप्तीची अशी आहे.अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते. तथापि यानंतर त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी वेळोवेळी संधी देऊनही त्यांनी हा पुरावा जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणाकडेही सादर केलेला नाही. अपिलार्थी जर दारिद्रयरेषेखालील व्यक्ति असतील तर त्यांना राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दि. ११.१०.२००५ रोजी जारी केलेल्या क्र.आर.टी.आय. २००५/ सी.आर. ३१५/०५/५ च्या अधिसूचनेतील प्रपत्र 'अ' च्या नमुन्याच्या अखेरीस दिलेली तळटीप पाहता,जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे दारिद्रयरेषेखालील व्यक्ति असल्याचा सबळ पुरावा जन माहिती अधिकारी यांना सादर करणे त्यांना अनिवार्य आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी नाकारलेले नाही, त्यामुळे अजूनही अपिलार्थीस ही माहिती आवश्यक असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ते (अपिलार्थी) दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा सबळ पुरावा सादर करुन त्यांच्याकडून आवश्यक ती माहिती विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी अपिलार्थी हे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे स्वतः जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा सबळ पुरावा मागितला यामध्ये जन माहिती अधिकारी यांची कोणतीही चूक नाही, त्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील,त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती न देण्यासंदर्भात घेतलेले

आक्षेप, आवश्यक त्या कागदपत्रांअभावी, सिध्द होत नसल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अंबादास बाळासाहेब वऱ्हाडे,वेताळनगर,तुळजापूर,ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत सारोळा, ता.जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८६८
निर्णय दिनांक : २२.०३.२०१०

१. श्री. बद्रिनारायण रामेश्वर उपरे, : अपिलार्थी
रा.जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता,
जिल्हा परिषद, सिंचन उपविभाग अंबड, जि.जालना.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद (सिंचन) विभाग,
जालना.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय अधिकारी,
जिल्हा परिषद सिंचन उपविभाग
अंबड, जि.जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे आणि माहितीच्या प्रतीचे विवरण न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असून त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी या अपील अर्जाद्वारे कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "जिल्हा रोजगार हमी योजना जालना अंतर्गत दि. ०१.०४.२००७ ते माहिती मिळेपर्यंत किती पतमर्यादा प्राप्त झाली व ती कशी वितरित करण्यात आली याची गावनिहाय, कामनिहाय, मजूरनिहाय,

शाखा अभियंतानिहाय व  संपूर्ण ग्रामीण रो.ह.यो. अंतर्गत झालेल्या कामांची माहिती", अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीचा कालावधी 'दि. ०१.०४.२००७ ते माहिती मिळेपर्यंत' असा नमूद केले असल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १६,०००/- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.०१.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर अधिनियमातील कलम १९(६) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १६,०००/- इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.०१.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर दि. २९.०५.२००९ रोजी सुनावणी घेऊन दि. ०५.०६.२००९ पूर्वी अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविण्याचे आदेशित केले. तथापि अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे कोणतेही शुल्क न भरल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस दि. ०२.०६.२००९ रोजी तीन पृष्ठांची माहिती विनामूल्य पुरविली आहे.

या  प्रकरणाशी  संबंधित  घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहितीच मूळात अवैध आहे. कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचा निश्चित कालावधी या अर्जामध्ये नमूद करणे आवश्यक असते. या अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ०१.०४.२००७ ते माहिती मिळेपर्यंत प्राप्त झालेल्या पतमर्यादेच्या संदर्भात माहिती मागविली असल्याचे दिसून येत आहे. हा कालावधी निश्चित स्वरुपाचा आहे, असे येथे आढळून येत नाही. त्याचबरोबर अपिलार्थीने या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेल्या कामांची माहिती अशी मोघम स्वरुपात माहिती मागविली आहे. 'कामांची माहिती' म्हणजे निश्चित कोणत्या मुद्यावरील माहिती, हे अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती देखील मोघम स्वरुपाची असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने जरी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मोघम स्वरुपाची माहिती मागविली असली तरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली व अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज करेपर्यंतची माहिती अपिलार्थीस दि. ०२.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे म्हणजेच, अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज दाखल केल्यानंतर पुरविली असल्यामुळे व प्राप्त माहितीवर भाष्य करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर आज रोजी उपस्थित नसल्यामुळे अथवा यासंदर्भात त्यांनी आयोगाकडे कोणताही सबळ लेखी युक्तिवाद सादर केलेला नसल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बद्रिनारायण रामेश्वर उपरे,जि.प.शाळेच्या पाठीमागे, म्हाडा कॉलनी, ऑ.नं.२७,जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जि.प.सिंचनउपविभाग अंबड, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद (सिंचन) विभाग,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२८५
निर्णय दिनांक २२/०३/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेख महंमद अय्युब महंमद याकूब,<br>रा.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>नगररचनाकार,<br>अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपायुक्त,<br>अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर | | |

**निर्णय**

श्री. शेख महंमद अय्युब महंमद याकूब यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १९.०७.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. ०१.०२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २२.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर सुनावणी घेऊन दि.२५.०३.२००८ रोजी निर्णय दिला. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि,

प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा २५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख महंमद अय्युब महंमद याकूब, १७९०, करशेटजी रोड, रामचंद्र खुंट, अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८९८
निर्णय दिनांक २२/०३/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सय्यद एजाज पिता स.अहमद मोहियोद्दीन,<br>रा.बर्दापूर, ता.अंबाजोगाई, जि.बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपशाखा व्यवस्थापक,<br>सह कृषी व ग्रामिण बहूउद्देशीय बँक ता.शाखा<br>अंबाजोगाई, जि.बीड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी,<br>पो.अधीक्षक कार्यालय, बीड | | |

**निर्णय**

श्री. सय्यद एजाज पिता स.अहमद मोहियोद्दीन यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २५.०८.२००६ रोजी केलेले दिनांक ०५.०९.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १३.०३.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. १७.०४.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे एकाच प्राधिकरणाशी संबंधित असणे गरजेचे आहे. तथापि अपिलार्थीने विचाराधीन अपिलासंदर्भातील मूळ अर्ज व त्यावरील प्रथम अपील वेगवेगळ्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे केल्याचे दिसून येत आहे. या बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सय्यद एजाज पिता स. अहमद मोहियोद्दीन, मु.पो. बर्दापूर, ता.अंबाजोगाई, जि.बीड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८६१

निर्णय दिनांक २२-०३-२०१०

१ श्री.माणिकराव माधवराव मुलगीर, : अपिलार्थी

C/o. बी - ५, पोलीस मुख्यालय, परभणी - ४३१ ४०१

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी व्यक्तिशः माहिती मागितली असताना देखिल त्यांना ती पोस्टाने उशिरा पाठविल्यामुळे व विना तारखेची माहिती दिल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. तसेच महाराष्ट्र अपंग शिक्षण संस्था परभणी येथील रिक्त कर्मचारी पदाची, तारीख टाकून संपूर्ण माहिती देण्यात यावी, अशी त्यांनी आयोगास अखेरीस विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण २ मुद्यांद्वारे माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी दिनांक ३०-०४-

२००८ रोजी मा. आ. श्री. प्रकाश अण्णा शेंडगे यांचे दुरध्वनी संदर्भान्वये उपोषण स्थळी त्यांना दिलेले पत्र व त्यावर त्यांनी केलेली कार्यवाही, महाराष्ट्र अपंग शिक्षण संस्था परभणी येथील रिक्त कर्मचारी पदाची सविस्तर माहिती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०३-२००९ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित केले. या आदेशामध्ये दिनांक १६-०३-२००९ रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांना त्यांनी मागितल्याप्रमाणे माहिती मिळाली असल्याने त्यांचे प्रकरण निकाली काढले आहे, असे त्यांनी नमूद केले आहे. मध्यंतरीच्या काळात जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस काही माहिती पुरविली आहे. तथापि यानंतर विना तारखेची माहिती दिल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ३० दिवसाच्या आत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी त्यांच्या दिनांक १९-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांना ३ दिवसाच्या आत माहिती देणेबाबत पत्र दिले. त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहिती मागितली असताना त्यांना ती पोस्टाद्वारे पाठविण्यात आली. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २७-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे पाठविलेली माहिती त्यांना प्रत्यक्षात दिनांक ०९-०२-२००९ रोजी आर. पी. ए. डी. द्वारे पाठविली असून ती त्यांना दिनांक १०-०२-२००९ रोजी प्राप्त झाली आहे. प्राप्त माहिती अर्धवट, दिशाभूल करणारी व विना तारखेची

असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कार्यवाही करावी.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अर्ज केल्यापासून ३० दिवसाच्या आत कुठलाही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १९-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांना ३ दिवसाच्या आत माहिती देण्याची मागणी केली होती. सदर पत्राची प्रत अपिलार्थीने आयोगास सादर केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १२-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस पाठविलेली माहिती प्रत्यक्षात त्यांनी दिनांक ०९-०२-२००९ रोजी आर.पी.ए.डी. द्वारे अपिलार्थीस पाठविली असल्याचे सदर पाकिटावरील पोस्टाच्या नोंदीवरुन आढळून येत आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनिमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री.माणिकराव माधवराव मुलगीर, C/o. बी - ५, पोलीस मुख्यालय, परभणी - ४३१ ४०१

२ जन माहिती अधिकारी, समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८६२

निर्णय दिनांक २२-०३-२०१०

१ श्री. होळे दशरथ अच्युतराव, : अपिलार्थी

रा. अष्टामोड, पो. गांजूर, ता चाकूर, जि. लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

जिल्हा परिषद, कृषि विभाग, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

जिल्हा परिषद, कृषि विभाग, लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपुर्वक दुष्ट हेतूने दडवून ठवून केंद्रीय माहिती अधिकार कायद्याचा भंग केला असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, 'जिल्हा परिषद, कृषि विभागातर्फे अनुदान तत्वावर राबविण्यात येणाऱ्या योजनेचे (जी. आर.) परिपत्रकाची सत्यप्रत मिळणेबाबत' या विषयावर इ.स. १९९० ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

"इ.स. १९९० ते २००८ पर्यंतचे (जी. आर.) जिल्हा परिषद कृषि विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या अनुदान तत्वावरील योजनेच्या लाभार्थी पात्रतेचे निकष, अटी पहाणे बाबत."

सदर माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून शिघ्र टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २०८०/- व पोस्टेज खर्च रु. १२/- इतके चलनाद्वारे कोषागारात भरुन चलनाची मूळ प्रत त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले होते. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-१२-२००९ रोजी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुदतीच्या आत शुल्क भरण्याबाबत पाठविलेल्या पत्राचा पोस्टेज दाखला सादर केल्यामुळे, अपिलार्थीस सशुल्क माहिती घेण्याचे आदेशित केले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांच्या दिनांक ०५-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २०८०/- व पोस्टेज खर्च रु. १२/- इतके चलनाद्वारे कोषागारात भरुन चलनाची प्रत त्यांच्या कार्यालयात सादर करण्याचे सूचित केले होते.

तथापि अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल त्यांच्या निर्णयाद्वारे अपिलार्थीस सशुल्क माहिती घेण्याचे सूचित केले होते. तथापि अद्यापपावेतो अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न केल्याने ते अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १६-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना दिनांक ०५-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे सूचित केले होते. हे पत्र अपिलार्थीस अंडर पोस्टींग ऑफ सर्टिफिकेटद्वारे पाठविल्याचा योग्य पुरावा- त्यांच्या कार्यालयाची जावक नोंदवही- जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केली आहे. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ११-०२-२००९ रोजीच्या आदेशाद्वारे अपिलार्थीस सशुल्क माहिती घेण्याचे सूचित करुनही अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे केलेला नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याची त्यांनी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये तयारी दर्शविल्याचे अथवा ते भरल्याचे दिसून येत नसल्याने व परिणामी अधिनियमातील कलम ७ (५) चा भंग केल्यामुळे अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतः जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. होळे दशरथ अच्युतराव, अष्टामोड, पो. गांजूर, ता चाकूर, जि. लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८६३

निर्णय दिनांक २२-०३-२०१०

१ श्री. माळी नंदकुमार माणिक, : अपिलार्थी

रा. कामठा, पो. आपसिंगा, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय कामठा,

पो. आपसिंगा, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,

जि. उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती एकूण ८ मुद्यांद्वारे खालीलप्रमाणे मागितली होती.

" १) मार्च २००८ मधील १२ वा वित्त आयोगाचा हप्ता ३० हजर रुपये ठरावाप्रमाणे गटार बांधकामासाठी मजुरी प्रमाणे वापर केलेला आहे किंवा नाही याची माहिती M. B. झेरॉक्स इस्टेमेट झेरॉक्स २) दलीत वस्ती सुधार योजनेअंतर्गत सिमेंट रोड व गटार व इस्टेमेट झेरॉक्स एम बी झेरॉक्स खर्चाचे व्हॉवचेर झेरॉक्स चेकचे झेरॉक्स ३) ग्रा. पं. कामठा वसूली किती टक्के आहे व मार्च ८ पासून झालेल्या खर्चाचे व्हावचर झेरॉक्स व मार्च ८ पासून ते फेब्रुवारी ९ पर्यंत किर्द चे झेरॉक्स ४) मार्च ८ पासून फेब्रुवारी ९ पर्यंत किती मासीक मिटींगा व ग्रामसभा झाल्या याची प्रोसीडींग नकला दिनांक २८-०२-२००९ पर्यंत द्यावी ५) मार्च २००८ मध्ये मंजुर निधी १२ वा वित्त आयोग कोणत्या कामात खर्च झाला त्यावर माहिती खर्च न झाल्यास त्याचे कारण ६) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना मधील मजुर कामे व झालेली कामे याची माहिती द्यावी २००८ पूर्ण सालातील व पेंन्टींग कामे किती आहेत व ते कशामुळे आहेत त्याची माहिती द्यावी. ७) दलीत सुधार योजना समाजकल्याण मार्फत दोन लाखाचे काम सिमेंट रोड व गटार कामाबाबत एम बी झेरॉक्स व इस्टेमेट झेराक्स ८) कामठा ग्रामपंचायतीच्या मासीक मिटींगा व ग्रामसभा मिटींगाच्या झेरॉक्स प्रती २००९ मधील पूर्ण वर्षाचे."

(टीप :- अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतलेला आहे.)

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना ७ दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही व त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी पूर्णतः सुसंगत नसल्याने, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मधील - मार्च २००८ मधील १२ वा वित्त आयोगाचा हप्ता ३०,०००/- रु. ठरावाप्रमाणे गटार बांधकामासाठी मजूरीप्रमाणे वापर केलेला आहे किंवा नाही, मुद्दा क्रमांक ३ मधील - ग्रामपंचायत कामठा येथील वसूली किती टक्के आहे - या मुद्यांवरील माहिती, ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे मत / स्पष्टीकरण अपेक्षित करणारी असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र या मुद्यांतील उर्वरित भागाशी संबंधित माहिती अपिलार्थीस देय होत आहे. मुद्दा क्रमांक ६ मधील - संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेमधील सन २००८ मधील मंजूर कामे व झालेली कामे याची माहिती या मुद्यावरील मंजूर काम व झालेले काम 'याची माहिती' म्हणजे नेमकी कोणत्या मुद्यावरील माहिती हे स्पष्ट होत नसल्याने व ती मोघम स्वरुपाची असल्यामुळे व पेन्टींग कामे कशामुळे आहेत या मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती असल्याने, या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. या मुद्यावरील उर्वरित माहिती - पेंटींग कामे किती आहेत - ही व मुद्दा क्रमांक ७ व ८ मधील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली व अपिलार्थीस देय असलेली माहिती याचे वरील परिच्छेदात केलेले पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, ३ व ६, अंशतः व उर्वरित मुद्यांवरील संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला तर नाहीच, शिवाय जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ३१-०३-२००९ रोजीच्या निर्णयाद्वारे सूचित करुनही त्यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो कोणतीही माहिती पुरविलेली नाही. हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम (२०) च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. माळी नंदकुमार माणिक, कामठा, पो. आपसिंगा, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय कामठा, पो. आपसिंगा, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८६४

निर्णय दिनांक २२-०३-२०१०

१ श्री. अजिनाथ नारायण जाधव, : अपिलार्थी
मु.पो. अंबेजवळगे, ता. जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, न्यू. इंग्लिश स्कूल, अंबेजवळगे,
ता. जि. उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, शिक्षण विभाग,
उस्मानाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. लोमटे धर्मराज ज्ञानोबा

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०४-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी अद्यापपावेतो कोणताही निर्णय दिला नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. लोमटे धर्मराज ज्ञानोबा, सहशिक्षक न्यू. इंग्लिश स्कूल अंबेजवळगे यांच्या सेवेसंबंधिची व त्या अनुषंगाने शासन निर्णयाची साक्षांकित सत्यप्रत मिळणेबाबतची सन १९८७-८८ ते दिनांक २१-०१-२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ११ मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक २५-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, विशेषतः या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी लक्षात घेऊन, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय परित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती अयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालील-प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अजिनाथ नारायण जाधव, मु.पो. अंबेजवळगे, ता. जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, न्यू. इंग्लिश स्कूल, अंबेजवळगे, ता.जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८६९

निर्णय दिनांक २२-०३-२०१०

१ श्री. विकास कुमार बागडी, : अपिलार्थी
नाथ गल्ली, सदर बाजार,
जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे सिंचन, जिल्हा परिषद, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, जालना

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच श्री. मोहम्मद फैय्याज, उपविभागीय अभियंता, लघु पाटबंधारे जिल्हा परिषद, उपविभाग, जालना यांनी, अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या दिनांक २४-१२-२००८ रोजीच्या पत्राची प्रत आयोगास सादर केली असून, त्यांनी आयोगास याबाबत असे अवगत केले आहे की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २४-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पोस्टाने माहिती पाठविली, तथापि अपिलार्थीस ही माहिती प्राप्त होऊ शकली नाही. नंतर दिनांक ३०-०१-२००९ रोजी परत आवश्यक ती माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. ही माहिती प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने दिनांक ३०-०१-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांना माहिती प्राप्त झाल्याची व त्याव्दारे समाधान झाल्याची दिलेली पोच देखील त्यांनी आयोगास दाखविली आहे, हे पाहता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे, आणि प्राप्त माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले आहे. कागदपत्राआधारित असलेल्या या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असल्याने, खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक ८६९/२००९, दिनांक २९-०१-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विकास कुमार बागडी, नाथ गल्ली, सदर बाजार, जालना.

२ उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, जालना यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२३४

निर्णय दिनांक २२-०३-२०१०

१ श्री. शहाजी दत्तासाहेब देशमुख, : अपिलार्थी
रा. घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, घनसावंगी,
तालुका घनसावंगी, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), परतूर,
तालुका परतूर, जिल्हा जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-१२-२००८ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे करुनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने आणि जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही जन माहिती अधिका-याने त्यांना माहिती देण्यास हेतुपुरःस्सर टाळल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे आणि या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्तीची व विभागीय चौकशीची कार्यवाही करण्याची आणि अपिलार्थीस विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश देण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, घनसावंगी यांच्याकडे, पूरग्रस्त शिबिरासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - किती ठिकाणी शिबीर होते, प्रत्येक शिबिरातील आपदग्रस्तांची संख्या, वाहनाचा तपशील, डिझेल खर्च व शिबिराचा खर्च - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस तात्काळ माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी त्यांच्या वकिलासह, जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

अपिलार्थीच्या वकील श्रीमती अभया शेलकर यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेवरुन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३५० इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरले. तथापि शुल्काचा भरणा करुनही त्यांना संबंधित तहसीलदाराकडून माहिती प्राप्त झाली नाही. या प्रकरणी उपविभागीय अधिकारी, परतूर यांनी त्यांच्या दिनांक ०५-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेल्या

सूचनेवरही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही न केल्याने, त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्तीची व शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी आणि त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी आता बरोबर आणली असून, ते ही माहिती अपिलार्थीस देण्यास तयार आहेत. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडे ३५० रुपये भरल्याचा कोणताही पुरावा त्यांच्या कार्यालयास सादर केलेला नाही, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती पुरविलेली नाही. जर अपिलार्थी ही फी भरण्यास तयार असतील, तर ते अपिलार्थीस माहिती देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहिती मागविली आहे आणि त्या मागणीचा पाठपुरावा त्यांच्या दिनांक ०२-०७-२००७, दिनांक १३-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे केला आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती द्यावयाची आहे हे संबंधित जन माहिती अधिकारी यांना माहीत असणार, त्यामुळे त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस, उपविभागीय अधिकारी, परतूर यांनी आदेशित करुनही असद्हेतूने माहिती दिलेली नाही, हे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्याबरोबर आणली आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, त्यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या

कार्यालयात, वर निर्देशित केलेल्या कालावधीत, कोणत्याही कार्यालयीन दिवशी, पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधितांकडून त्यांना आवश्यक असलेली माहिती विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३५० इतके भरल्याचे नमूद केले आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरल्याचा आवश्यक तो पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केल्यानंतर, त्यांनी अपिलार्थीकडून दिनांक ०४-१०-२००७ रोजी चलनाव्दारे स्वीकारलेले शुल्क अपिलार्थीस याच कालावधीमध्ये परत करावे.

या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी वेळोवेळी पाठपुरावा करुनही त्यांना उपलब्ध न करुन देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीसाठी-चा अर्ज केला होता त्यावेळी श्री. डी. आर. मुळे नावाचे तहसीलदार माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते. ते आता नियत वयोमानानुसार सेवानिवृत झाले असल्यामुळे, त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही कारवाई आयोग आदेशित करत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ३५० इतके त्यांना, त्यांनी शुल्क भरल्याचा आवश्यक तो सबळ पुरावा सादर केल्यानंतर, याच कालावधीमध्ये परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शहाजी दत्तासाहेब देशमुख, रा. घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२३५

निर्णय दिनांक २२-०३-२०१०

१ श्री. बलभीम लक्ष्मणराव जाहेर पाटील, : अपिलार्थी
(प्रो. सीमा कन्स्ट्रक्शन्स, बीड),
लक्ष्मण व्हिला, पांगरी रोड, शाहुनगर, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,
उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या अर्जावर अयोग्य, अपुरा व अन्यायकारक निर्णय दिल्यामुळे व त्यांना दिनांक १९-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पाठविलेल्या बैठकीच्या मिनिट्सविरुध्द त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १६-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, कल्याण, नगर, बीड, नांदेड रस्त्यावर दिनांक २५-०३-१९९९ ते ३१-०३-२००८ या कालावधीमध्ये दरवर्षी झालेला खर्च, अपिलार्थीचे बील दिनांक २५-०३-१९९९ रोजी होऊनही अंतीम देयक देण्यासाठी दिनांक २०-०४-२००७ पर्यंतच्या विलंबाची कारणे व तसेच अद्यापपावेतो सुरक्षा अनामत परत न करण्याच्या कारणांची टिपणी, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस देयकाची माहिती विनामूल्य पुरविली. परत अपिलार्थीस त्यांनी दिनांक २९-०९-२००८ रोजी त्यांच्या विभागाच्या संपूर्ण केलेल्या खर्चाची माहिती अपिलार्थीस पुरविली. तथापि मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-१०-२००८ रोजी निर्णय दिला. या निर्णयाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. सदर अपील निकाली काढताना अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचा निष्कर्ष काढून हा निर्णय दिला. तथापि प्राप्त निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन आयोगास असे अवगत केले की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय दिल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड व विशेष प्रकल्प विभाग, बीडचे कार्यकारी अभियंता आणि लघुपाटबंधारे यांच्यात दिनांक १६-११-२००८ रोजी बैठक होऊन या बैठकीचे इतिवृत्त दिनांक १९-११-२००८ रोजी जारी केले. त्यामध्ये त्यांना अनामत रक्कम परत करण्याचे ठरले असताना देखील संबंधित

कार्यकारी अभियंता यांनी या कामासंदर्भातील अनामत रक्कम परत न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती दिनांक १४-०८-२००८ रोजी पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी कल्याण, नगर, बीड, नांदेड या रस्त्यावरील मार्च १९९९ ते मार्च २००८ या कालावधीमधील दरवर्षी करण्यात आलेला खर्च एवढीच माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना देय आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती - त्यांचे अंतीम देयक देण्यासाठी केलेल्या विलंबाची कारणे आणि सुरक्षा अनामत रक्कम परत न करण्याची कारणांची टिपणी - अशा प्रकारच्या माहितीचा समावेश, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये होत नाही. माहिती अधिकार अधिनियमतील तरतुदीनुसार, अर्जदाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध असेल त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देण्याकरिता अधिनियमातील तरतुदीप्रमाणे निर्णय घेणे इतपत सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. या अधिनियमा-मध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयाबाबतची, कृतीबाबतची कारणे अथवा स्पष्टीकरणे अर्जदारास देण्याचे अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्दयांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होणार नाही. अशा प्रकारे अपिलार्थीस देय असलेली माहिती या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दिनांक १४-०८-२००८ रोजी व तदनंतर दिनांक १९-०९-२००८ रोजी पुरविली असल्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती देण्याचे बाकी नाही.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये, आयोगाकडे व्दितीय अपील करण्याचे जे कारण दिले आहे त्या कारणावर विचार करण्याची अधिकारिता आयोगास नाही. अपिलार्थी व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांच्यामध्ये कल्याण, नगर, बीड, नांदेड रस्त्याच्या

कामासंदर्भात झालेल्या करारानुसार केल्या गेलेल्या कामासंदर्भात अपिलार्थीचे जर काही आक्षेप असतील तर अपिलार्थी या मुद्दयांची तड त्यांच्या जन माहिती अधिकारी यांच्याबरोबर झालेल्या कामाच्या करारनाम्यातील योग्य त्या कलमाच्या तरतुदीअन्वये संबंधित प्राधिकरणाकडून लावून घेऊ शकतात.

अपिलार्थीने ज्या कारणास्तव आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे, त्या कारणांची दखल घेऊन त्यावर निर्णय देण्याची अधिकारिता आयोगास नसल्यामुळे आणि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्या-योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बलभीम लक्ष्मणराव जाहेर पाटील, (प्रो. सीमा कन्स्ट्रक्शन्स, बीड), लक्ष्मण व्हिला, पांगरी रोड, शाहुनगर, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२३६

निर्णय दिनांक २२-०३-२०१०

१ श्री. सतीश सत्यनारायण शर्मा, : अपिलार्थी
यो. नू. प्रा. शाळेच्यामागे, हौसिंग सोसायटी, अंबाजोगाई,
तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, अंबाजोगाई,
तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,
नगरपरिषद प्रशासन, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी ४५ दिवसाच्या आत निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. त्यांनी या अपील अर्जासोबत जोडलेल्या दुस-या दिनांक २७-११-२००८ रोजीच्या स्वतंत्र अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खोटी व अपूर्ण माहिती दिली आहे व तसेच त्यांच्याकडून १०० रुपये घेऊन सुध्दा जाहीरनाम्याची नक्कल आजपावेतो न दिल्यामुळे जन माहिती अधिका-यास प्रतिदिनी रुपये २५० दंड लावण्यात यावा आणि त्यांनी १०० रुपये इतक्या

रकमेचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे करुनही त्यांची फसवणूक केल्याचे अवगत केले आहे, आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीस लावलेला विलंब लक्षात घेऊन अपिलार्थीस न्याय द्यावा, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अपिलार्थीच्या दिनांक ०९-०५-२००८ रोजी केलेल्या बांधकामा-बाबतच्या अर्जाच्या जाहीरनाम्याची नक्कल, दिनांक २६-०५-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात नकलेबाबत अर्ज सादर केला असता त्यास झालेल्या विलंबाबाबतचा खुलासा व जुन्या बांधकाम परवान्याचे नूतनीकरण करण्याबाबत योग्य ती माहिती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थी-च्या या अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०९-२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक १९-११-२००८ रोजी पारीत केले आणि या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिल्यामुळे अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिनांक १७-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली आहे. अपिलार्थीने

त्यांच्याकडे बांधकाम परवान्यासाठी दिनांक ०९-०५-२००८ रोजी प्रस्ताव सादर केला होता, तथापि या जागेची मालकी अपिलार्थी यांची नसल्यामुळे व या जागेच्या मालकी हक्काबाबत न्यायालयात वाद चालू असल्यामुळे, त्यांनी अपिलार्थीच्या बांधकामासंदर्भात कोणताही जाहीरनामा काढला नाही. अंबाजोगाई नगरपरिषदेमध्ये अशी पध्दत प्रचलीत आहे की, कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यापूर्वी नगरपरिषदेतर्फे एक जाहीरनामा काढला जातो व इतर नागरिकांच्या काही हरकती असल्यास त्या या जाहीरनाम्याव्दारे मागविल्या जातात. अपिलार्थीच्या प्रस्तुत प्रकरणी, मालकी हक्कासंदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्या जाहीरनाम्याच्या प्रतीची मागणी केली आहे तो जाहीरनामा काढला नव्हता आणि त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १७-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे तसे कळविले. तसेच अपिलार्थीच्या दिनांक २६-०५-२००८ रोजीच्या नकलेसंदर्भात अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या अर्जाची नोंद त्यांच्याकडील आवक जावक नोंदवहीमध्ये नसल्यामुळे अपिलार्थीस त्यांनी माहिती पुरविली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मध्ये अपिलार्थीने बांधकाम परवाना नूतनीकरण करण्यासंदर्भात काही माहिती मागविली आहे. तथापि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६६ मध्ये बांधकाम परवानगीचे नूतनीकरण करुन देण्याबाबत तरतूद नाही, परंतु त्यातील कलम ४८ च्या परिच्छेद २ नुसार नूतनीकरणाचा कालावधी तीन वर्षापेक्षा जास्त असणार नाही अशी तरतूद केलेली आहे व ही तरतूद अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये अवगत केली आहे. अशा प्रकारे त्यांनी अपिलार्थीस पूर्ण माहिती पुरविलेली आहे.

वरील घटनाक्रम जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस त्यांच्या बांधकाम परवाना नूतनीकरणासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविलेली नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या अर्जातील या मुद्दयांसदर्भात महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी

अधिनियम १९६६ मधील कलम ४८ च्या परिच्छेद २ ची छायांकीत प्रत अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जाहीरनाम्याची प्रत आजतागायत दिली नसल्यामुळे त्यांच्यावर प्रतिदिनी २५० रुपये शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या बांधकामासंदर्भात जाहीरनामा का काढला नाही याचा योग्य तो खुलासा, अपिलार्थीस केलेला आहे आणि याहीपेक्षा महत्त्वाचे असे आहे की, मूळात जन माहिती अधिका-याकडे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे कोणत्याही स्वरुपात उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस ती पुरविली नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित केलेली कार्यवाही ही पूर्णतः वैधानिक आणि प्रशासकीय स्वरुपाची आहे. अपिलार्थीने मागणी केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या बांधकामासंदर्भात जाहीरनामा प्रसिध्द करण्याकरिता आदेश देणे ही बाब आयोगाच्या अधिकार कक्षेबाहेरची असल्यामुळे यासंदर्भात अपिलार्थीस अपेक्षित असलेले आदेश जन माहिती अधिकारी यांना आयोगास देता येणार नाहीत आणि तसेच ही माहिती अपिलार्थीस न पुरविल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही शास्ती लावता येणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक तीनच्या संदर्भात त्यांना, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः माहिती पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सतीश सत्यनारायण शर्मा, यो. नू. प्रा. शाळेच्यामागे, हौसिंग सोसायटी, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८७४

निर्णय दिनांक : २३.०३.२०१०

१. श्री. मिलींद वसंतराव विटेकर, : अपिलार्थी
रा. सोनपेठ, जि.परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा माहिती अधिकारी,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,परभणी.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
माहिती संचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९.०२.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी तथा जिल्हा माहिती अधिकारी, परभणी श्री.अर्जुन पुंडलिक गुडदे यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दि. २२.०३.२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने, त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या विचाराधीन द्वितीय अपील अर्जाशी संबंधित मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने ते विचाराधीन अपील क्र.

८७४/२००९ हे स्वखुषीने मागे घेत असल्याचे नमूद केले आहे व या अर्जामध्ये त्यांनी अखेरीस विचाराधीन अपील रद्द करण्याची विनंती आयोगास केली आहे.

खुद्द अपिलार्थीने, आयोगाकडे केलेले त्यांचे विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्याने आणि ते रद्द करण्याची आयोगास विनंती केली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २३-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मिलींद वसंतराव विटेकर,'दत्तकृपा', ब्राह्मणगल्ली,सोनपेठ,जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा माहिती अधिकारी, माहिती व जनसंपर्क कार्यालय परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक (माहिती),माहिती व जनसंपर्क कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८७५

निर्णय दिनांक : २३.०३.२०१०

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. ओमप्रकाश जगन्नाथजी डागा,<br>रा. परभणी. | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता (सं.व सु.),<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.,<br>परभणी. | : प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता (सं.व सु.),<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.,<br>परभणी | |

प्रत्यक्षात: जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता,
विद्युत भवन,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी लि.,परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६.०४.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने दि. १८.०३.२०१० रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये स्वतः दाखल केलेले आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दि. १८.०३.२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने, त्यांनी आयोगाकडे दाखल केलेले विचाराधीन अपील क्र. ८७५/२००९ ते स्वतः स्वखुषीने मागे घेतले असल्याचे नमूद केले आहे व या अर्जामध्ये त्यांनी पुढे विचाराधीन अपील रद्द करण्याची विनंती आयोगास केली आहे.

खुद्द अपिलार्थीने, आयोगाकडे केलेले त्यांचे विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्याने आणि ते रद्द करण्याची आयोगास विनंती केली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २३-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ओमप्रकाश जगन्नाथजी डागा,कोतवाली पोलीस ठाण्यासमोर, मोंढा, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,विद्युत भवन,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता (सं.व सु.),महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९३१

निर्णय दिनांक : २३.०३.२०१०

१. श्री. लक्ष्मण नागोराव येताळे, : अपिलार्थी
रा.बाभळी (ध.),पो. मंगनाळी,ता.धर्माबाद,जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
पुरवठा विभाग,
जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी, नांदेड

प्रत्यक्षात: जन माहिती अधिकारी : सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : जिल्हा पुरवठा अधिकारी,नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२.०४.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०५.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड यांच्याकडे, धर्माबाद तालुक्यातील माहे फेब्रुवारी व जुलै, २००८ या कालावधीमध्ये एपीएल धारकासाठी आलेल्या गहू व तांदूळ वाटपासंदर्भात तहसीलदार,धर्माबाद यांनी त्यांच्याकडे पाठविलेल्या अहवालाच्या साक्षांकित प्रती, अशी माहिती

मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीचा अर्ज जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी या अर्जाची प्रत तहसीलदार,धर्माबाद यांच्याकडे त्यांच्याकडील दि. १६.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पाठविली व अपिलार्थीस परस्पर माहिती पुरविण्याचे तहसीलदार यांना सूचित केले. तथापि त्यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०६.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. परंतु जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या दि. १६.०१.२००९ रोजीच्या पत्राचा संदर्भ देऊन त्यांनी अपिलार्थीस दि. १७.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे दि. ३१.०३.२००९ माहिती देण्याचे तहसीलदार, धर्माबाद यांना सूचित केले. यानंतर दि. ३१.०३.२००९ रोजी अपिलार्थी तहसीलदार,धर्माबाद यांच्या कार्यालयात हजर राहिले असता, त्यांना माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी तहसीलदार,धर्माबाद यांना देण्याचे दि. १६.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे व तदनंतर दि. १४.०६.२००९ रोजीच्या स्मरणपत्राद्वारे सूचित करुनही तहसीलदार,धर्माबाद यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही. अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज सादर केला त्यावेळी श्री. अहिरे नावाचे अधिकारी तहसीलदार,धर्माबाद या पदावर कार्यरत होते. आता त्यांनी शासकीय सेवेतून स्वेच्छानिवृत्ती पत्करली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांच्याकडे तहसीलदार, धर्माबाद यांनी सादर केलेल्या अहवालावरुन त्यांनी 'आर' फॉर्ममध्ये तयार केलेली माहिती आयोगास दाखविली व ही माहिती अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती ही जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कार्यालयाशीच संबंधित होती. अपिलार्थीने तहसीलदार, धर्माबाद यांनी त्यांच्याकडे फेब्रुवारी व जुलै, २००८ मध्ये एपीएल कार्डधारकांना वाटप केलेल्या गहू व तांदुळासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या अहवालाच्या सत्यप्रतींची मागणी केली होती.तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे नीट अवलोकन न करता, अपिलार्थीचा अर्ज तहसीलदार,धर्माबाद यांच्याकडे पाठवून अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांनी तहसीलदार,धर्माबाद यांच्याकडे पाठपुरावा केला. वरिष्ठ अधिकाऱ्याने पाठपुरावा केल्यानंतरही तहसीलदार,धर्माबाद यांनी यावर अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केली नाही. परिणामी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे प्राप्त होणारी माहिती मिळू शकली नाही. अशाप्रकारे अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी तत्कालीन तहसीलदार,धर्माबाद व जिल्हा पुरवठा अधिकारी,नांदेड हे सारखेच जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. यापैकी तहसीलदार यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली असल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदींनुसार कारवाईचे कोणतेही आदेश आयोग देत नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक २३-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. लक्ष्मण नागोराव येताळे,रा.बाभळी (ध.),पो. मंगनाळी,ता.धर्माबाद,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२३८

निर्णय दिनांक : २३.०३.२०१०

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अनिलकुमार विपिनचंद अजमेरा,<br>रा.उस्मानाबाद. | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>जिल्हा परिषद, बांधकाम विभाग,<br>उस्मानाबाद. | : प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, उस्मानाबाद | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९.०६.२००९ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना श्री. योगेश बी.कुलकर्णी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, उस्मानाबाद तथा जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपूर्वक व दुष्ट हेतूने माहिती न दिल्यामुळे अधिनियमातील कलम २०(१) व (२) च्या तरतुदीप्रमाणे दंडात्मक व शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी आणि सात दिवसांच्या आत त्यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५.०९.२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या जिल्हा परिषदेमध्ये सिमेंट वाहतुकीच्या दरासंदर्भात असलेल्या वादाबाबत सन १९८४-८५ ते दि. ३१.१०.२००६ या कालावधीतील माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या

माहितीमध्ये - अपिलार्थीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना पाठविलेल्या नोटीसच्या संदर्भात जिल्हा परिषदेने दिलेल्या उत्तराची प्रत, हे उत्तर टपालाद्वारे,शिपायाद्वारे अथवा कुरिअरद्वारे पाठविले याची माहिती व उत्तर पाठविल्याच्या जावक क्रमांकासह दिनांक व या उत्तरावर ज्या अधिकाऱ्याने सही केली आहे, त्या अधिकाऱ्याचे नाव तसेच हे उत्तर अपिलार्थीने किंवा त्यांच्या वकीलाने स्वीकारले असल्यास त्याच्या पोचपावतीची प्रत व तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दि. २०.०२.२००१ च्या शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावामध्ये उर्वरित/फरकाची किंवा वाढीव/जादा दराने उल्लेख केला आहे काय, याचे स्पष्टीकरण - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.१०.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती भविष्यकाळातील असल्यामुळे अपिलार्थीच्या अर्जावर त्यांना कोणतीही कार्यवाही करता येत नाही, असे अपिलार्थीस कळविले.तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १६.१०.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २८.११.२००६ रोजी आदेश पारित करुन अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने त्यांचे दि. ०५.०४.२००७ रोजीचे आयोगाकडे प्रत्यक्षात दि. ११.०३.२००८ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील, त्या अपील अर्जासोबत यासंदर्भातील माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्जाची प्रत जोडली नसल्याने आक्षेपांच्या पूर्ततेसाठी परत पाठविलेले व तदनंतर अनुपालन करुन त्यांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह आयोगाकडे दि. १९.०६.२००९ रोजी फेरसादर केलेले वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांनी आपला युक्तिवाद आयोगाच्या कार्यालयात फॅक्सद्वारे पाठविला असल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या फॅक्सद्वारे दाखल केलेल्या युक्तिवादामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांना जिल्हा परिषद (बांधकाम) विभागाने आयोगाकडील नोटीस त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांना काही माहिती पाठविल्याचे समजते, परंतु अद्यापपावेतो त्यांना ही माहिती मिळाली नाही. परंतु या प्रकरणी जिल्हा परिषद कार्यकारी अभियंता श्री. वाय. बी. कुलकर्णी यांनी माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबाबाबत प्रतिदिनी रु. २५०/- याप्रमाणे एकूण १२०० दिवसांकरिता रु. ३,००,०००/- व जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.उस्मानाबाद श्री.गुलाबसिंग राठोड व संबंधित कारकुन श्री. शहापूरकर यांच्या वेतनातून रु. ३,००,०००/- मधून अर्धी रक्कम वसूल करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी आता अपिलार्थीस दि. १७.०३.२०१० रोजी टपालाद्वारे पाठविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा निर्णय दिला होता. तथापि अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे हे शुल्क भरण्याची कधीही तयारी दर्शविली नाही व सदरचे शुल्कही न भरल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १५.०९.२००६ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत म्हणजे दि. १२.१०.२००६ रोजी आवश्यक तो प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १५.०९.२००६ रोजी सन १९८४-८५ ते दि. ३१.१०.२००६ या कालावधीची माहिती मागविली होती. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेला प्रथम प्रतिसाद हा काही अंशी बरोबर असल्याचे दिसून येत आहे. यानंतर अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २८.११.२००६ रोजी सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले असता, जन माहिती अधिकारी यांनी दि. ०८.०३.२००७ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २२७४/- इतके त्यांना भरण्याचे सूचित केले. या टप्प्यावर अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क संबंधित जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने

कळविल्याचे आयोगास आढळून येत आहे. परंतु अपिलार्थीने या संपूर्ण घटनाक्रमात त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याची कधीही तयारी दर्शविल्याचे आयोगास आढळून येत नाही. आजही आयोगाकडे केलेल्या त्यांच्या लेखी युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर दि. २८.११.२००६ ते दि.२८.०३.२०१० या कालावधीकरिता शास्ती लावण्याची त्यांनी विनंती केली आहे. वास्तविक पाहता, द्वितीय अपील अर्जाची दि. २३.०१.२०१० रोजी सुनावणी होत असताना येथे देखील अपिलार्थीने भविष्यकाळातील कालावधी विचारात घेऊन जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची विनंती आयोगास केली आहे. अपिलार्थीची ही कृती चुकीची आहे.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या तीन मुद्यांवरील माहितीपैकी मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण ती माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची अथवा निर्णयाबद्दलची स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती मागणे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास अशाप्रकारची माहिती देणे या प्रक्रिया अभिप्रेत नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती दि. १७.०३.२०१० रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविली असल्याचा आवश्यक तो पुरावा आयोगास सादर केला आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

या प्रकरणी अपिलार्थीने मूळात त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये निर्देशित केलेला कालावधी चुकीचा असल्यामुळे अपिलार्थीची, संबंधित कार्यकारी अभियंता यांच्यावर शास्तीची कारवाई करण्याची विनंती, आयोगास मान्य करता येणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अनिलकुमार विपिनचंद अजमेरा,रा.तुळजाभवानी जिल्हा स्टेडियमजवळ,उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८९९
निर्णय दिनांक २३/०३/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. विलासराव विठ्ठलराव खरात,<br>रा.अंबड, जि.जालना | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, अंबड,<br>जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, अंबड,<br>जि.जालना | | |

### निर्णय

श्री. विलासराव विठ्ठलराव खरात यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०४.०५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. १९.०४.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २५.०५.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २१९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २३/०३/२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विलासराव विठ्ठलराव खरात, रा.शिवाजी हाऊसिंग सोसायटी, बसस्टँडच्या बाजूला, अंबड, ता.अंबड, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२९००
निर्णय दिनांक २३/०३/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. विलासराव विठ्ठलराव खरात,<br>रा.अंबड, जि.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>जि.प.बांधकाम उपविभाग, अंबड, जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,<br>जि.प.बांधकाम उपविभाग, अंबड, जि.जालना | | |

**निर्णय**

श्री. विलासराव विठ्ठलराव खरात यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०४.०५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. १९.०४.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २५.०५.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २१९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विलासराव विठ्ठलराव खरात, रा.शिवाजी हाऊसिंग सोसायटी, बसस्टँडच्या बाजूला, अंबड, ता.अंबड, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८७०

निर्णय दिनांक २३-०३-२०१०

१ श्री. रियाजखान मुरादखान पठाण, : अपिलार्थी
रा. दर्गाबेस आठवडी बाजार, वैजापूर, ता. वैजापूर,
जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम पश्चिम उपविभाग,
वैजापूर, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम
(पश्चिम) विभाग, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक अभियंता श्रेणी -१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वैजापूर, जि. औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे वैजापूर तालुक्यात सन २००८ अखेरपर्यंत झालेल्या साईट नालीच्या कामासंदर्भात व इतर कामासंदर्भात काही माहिती एकूण ४ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये त्यांना ज्या कालावधीशी संबंधित माहिती हवी आहे त्या कालावधीचा उल्लेख केलेला नाही. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थी त्यांच्याकडील सुनावणीस गैरहजर राहिल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीस निश्चितपणे कोणत्या कालावधीची माहिती जन माहिती अधिकारी यांच्यकडून हवी आहे याची विचारणा आयोगाने केली असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून सन २००८ या एका आर्थिक वर्षाची माहिती अपेक्षित आहे, असे त्यांनी आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. तथापि अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित न राहिल्याने त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील

मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधित माहिती दिनांक ०१-०६-२००९ रोजी पोस्टाद्वारे पाठविली असून, मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती त्यांनी आता बरोबर आणली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन त्यांच्या अर्जासोबत त्यांनी आवश्यक तो पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये त्यांना ज्या कालावधीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी आहे याचा त्यांनी स्पष्ट उल्लेख केलेला नाही. "माहितीचा संबंधित कालावधी" या मुद्दा क्रमांक २ च्या पुढे अपिलार्थी यांनी त्यांचा कोणताही अभिप्राय दिलेला नाही. तसेच त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मध्ये, 'वैजापूर तालुक्यात साईट नालीचे सन २००८ अखेरमध्ये किती काम झाले,' अशा माहितीचे विधान केले आहे. यावरुन अपिलार्थीस कोणती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित होती, याचा स्पष्ट बोध होत नाही. तरीही आज रोजी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या बरोबर सन २००७ -२००८ या आर्थिक वर्षाची अपिलार्थीने मागणी केलेली माहिती बरोबर आणली असून, ते ही माहिती अपिलार्थीस ३ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः देण्यासाठी तयार आहेत. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालील-प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रियाजखान मुरादखान पठाण, दर्गाबेस आठवडी बाजार, वैजापूर, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी -१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वैजापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८७१

निर्णय दिनांक २३-०३-२०१०

१ श्री. बसवराज लिंगप्पा जमादार, : अपिलार्थी
मु. पो. निलेगांव, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तालुका पंचायत समिती कार्यालय,
तुळजापूर, जि. उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : गट विकास अधिकारी, पंचायत समिती तुळजापूर, जि. उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना पूर्ण माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपुर्वक टाळले आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ आर्जतील एकूण ९ मुद्यांपैकी ४ मुद्यांची माहिती अद्यापपावेतो दिलेली नाही. जी माहिती देण्यात आली ती प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी दिली असून, ती माहिती त्यांना ११० दिवसाच्या विलंबाने प्राप्त झाली आहे. त्यांनी या अर्जामध्ये आयोगास त्यांना उर्वरित मुद्यांव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती मिळावी अशी विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-१२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी  यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००५ ते मार्च २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ९ मुद्यांद्वारे मागितली होती.  अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांची संख्या, त्यांच्यावर केलेली प्रशासकीय स्वरुपाची कार्यवाही, त्यांचे पूर्ण नाव, पद, दिलेले काम व त्यांना मिळणारा पगार, पंचायत समितीस प्राप्त झालेला निधी, मागसवर्गीयांना देण्यात आलेल्या व त्यांच्यासाठी घेण्यात आलेल्या देता येणाऱ्या योजना कोणत्या आहेत, कार्यालयाची कार्यालयीन वेळ, कर्मचाऱ्यांची मस्टरात किती वेळा नोंद होते, उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांवर केलेली कार्यवाही, कृषि विभागाकडे येणाऱ्या बी बियाणे वाटप प्रक्रियेसंदर्भात शासनाचे आदेश, गट विकास अधिकारी यांच्या दौऱ्याचे रजिस्टर, कर्मचाऱ्यांचे दैनंदिनी हजेरीपत्रक आणि तालुका गौण खनिजाची रक्कम किती आली - या मुद्यांचा समावेश होता.  अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली असून, ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे त्यांनी या अर्जामध्ये नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २७-०२-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व अपेक्षित माहिती अपिलार्थीस प्राप्त होऊ न शकल्यामुळे, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे  सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३, ४, ७ व ८ शी संबंधित माहिती प्राप्त झालेली नाही. उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती त्यांना दिनांक ३०-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिनांक ०१-०४-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, या मुद्यांद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मोठ्या प्रमाणात असल्यामुळे, त्यांनी ही माहिती अपिलार्थीस त्यांच्याकडे उपस्थित राहून पाहण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थी हे त्यांच्या सूचनेप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित न राहिल्याने अपिलार्थीस ही माहिती त्यांना पुरविता आली नाही. आता ते ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरवतील.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३,४,७ व ८ शी संबंधित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. यापैकी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ द्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांची नावे, पद, कारभाराचे स्वरुप व त्यांना मिळणारा पगार अशी माहिती मागविली आहे. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ (१) (ख) (नऊ) व (दहा) मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी स्वतः होऊन प्रसिध्द करावयाची अशा स्वरुपाची माहिती आहे. तथापि एवढे असूनही या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही, ही खरोखरीच खेदाची बाब आहे. ही माहिती त्यांना आता अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे पंचायत समितीस प्राप्त झालेला निधी व मागासवर्गीयांकरिता त्यांच्या कार्यालयातर्फे राबविण्यात येणारी योजना अशी माहिती मागितली आहे. ही माहिती देखिल वर नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी स्वयंप्रेरणेने घोषित

करावयाच्या प्रकारची माहिती आहे. त्यामुळे ही माहिती देखिल अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून शासकीय आदेशाची प्रत मागविली आहे. ही प्रत दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या दिनांक ३०-०३-२००९ रोजीच्या पत्रामध्ये उल्लेखिले आहे. तथापि या पत्रासोबत त्यांनी शासनाच्या निर्णयाची प्रत दिली नसल्यामुळे ही प्रत देखिल अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना आता पुरवावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या दैनंदिनी हजेरी मस्टरची प्रत मागितली आहे. हा मुद्दा माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, या मुद्यावरील माहिती देखिल अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती मागितली असताना, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात समक्ष उपस्थित राहून ही माहिती पाहण्याचे सूचित करण्याची जन माहिती अधिकारी यांची कृती ही अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांनी ज्या माध्यमाद्वारे मागितली आहे त्या माध्यमाद्वारे जन माहिती अधिकारी यांनी ती अर्जदारास पुरविणे अभिप्रेत आहे. सबब या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३,४,७ व ८ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थीस अनुज्ञेय कालावधीपेक्षा ११० दिवस इतक्या विलंबाने अर्धवट माहिती पुरवून संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. अपिलार्थीस विलंबाने प्रतिसाद देऊन अर्धवट माहिती

देण्याच्या त्यांच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३, ४, ७ व ८ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

३. सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बसवराज लिंगप्पा जमादार, मु. पो. निलेगांव, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (ग्रामविकास विभाग), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८७२

निर्णय दिनांक   २३-०३-२०१०

१ श्री. तुकाराम श्रीपती शिंदे, : अपिलार्थी
द्वारा, विजयकुमार दगडोपंत गरड, फडकुले निवास,
रामनगर, उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग,
उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विद्युत
मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०४-२००९ रोजी नोंदविलेले  व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणुनबुजून चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिल्याने व माहिती देण्यासाठी अडथळा केल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण ७ मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते.

अपिलार्थीच्या या अर्जातील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही ठोस आदेश पारित न केल्यामुळे, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस ते ज्या ज्या वेळी त्यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी उपस्थित राहिले त्या त्या वेळी दिलेली आहे. त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक ०५-०२-२००९ रोजी एकूण ४६४ पृष्ठांची व दिनांक १७-०४-२००९ रोजी एकूण १७ पृष्ठांची माहिती विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीस दिनांक १७-०४-२००९ रोजी माहिती देण्याचे कारण म्हणजे त्यांच्या उपविभागाकडून त्यांना अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त न झाल्याने त्यांना ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी विलंब लागला. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले आहे की, अपिलार्थीस स्वतःला ही माहिती आवश्यक नसून, त्यांच्या विभागाचे ठेकेदार श्री. गरड हे अपिलार्थीच्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राचा फायदा घेऊन त्यांच्याकडून कायम विस्तृत प्रमाणात व विनामूल्य माहिती अपेक्षित करीत असतात.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने

आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील आर्जमध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणूनबुजून अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद केले आहे. तथापि या मुद्यासंदर्भातील आवश्यक तो सबळ पुरावा अथवा या संदर्भातील कोणतेही लेखी स्पष्टीकरण त्यांनी आयोगास सादर केलेले नाही. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस ते ज्या ज्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी उपस्थित राहिले त्यावेळी त्यांना जन माहिती अधिकारी यांनी प्रथमत: ४६४ पृष्ठांची व नंतर एकूण १७ पृष्ठांची माहिती अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर दिलेली आहे. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी असेही आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांचा स्वत:चा पत्ता त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद न करता श्री. विजयकुमार दगडोपंत गरड या व्यक्तीच्या निवासस्थानी ते राहत असल्याचे त्यांनी या अर्जामध्ये दर्शविलेले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने स्वत:च्या निवासस्थानाचा पत्ता माहिती अधिकाऱ्यास सादर करणे सर्वसाधारणपणे अपेक्षित आहे. या संपूर्ण घटनाक्रमामधील जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केलेली वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रथमत: अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे. हे पाहता नंतर त्यांनी अपिलार्थीस द्यावयाची उर्वरित माहिती त्यांच्या दिनांक १६-०४-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस पुरविली आहे. यावरुन अपिलार्थीपासून माहिती दडविण्याचा जन माहिती अधिकारी यांचा असद्‌हेतू होता, असे नि:संशयपणे सिध्द होत नाही. त्यांनी अपिलार्थीस प्रथमत: फक्त अपूर्ण माहिती पुरविल्याचे व तीही तदनंतर अपिलार्थीस पुरविल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. अपिलार्थीस या प्रकरणी अपूर्ण माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांचे या प्रकरणाशी संबंधित सहायक श्री. शेख तत्कालीन उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत उपविभाग, उस्मानाबाद हे जबाबदार असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अर्जदाराने मागणी केलेली माहिती पुरविण्यासंर्भात सहाय्य करणारे त्यांचे सहायक यांना देखिल जन माहिती अधिकारी

म्हणून समजावे अशी तरतूद आहे. ही तरतूद पाहता, या प्रकरणाशी संबंधित तत्कालीन उपविभागीय अभियंता श्री. शेख, सार्वजनिक बांधकाम विद्युत उपविभाग, उस्मानाबाद हे जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विद्युत मंडळ, औरंगाबाद यांना त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता पूर्ण माहिती प्राप्त झाली असल्यामुळे, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विद्युत मंडळ, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित उप अभियंता श्री. शेख (सध्या सार्वजनिक बांधकाम विद्युत उपविभाग, उस्मानाबाद येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंग-विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. तुकाराम श्रीपती शिंदे, द्वारा, विजयकुमार दगडोपंत गरड, फडकुले निवास, रामनगर, उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विद्युत मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८७३

निर्णय दिनांक २३-०३-२०१०

१ श्री. संजय बाबुराव यरपुरवाड, : अपिलार्थी
मु. पो. जांब बु., ता. मुखेड, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्रशाला, सावळी तांडा,
ता. मुखेड, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती मुखेड, जि. नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. पुंडे पुंडलिक गोविंद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. पुंडे पुंडलिक गोविंद सहशिक्षक यांच्याविषयी खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" श्री. पुंडे पुंडलिक गोविंद सह शिक्षक हे प्रस्तुत शाळेवर नियुक्त झाल्यापासून प्रत्यक्ष काम केल्याचे दिवस, प्रतिनियुक्तीवर असलेले दिवस व ठिकाण, प्रतिनियुक्ती करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व आदेश आणि संबंधितांचे गमन यांच्या तारखानिहाय सत्यप्रती देणे, तसेच दिनांक २८-०८-२००४ ते ३१ डिसेंबर २००६ पर्यंतच्या अभिप्राय बुकाच्या (झेरॉक्स) सत्यप्रती देणे बाबत."

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १८-०२-२००९ रोजी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, मुखेड यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती पुरवावी लागेल. सबब मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्रशाला, सावळी तांडा यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व स्पीड पोस्टाद्वारे पुरवावी. जर ही माहिती अपिलार्थीस न मिळाल्याची अपिलार्थीची काही तक्रार आली तर मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्रशाला, सावळी तांडा हे अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र राहतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व स्पीड पोस्टाने पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संजय बाबुराव यरपुरवाड, मु. पो. जांब बु., ता. मुखेड, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्रशाला, सावळी तांडा, ता. मुखेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती मुखेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२३९

निर्णय दिनांक २३-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गुलाबराव आबाजी बोरुडे,<br>रा. बोरखेडी, पो. पिरकल्याण, तालुका जिल्हा जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना |
| | जन अपिलीय अधिकारी | : | जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०५-२००९ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांच्या प्रथम अपील अर्जावर, जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश दिले नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, मे २००७ ते ऑक्टोबर २००७ या कालावधीशी संबंधित, स्वस्त धान्य दुकानदार, बोरखेडी, तालुका जिल्हा जालना यांच्या विरुध्द त्यांनी दिनांक १६-०७-२००७, दिनांक ०४-०८-२००७ व दिनांक ०७-०९-२००७ रोजी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात, जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या चौकशी व कार्यवाहीचा अहवाल, कार्यवाही केली नसल्यास कारण, दिनांक ०२-०७-२००७ रोजीच्या आदेशानुसार दुकानदाराची अनामत जप्त केलेली तारीख व अनामत भरुन घेतलेली तारीख, या मुद्दयांवर व्यक्तिशः माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांनी त्यांच्या दिनांक १०-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे, अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले, तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस ही माहिती त्यांनी वेळोवेळी पुरविली असून, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्रयस्थ पक्षाची अनामत रक्कम जप्त केलेल्या चलनाची प्रत फक्त अपिलार्थीस द्यावयाची राहिली होती, तथापि तीही त्यांनी दिनांक २३-०२-२०१० रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस टपालाव्दारे पाठविली आहे आणि अशा प्रकारे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे त्यांनी जरी, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविली असल्याचे

म्हटले असले तरीही त्यांनी, अपिलार्थीस ज्यासंदर्भात ही माहिती पुरविली आहे त्यासंदर्भाचा अपिलार्थीच्या मूळ अर्जात कोठेही उल्लेख अपिलार्थीने केलेला नाही व यासंदर्भात माहिती अधिका-याने आयोगाकडे पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे माहिती अधिकारी यांचा त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचा युक्तिवाद आयोग अमान्य करीत आहे. आता अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून जन माहिती अधिकारी यांनी ती आयोगास दाखविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी ती सकृतदर्शनी, सर्वसाधारणपणे सुसंगत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी करुन ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधी गेले यासंदर्भात कोणताही सबळ पुरावा त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १६-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत मुद्देनिहाय व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत मुद्देनिहाय व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक २३-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गुलाबराव आबाजी बोरुडे, रा. बोरखेडी, पो. पिरकल्याण, तालुका जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२४०

निर्णय दिनांक २३-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुदर्शन विष्णू फुंदे,<br>सुदर्शन बिल्डींग, राघवेंद्र कॉलनी, दत्तमंदिरामागे,<br>जुना औसा रोड, लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग,<br>उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०७-२००८ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना श्री. देवगडे यांच्याकडून कोणतीही माहिती अद्यापपावेतो प्राप्त झाली नाही आणि ती माहिती त्यांना श्री. देवगडे यांच्याकडून प्राप्त होईल किंवा नाही याची शंका आहे. श्री. देवगडे यांनी लावलेल्या विलंबाबाबत त्यांच्याविरुध्द दंडात्मक कार्यवाही होऊन, अपिलार्थीस विनामूल्य माहिती लवकरात लवकर मिळावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अतिरिक्त कार्यभार सांभाळणा-या उप अभियंत्याच्या कार्यभार

हस्तांतरणाबाबत, जून २००४ ते जुलै २००६ या कालावधीशी संबंधित, काही माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

" विशेष प्रकल्प विभाग, उस्मानाबाद तथा तत्कालीन विशेष प्रकल्प विभाग क्रमांक २, बीड अंतर्गत अतिरिक्त कार्यभार सांभाळणा-या अभियंत्यांच्या कार्यभार हस्तांतर प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती. "

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन काही माहिती पुरविली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १२-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०९-२००७ रोजी आपले आदेश पारीत करुन सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर राहिल्याने त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही, माहितीपेक्षा जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द दंडात्मक कार्यवाही व्हावी अशीच अपिलार्थीची धारणा असल्याचा निष्कर्ष त्यांनी या निर्णयामध्ये काढला आहे व अपिलार्थीस यापुढे सुनावणीच्या वेळी त्यांचे म्हणणे स्वतः उपस्थित राहून मांडावे अशी सूचना दिली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व तत्कालीन जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली आहे. ही माहिती

अपिलार्थीस दिनांक २४-०७-२००७ रोजी प्राप्त झाली, या त्यांच्या विधानापुष्ट्यर्थ त्यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याची नोंद आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २०-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती प्राप्त झालेली आहे. अपिलार्थीस पुरविलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविली. ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सकृतदर्शनी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे फेरसादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये फक्त, त्यांना अपूर्ण माहिती मिळाली असे त्यांचे अभिप्राय दिले आहेत, मात्र अद्यापपावेतो त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती देणे बाकी आहे, याचा कोणताही उल्लेख या अपील अर्जामध्ये केलेला नाही, अथवा यासंदर्भात त्यांचा युक्तिवाद स्पष्ट करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, आवश्यक त्या पुराव्याअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुदर्शन विष्णू फुंदे, सुदर्शन बिल्डींग, राघवेंद्र कॉलनी, दत्तमंदिरामागे, जुना औसा रोड, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२४१

निर्णय दिनांक २३-०३-२०१०

१ श्री. ननवरे पी. एस., : अपिलार्थी
व्दारा, गायकवाड एस. एम.,
' योगेश निवास ', बी. फॉमसी कॉलेजजवळ, बार्शी रोड,
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जनरल सेक्रेटरी, उपळे रयत शिक्षण प्रसारक संस्था,
उपळे (मा.), तालुका जिल्हा उस्मानाबाद
२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, सहायक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद यांनी दहा दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित करुनही त्यांना संबंधित संस्थेने माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जनरल

सेक्रेटरी, उपळे रयत शिक्षण प्रसारक संस्था, उपळे (मा.), तालुका जिल्हा उस्मानाबाद यांच्याकडे, त्यांच्या संस्थेच्या संदर्भात, शैक्षणिक वर्ष २००६-२००८ या कालावधीशी संबंधित, संस्था संचलीत सहा शाखेवर वेतनेतर अनुदानातून खरेदी केलेल्या शैक्षणिक साहित्याच्या पावत्या (कोटेशनसह) आणि या सहा शाखेतील आजपर्यंत बदल्या न झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची यादी कालावधीसह, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक ०५-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सहायक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद यांनी दिनांक १८-०९-२००८ रोजीच्या निर्णयाव्दारे, संबंधित संस्थेस अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत माहिती देण्याचे आदेशित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, उपळे रयत शिक्षण प्रसारक संस्था, उपळे (मा.) या संस्थेकडे काही माहिती मागितली होती. सदर संस्था ही, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या अंतर्गत, सहायक धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी झालेली संस्था आहे. अशा संस्थांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदी लागू होणार नाहीत असा निर्णय मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागरपूर खंडपीठाने त्यांच्याकडील रिट याचिका क्रमांक ५२९४/२००८, मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्‌गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा, जिल्हा बुलढाणा विरुध्द राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर या प्रकरणी दिनांक २८-०४-२००९ रोजी दिला असून यामध्ये त्यांचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

".......... It is , therefore, clear from the provisions of this definition that the Act cannot apply to the Public Trust. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority. .......... If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the Public Trust Act to have such information, which the Charity Commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act."

तसेच या प्रकरणी अपिलार्थीने संबंधित संस्थेने त्यांना माहिती न दिल्याबद्दल, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले आहे. या प्रकरणी सहायक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक झालेली नाही, कारण अपिलार्थीने माहितीची मागणी केलेली संस्था आणि सहायक धर्मादाय आयुक्त यांची संस्था ही दोनही वेगवेगळी आणि स्वतंत्र प्राधिकरणे आहेत आणि त्यांचा एकमेकांशी काहीही संबंध नाही. अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार माहिती अधिका-याकडून माहिती प्राप्त न झाल्यास त्याच प्राधिकरणातील वरिष्ठ अधिका-याकडे अर्जदारास प्रथम अपील करता येईल अशी तरतूद आहे. त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून सहायक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद यांना निर्णय देता येणार नाही. सहायक धर्मादाय आयुक्तांना त्यांच्या कार्यालयाकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत त्यांच्या कार्यालयातील, अर्जावरील प्राप्त झालेल्या प्रथम अपील अर्जासंदर्भात अपिलीय अधिकारी म्हणून निर्णय देता येईल.

वरील दोन्ही परिच्छेदाचे अवलोकन केले असता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः ज्या संस्थेस माहिती अधिकार अधिनियम लागू नाही त्या संस्थेकडे माहितीसाठी, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्रथम अर्ज केला आहे व यासंदर्भात

प्रथम अपील त्यांनी सहायक धर्मादाय आयुक्तांकडे, ज्यांचा या संस्थेशी काहीही संबंध नाही, अशा प्राधिकरणाकडे करुन अधिनियमातील कलम १९ (१) चा भंग केला आहे. या दोन्ही विसंगत बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. ननवरे पी. एस. व्दारा, गायकवाड एस. एम. ' योगेश निवास ', बी. फॉमसी कॉलेजजवळ, बार्शी रोड, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा जनरल सेक्रेटरी, उपळे रयत शिक्षण प्रसारक संस्था, उपळे (मा.), तालुका जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२४२

निर्णय दिनांक २३-०३-२०१०

१ श्री. विजयसिंह धनंजय माने, : अपिलार्थी
श्री संत ज्ञानेश्वरनगर, उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : अधीक्षक, सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, उस्मानाबाद

त्रयस्थ पक्ष : सचिव, अपंग शिक्षण संस्था, पानगांव, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०४-२००८ रोजी नोंदविलेले व दिनांक ०६-१२-२००८ रोजी फेर सादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक २३-०३-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी या प्रकरणी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना संबंधित संस्थेने व सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालयाने दिली असल्याने त्यांचा माहिती मागण्याचा हेतू साध्य झाला आहे आणि माहिती मागण्याविषयी त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही.

अपिलार्थीने या प्रकरणी सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या जन माहिती अधिका-याकडे त्यांच्या दिनांक ०४-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ पक्ष अपंग शिक्षण संस्था, पानगांव यांच्या संदर्भात सन १९८४ ते २००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये या कालावधीतील संस्थेचे प्रोसेडींग बुक, नोटीस बुक, किर्द खतावणी, ऑडिट रिपोर्ट याच्या साक्षांकीत प्रती आणि संस्थेचे सभासद, कर्मचारी आणि संस्थेच्या बँक पासबुकच्या प्रमाणित प्रती, या मुद्दयांचा समावेश होता व ही माहिती त्यांनी व्यक्तिशः मागितली होती. यापैकी, सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयाकडे या संस्थेविषयी उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली व त्यांच्याकडे उपलब्ध नसलेली माहिती संबंधित संस्थेकडून घेऊन नंतर अपिलार्थीस पुरविली. प्राप्त माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले असल्याचा निर्वाळा त्यांनी आयोगास उद्देशून लिहिलेल्या पत्रामध्ये केला आहे, त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीच्या व्दितीय अपील अर्जावर आयोगाने वेगळयाने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन उरले असल्याचे आढळून येत नाही. सबब, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विजयसिंह धनंजय माने, श्री संत ज्ञानेश्वरनगर, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८९१
निर्णय दिनांक : २५.०३.२०१०

१. श्री. रामराजा नानासाहेब पंडित, : अपिलार्थी
रा.भूम, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नोंदणी उपमहानिरीक्षक तथा मुद्रांक उपनियंत्रक,
लातूर विभाग, लातूर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
लातूर विभाग, लातूर.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सह जिल्हा निबंधक वर्ग-२, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती न पुरविता जन माहिती अधिकारी यांनी खोटी, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरविल्याने आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जाचा निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या नियंत्रणातील, "दुय्यम निबंधक भूम, श्री. कावळे" यांच्या तक्रारीच्या माहितीबाबत अशा विषयावर सन २००८ ते दि. १५.०१.२००९ रोजीच्या कालावधीतील माहिती एकूण चार मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - माहिती अधिकार अधिनियमातील २००५ च्या

कोणत्या कलमान्वये व तरतुदीप्रमाणे अपिलीय प्राधिकारी या नात्याने अर्जदाराकडून जन माहिती अधिकारी यांनी पूर्वीच माहितीचे शुल्क वसूल केलेले असताना दुसऱ्यांदा माहितीचे शुल्काची रक्कम वसूल करण्यासाठी अद्ययावत असलेल्या नियमाची/नियमावलीची प्रत, या अधिनियमातील कोणत्या कलमान्वये व तरतुदीप्रमाणे अपिलीय प्राधिकारी या नात्याने अर्जदारास माहिती पुरवली, अर्जदाराच्या दि. २६.११.२००८ रोजीच्या अपिलावर झालेल्या निर्णयाची प्रत व नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,म.रा.पुणे यांच्या दि. २२.१०.२००८ रोजीच्या पत्रान्वये कोणकोणत्या कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाईचा प्रस्ताव सादर केला - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाच्या दि. २१.०१.२००८ रोजीच्या (आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सदर दिनांकात टंकलेखनाची चुक झाल्याचे अवगत करुन सदर तारीख,'२१.०१.२००९'गृहित धरावी, अशी आयोगास विनंती केली.) पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०३.०२.२००९ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १६.०३.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत खरी व योग्य माहिती पुरविल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकरी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणासंदर्भात कोणताही युक्तिवाद करता आला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २१.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे व ती योग्य आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अशी माहिती मागितली आहे की, अधिनियमातील कोणत्या कलमान्वये व तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी या नात्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहितीचे शुल्क वसूल केले गेले असताना दुसऱ्यांना शुल्क वसूल करण्याचे त्यांना प्राधिकृत केले आहे. अपिलार्थीने या मुद्याद्वारे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय मागितल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन अपिलीय अधिकारी यांना अर्जदाराने त्यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर या अपील अर्जावर निर्णय देण्याचे अधिनियमातील कलम १९(१) प्रमाणे प्राधिकृत केले आहे. जन अपिलीय अधिकारी हे सदरचा निर्णय अर्धन्यायिक अपिलीय प्राधिकरण या नात्याने देत असतात. त्यामुळे त्यांच्याकडे अर्जदाराचे प्रथम अपील प्राप्त झाल्यानंतर जर या अपिलाचा विचार करताना अर्जदाराने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कमी प्रमाणात भरले असेल तर उर्वरित शुल्क अर्जदाराकडून प्राप्त करुन घेण्याचे ते जन माहिती अधिकारी यांना अपिलीय अधिकारी या नात्याने आदेश देऊ शकतात. तथापि यासाठी माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने अर्ज केल्यापासून त्यांना माहिती मिळेपर्यंत प्रत्येक टप्प्यावर कमाल कालावधी विहित केलेला आहे. या कालावधीचे उल्लंघन जर जन माहिती अधिकारी यांच्याकडून अथवा अर्जदाराकडून झाले असल्याचे निदर्शनास आले तर जन अपिलीय अधिकारी हे अशाप्रकरणी प्रकरणनिहाय असे आदेश देऊ शकतात, असे येथे स्पष्ट करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे, अपिलीय अधिकारी या नात्याने ते अधिनियमातील कोणत्या कलमान्वये अथवा तरतुदीअन्वये अर्जदारास माहिती पुरवू शकतात, याची माहिती मागविली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अर्जदारास स्वतः माहिती द्यावी अशी कोणतीही तरतुद नाही. तथापि माहिती अधिकार अधिनियमाचा मूळ हेतू लक्षात घेऊन जर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या पातळीवर अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविली तर ही बाब हरकत घेण्यायोग्य आहे किंवा त्यामध्ये काही गैर आहे, असे आयोगास वाटत नाही.अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे अपिलार्थीने

जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. २६.११.२००८ रोजीच्या अपिलावर झालेल्या निर्णयाची प्रत मागितली आहे. तथापि यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती सकृतदर्शनी आयोगास चुकीची वाटते. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सादर केलेल्या कथित निर्णयामध्ये अपिलार्थीस दि. २६.११.२००८ रोजीच्या अपिलाच्या संदर्भाचा कोणत्याही प्रकारे उल्लेख नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना या माहितीसंदर्भात आता अपिलार्थीस माहिती पुरवावी लागेल.अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नोंदणी महानिरीक्षक, व मुद्रांक नियंत्रक,म.रा.पुणे यांच्या दि. २२.१०.२००८ रोजीच्या संदर्भित केलेल्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी नोंदणी महानिरीक्षकास त्यांच्या दि. १४.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांचे जे अभिप्राय पाठविले आहेत, त्या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्याद्वारे दिलेली माहिती बरोबर असल्याचे आयोगास आढळून येत आहे.

अपिलार्थीस देय असलेली व अपिलार्थीस प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती याचे वरील परिच्छेदात केलेले पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील वर स्पष्ट केलेली व त्यांना देय असलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २५-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रामराजा नानासाहेब पंडित, द्वारा पंडित जॉबवर्क सेंटर, कोर्टाशेजारी, भूम,ता.भूम, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८९२
निर्णय दिनांक: २५-०३-२०१०

१. श्री. बलभीम लक्ष्मणराव जाहेर पाटील, : अपिलार्थी
रा. बीड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
सचिव शालेय शिक्षण समिती तथा
मुख्याध्यापक, छत्रपती शाहु माध्यमिक
विद्यालय,शाहुनगर, ता.जि.बीड
२. जन अपिलीय अधिकारी तथा,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बीड.
प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्याध्यापक, छत्रपती शाहु माध्यमिक विद्यालय,शाहुनगर, ता.जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेसंदर्भात, "दि. ०१.०४.२००३ ते ३१.१२.२००८ या कालावधीमध्ये झालेल्या शालेय समितीच्या बैठकीच्या सूचनापत्राच्या नकला, बैठकीच्या इतिवृत्ताच्या नकला आणि शाळेच्या तीन वर्षाच्या ऑडीटेड बॅलेन्स शिटच्या नकला", अशी माहिती

शीघ्र टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०९.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती ही त्यांच्याच ताब्यात असून अपिलार्थीने संबंधित शिक्षण संस्थेकडे माहिती अधिकाराखाली खोटा अर्ज पाठविला. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १८.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता,या टप्प्यावर अपिलार्थीच्या दि. १८.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.बीड यांनी प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थीच्या दि. १८.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,बीड यांनी अपिलार्थीच्या दि.१८.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बलभीम लक्ष्मणराव जाहेर पाटील,रा.लक्ष्मण व्हिला, पांगरी रोड, शाहुनगर, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, छत्रपती शाहु माध्यमिक विद्यालय, शाहुनगर, ता.जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८९३
निर्णय दिनांक : २५.०३.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. नारायण कोंडीबा क्षिरसागर,<br>रा.कळंब, जि.उस्मानाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी,<br>उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, लातूर | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, लातूर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सुप्रिम कोर्टाच्या आदेशानुसार व मार्ग, क्षेत्र व हद्दी या तिन्हींचे उल्लंघन झाले असल्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वसूल केलेल्या दंडाच्या संदर्भात एकूण ४ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे दि. ०६.०१.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, लातूर यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. परंतु यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाच्या संदर्भात दि. १९.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे काही माहिती पुरविली. ही माहिती म्हणजे जन

माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने किती वाहनांना दंड केला व या दंडाच्या संदर्भात किती प्रकरणे न्यायालयात गेली आहेत, किती प्रकरणात ड्रायव्हरचा परवाना निलंबित करण्यात आला, अशाप्रकारची अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी विसंगत माहिती असल्याचे आढळून येत आहे. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, विशेषतः या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १९.०१.२००९ रोजीच्या पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवले आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० (२) मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (परिवहन),मुंबई यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे कार्यालय,लातूर यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (परिवहन),मुंबई यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे कार्यालय,लातूर यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नारायण कोंडीबा क्षिरसागर,मराठवाडा टॅक्सी ओनर्स असोसिएशन, औरंगाबाद विभाग कार्यालय, ढोकी रोड,कळंब, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (परिवहन व रा.ऊ.शु.), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यालयासाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८९४
निर्णय दिनांक : २५.०३.२०१०

१. श्री. शंकर इंगळे, नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, नांदेड. : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, अर्धापूर,जि.नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती दुष्ट हेतूने नाकारुन माहिती अधिकार कायद्याचा भंग केला असल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) नुसार दंडात्मक कारवाई करण्याची शिफारस करावी आणि त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त व्हावी तसेच या प्रकरणी त्यांना आर्थिक भूर्दंड पडल्यामुळे, त्यांना झालेल्या खर्चाची रक्कम रु.५००/- इतकी संबंधितांकडून प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. प्र.गो.देशमुख यांनी त्यांच्या मौ.लहान, ता.अर्धापूर येथील ग.नं. २१२ या शेताची मोजणी सन २०००-२००३ या कालावधीत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत करुन घेतली. त्या मोजणीच्या नकाशाची प्रत आणि मोजणीच्या अर्जाची प्रत, या मोजणीच्यावेळी केलेल्या

पंचनाम्याची आणि आजूबाजूच्या शेतकऱ्यांना पाठविलेल्या पत्राची प्रत, गावनकाशावरुन मौ.लहान येथे ग.नं.२१२ व ग.नं.१९४च्या लगतच्या पांदणीच्या चतु:सिमेच्या नकाशाची प्रत, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रमाणित प्रतीच्या स्वरुपात व व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १४.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविली व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात अपिलार्थीस आवश्यक असलेल्या नकाशाच्या प्रतीबाबत अपिलार्थीस रु.४०/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतदुीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेता, त्यांच्याकडील दि. ०८.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्वरित माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. १४.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे मागणी केलेली माहिती त्यांनी तयार करुन ठेवून ग.नं.२१२ व १९४ च्या लगतच्या पांदणाच्या चतु:सिमेच्या नकाशाची प्रत तयार करुन ठेवली व या नकाशाच्या प्रतीकरिता अपिलार्थीस रु. ४०/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयामध्ये भरण्याचे सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने त्यांच्याकडे न करता

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. मध्यंतरीच्या काळात दि. २३.१२.२००८ रोजी त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नसलेल्या माहितीसाठीचा अर्ज घेऊन अपिलार्थी त्यांच्याकडे आले व तो अर्ज स्वीकारण्याची जन माहिती अधिकारी यांना वेळोवेळी विनंती केली. तथापि संबंधित अर्ज त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नसल्यामुळे व तो अर्ज अर्धापूर तालुक्यातील तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्याशी संबंधित असल्यामुळे त्यांनी तो स्वीकारला नाही. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, नांदेड जिल्हयामध्ये दि. ०१.११.२००८ रोजी अर्धापूर तालुक्याची निर्मिती झाली, त्यावेळी अर्धापूर तालुक्याच्या तालुका निरीक्षक भूमी अभिलेख या पदाचा अतिरिक्त कार्यभार भोकर येथील तालुका निरीक्षक भूमी अभिलेख या पदावरील अधिकाऱ्याकडे देण्यात आला होता.त्यामुळे अपिलार्थीच्या संदर्भित माहितीसाठीच्या अर्जाशी त्यांचा अर्थाअर्थी संबंध येत नसल्यामुळे त्यांनी तो स्वीकारला नाही व अपिलार्थीने कागदोपत्री जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा माहितीसाठीचा अर्ज स्वीकारला नसल्याचे दाखविले. यानंतर अपिलार्थी दि. २०.०१.२००९ रोजी त्यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून त्यांना आवश्यक असलेली माहिती घेऊन गेले. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ अपिलार्थीची पोचसही असलेल्या पत्राची प्रत त्यांनी आयोगास सादर केली, यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २०.०१.२००९ रोजी आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असेही स्पष्ट केले आहे की, अपिलार्थीस त्यांनी दि. १४.१०.२००८ रोजी जी माहिती देऊ केली होती, ती त्यांनी अपिलार्थीस दि. २०.०१.२००९ रोजी दिली असून, ही माहिती अपिलार्थीने दि. २०.०१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्वीकारलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०८.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.१०.२००८ रोजी म्हणजे अधिनियमातील मुदतीमध्ये आवश्यक तो प्रतिसाद दिला असून या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे कोणत्याही टप्प्यावर नाकारलेले नाही.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २०.०१.२००९ रोजी प्राप्त झालेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.१०.२००८ रोजीच तयार करुन ती प्रथमतः अपिलार्थीस देऊ केली होती. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे शुल्काचा भरणा करण्याचे टाळून त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. हे पाहता, अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतः जबाबदार असल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यामुळे अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याचे आदेशित करण्याची त्यांची विनंती, आयोग अमान्य करीत आहे. तसेच या प्रकरणी अपिलार्थीस झालेल्या रु. ५००/- या खर्चासंदर्भात कोणताही तपशील अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये दिलेला नसल्यामुळे त्यांना या प्रकरणी नुकसान भरपाई म्हणून रु. ५००/- मंजूर करावे, ही अपिलार्थीची विनंती देखील आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शंकर इंगळे,आनंदनगर चौक, नांदेड-४३१६०५.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, अर्धापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२९०१
निर्णय दिनांक २५/०३/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विलासराव विठ्ठलराव खरात,<br>रा.अंबड, जि.जालना | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| १ | जन माहिती अधिकारी,<br>कृषी कार्यालय, अंबड, जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कृषी अधिकारी,<br>कृषी कार्यालय, अंबड, जि. जालना | | |

**<u>निर्णय</u>**

श्री. विलासराव विठ्ठलराव खरात यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०४.०५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. १९.०४.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २५.०५.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २१९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विलासराव विठ्ठलराव खरात, रा.शिवाजी हाऊसिंग सोसायटी, बसस्टँडच्या बाजूला, अंबड, ता.अंबड, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२९०२
निर्णय दिनांक २५/०३/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विलासराव विठ्ठलराव खरात,<br>रा.अंबड, जि.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>लघुपाटबंधारे स्थानिक स्तर उपविभाग, घनसावंगी,<br>जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>लघुपाटबंधारे स्थानिक स्तर उपविभाग, घनसावंगी,<br>जि.जालना | | |

**<u>निर्णय</u>**

श्री. विलासराव विठ्ठलराव खरात यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०४.०५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. १९.०४.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २६.०५.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २१८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विलासराव विठ्ठलराव खरात, रा.शिवाजी हाऊसिंग सोसायटी, बसस्टँडच्या बाजूला, अंबड, ता.अंबड, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८८७
निर्णय दिनांकः २५-०३-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. विठ्ठल तुळशीराम माने,<br>रा.नागराळ, ता.उमरगा,जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग,<br>उमरगा, जि. उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा<br>परिषद, उस्मानाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०१-०४-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारल्यामुळे आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपील फेटाळल्यामुळे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केल्याचे नमूद केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ११-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम), उपविभाग उमरगा यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील उपअभियंता व इतर सर्व कर्मचाऱ्यांच्या वडिलोपार्जित व अपिलार्थीने अर्ज करण्याच्या दिनांकाच्या वेळी अस्तित्वात असलेल्या मालमत्ता, जमिनजुमला, इमारत, दागदागिने,

रोख रक्कम, बँकेतील गुंतवणूक व इतर स्थावर व जंगम मालमत्तेविषयी माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २२-०९-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अधिनियमातील कलम ८ (ञ) नुसार माहिती देण्याचे नाकारले. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २३-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०-१२-२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी घेतलेल्या भूमिकेशी सहमती दर्शवून अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८(ञ) नुसार माहिती देण्याचे नाकारले, असे आयोगास अवगत केले.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या स्थावर व जंगम मालमत्तेची माहिती मागविली आहे. तथापि ही माहिती उघड झाल्यास नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होणार आहे, हे त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेले नाही व तसेच या मुद्यावर तोंडी खुलासा करण्यासाठी देखील ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही निश्चितपणे कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधितांशी काहीही संबंध नसलेली, अशाप्रकारची आहे. मात्र ही माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ (१) (ञ)

च्या तरतुदीचा भंग होऊन संबंधितांच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता निर्माण होऊ शकेल, अशा वैयक्तिक तपशीलासंबंधाची माहिती असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती अपिलार्थीस उघड केल्याने वर नमूद केल्याप्रमाणे कोणतेही व्यापक जनहित साध्य होईल, असे आयोगास वाटत नाही व यासंदर्भातील कोणताही युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. अशाप्रकारच्या विषयावर या खंडपीठाने वेळोवेळी सार्वजनिक प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मालमत्तेचा तपशील उघड केल्याने व्यापक जनहित साध्य होणार नाही, अशाप्रकारची भूमिका घेतली आहे, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विठ्ठल तुळशीराम माने, रा.नागराळ, पो.गुंजोटी, ता.उमरगा,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, उमरगा, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८८८

निर्णय दिनांक २५-०३-२०१०

१ श्री. केशव रतन चव्हाण, : अपिलार्थी

मु. जहागीरदारवाडी, पो. शिंगोली, ता. जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,

जहागीरदारवाडी, जि. उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना ग्रामपंचायतीसंदर्भात आवश्यक असलेली माहिती मागविली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्यामुळे आणि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करुनही त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायत जहागीरदारवाडी यांच्या संदर्भात सन २००१ ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ८ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीतील ग्रामपंचायत ठराव, प्रोसिडींगची नक्कल, लोकवाटा भरुन झालेल्या विकासाच्या कामाची नक्कल, या कालावधीमध्ये दारिद्र्यरेषेखालील लाभधारकांना लाभ मिळालेले व न मिळालेले यांची यादी, या कालवधीमध्ये हरीजन वस्ती व तांडा सुधार योजनेमधील कामे झालेली एक नक्कल, या कालावधीमध्ये पाणी पुरवठा करण्यासाठी झालेल्या कामाची नक्कल, ग्रामपंचायतीच्या व शाळेच्या मालमत्तेची माहिती व कामाची नक्कल, या कालावधीमध्ये हरीयली योजनेखाली शेतकऱ्यांच्या लाभधारकांचे काम झाल्याची नक्कल व या कालावधीतील लोकसंख्या वाढलेली यादी व मयत झालेल्या नोंदीची प्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने हा अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उस्मानाबाद यांना उद्देशून केला होता. त्यांनी अपिलार्थीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३)(एक) च्या तरतुदीनुसार दिनांक ०८-०९-२००८ रोजी संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाकडे पाठविला. परंतु यानंतर अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २०-१२-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उस्मानाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेले प्रथम अपील कालबाह्य झाल्याने ते फेटाळले, परंतु ग्रामसेवकास अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि या कालावधीमध्ये अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आयोगासमोर उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. ही माहिती संबंधितांच्याकडून त्यांना त्वरीत मिळावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस या अर्जातील माहिती दिनांक २६-०२-२०१० रोजी पाठविली होती. तथापि या माहितीचा अपिलार्थीने स्वीकार न केल्यामुळे अपिलार्थी हे त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ४, ५ व ७ शी संबंधित माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण अपिलार्थीस या मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून नेमकी कोणती माहिती आवश्यक आहे याचा बोध होत नाही. या मुद्यांद्वारे अपिलार्थीने विकास कामाची नक्कल, हरीजन वस्ती व तांडा सुधार योजनेमधील झालेल्या कामाची नक्कल, पाणी पुरवठा करण्यासाठी झालेल्या कामाची नक्कल, मुद्दा क्रमांक ६ मधील शाळेच्या झालेल्या बांधकामाची नक्कल व हरीयली योजनेखाली शेतकऱ्यांच्या लाभधारकांचे काम झाल्याची नक्कल अशा कामाच्या नकला मागितल्या आहेत. 'कामाची नक्कल' म्हणजे नेमके काय असे अपिलार्थीस आज रोजी सुनावणीमध्ये विचारले असता, त्यांना हे आयोगास स्पष्ट करता आले नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ४, ५ व मुद्दा क्रमांक ६ अंशतः - कामाची नक्कल व मुद्दा क्रमांक ७ शी संबंधित कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २६-०२-२०१० रोजी माहिती पाठविली असता, पोस्ट खात्याकडून त्यांना अपिलार्थीस त्यांनी पाठविलेली माहिती पोस्टमनच्या "घेण्यास इन्कार सबब परत" अशा अभिप्रायासह परत आली आहे. यावरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस

जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देखिल ती प्रथमतः अपिलार्थीने स्वीकारण्यास नकार दिला आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविलेली माहिती नाकारण्याचे कारण अपिलार्थीस विचारले असता, त्यांनी "पोस्टमन त्यांच्या मनात येईल तसा अभिप्राय देत असतो, त्यांच्या गावात ज्यावेळी पोस्टमन आला त्यावेळी ते गावात नव्हते," असा आयोगास खुलासा केला. तथापि आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी सूचित केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, ३ व मुद्दा क्रमांक ६ अंशतः - शाळेच्या मालमत्तेची माहिती व मुद्दा क्रमांक ८ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. मलीक अर्जून लोहार यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, ३, ६ अंशतः व ८ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित ग्रामसेवक श्री. मलीक अर्जून लोहार (सध्या निलंबीत) यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. केशव रतन चव्हाण, मु. जहागीरदारवाडी, पो. शिंगोली, ता. जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, जहागीरदारवाडी, ता. जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८८९

निर्णय दिनांक २५-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. तुकाराम श्रीपती शिंदे,<br>द्वारा, विजयकुमार दगडोपंत गरड, फडकुले निवास,<br>रामनगर, उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग,<br>उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विद्युत<br>मंडळ, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्यामुळे व दुष्ट हेतूने माहिती देण्यास विलंब केल्याने व दिशाभूल करणारा पत्रव्यवहार केल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण ७ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अंदाजे ८ ते १० किलो वजनाची असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील कनिष्ठ लिपीक श्री. एस. एम. होके व शिपाई भोसले यांच्या हस्ते ही माहिती अपिलार्थीच्या निवासस्थानी त्यांना हस्तांतरण करण्यासाठी गेले असता, त्यावेळी अपिलार्थी हे त्यांनी अर्जामध्ये दिलेल्या पत्त्यावर अनुपस्थित होते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी श्री. गरड यांना (अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये दिलेल्या पत्त्यामध्ये C/o श्री. गरड असा उल्लेख केला आहे) माहिती देऊ केली असता, त्यांनी ही माहिती घेण्यास नाकारले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १३-०१-२००९ रोजी तार करुन अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून माहिती घेऊन जाण्याच्या सूचना दिल्या. तथापि दिनांक १५-०१-२००९ रोजी श्री. शिंदे यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून माहिती रजिस्टर्ड पोस्टानेच पाठवावी, असा आग्रह धरला. अपिलार्थी श्री. शिंदे यांच्या या विनंतीस अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पोस्टाचा खर्च रु. २८४/- इतका त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दिनांक २१-०२-२००९ रोजी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत सुनावणी न घेतल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक २१-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही, मात्र

दिनांक १२-०५-२००९ रोजी दुरध्वनीद्वारे त्यांना अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे त्यांनी दिनांक ३०-०५-२००९ रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे अपिलार्थीस एकूण १,६९५ पृष्ठांची माहिती विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी आवश्यक तो पुरावा आयोगाकडे सादर केला आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर नोंदणीकृत टपालाद्वारे आवश्यक ती माहिती प्राप्त झालेली आहे. प्राप्त माहितीवर अपिलार्थीने आजतागायत कोणताही अभिप्राय यानंतर आयोगाकडे लेखी स्वरुपात पाठविलेला नाही अथवा या संदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे अनुमान काढण्यात येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न देणे, दुष्ट हेतूने माहिती देण्यास विलंब करणे आणि माहिती देण्यास अडथळे आणणे इत्यादी प्रकारचे आक्षेप नोंदविले आहेत. तथापि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविण्याचा प्रयत्न केला आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या स्वतःच्या निवास-स्थानाचा पत्ता न देता श्री. विजयकुमार गरड या विद्युत ठेकेदाराच्या निवासस्थानाचा पत्ता दिला आहे. त्यामुळे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विहित मुदतीत प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती देऊ केली असता, ही माहिती व्यक्तिशः प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीने नाकारले आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना फक्त नोंदणीकृत टपालाद्वारेच माहिती हवी आहे असा या प्रकरणी आग्रह धरण्याचे सकृतदर्शनी कोणतेही समर्थनीय कारण आयोगास आढळून आलेले नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व

आकारमान पाहता जन माहिती अधिकारी यांनी केवळ टपाल खर्च वाचविण्याच्या दृष्टीने अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती देऊ केली होती. यामध्ये जन माहिती अधिकारी यांची कृती चुकीची होती असे म्हणता येणार नाही. मात्र यावरुन एक बाब अशी स्पष्ट होत आहे की, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये स्वारस्य नव्हते. केवळ जन माहिती अधिकारी यांना त्रास देण्याच्या उद्देशाने अपिलार्थीने दुसरा पत्ता देऊन व्यापक व्याप्ती असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागवून कोणत्याही पुराव्याशिवाय आयोगाकडे विचाराधीन अपील केले आहे. या बाबी पाहता आणि आता अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त झाली असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. तुकाराम श्रीपती शिंदे, द्वारा, विजयकुमार दगडोपंत गरड, फडकुले निवास, रामनगर, उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विद्युत मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८९०

निर्णय दिनांक २५-०३-२०१०

१ श्री. विजयकुमार गुरुनाथ पवार, : अपिलार्थी

रा. सोमनाथपूर, ता. उदगीर, जि. लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर विभाग, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जो जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात दिनांक ०२-०२-२००९ रोजी प्राप्त झाला त्याद्वारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाने त्यांच्या संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या दोन आश्रम शाळांच्या केलेल्या हस्तांतरणासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जय भवानी शिक्षण संस्थेने प्राथमिक शाळेचे राम

लक्ष्मण शिक्षण प्रसारक मंडळाकडे व माध्यमिक शाळेचे गुणाई शिक्षण प्रसारक मंडळाकडे केलेल्या हस्तांतरणाच्या संदर्भात संस्थेच्या ठरावाची प्रत आणि सहमती पत्राची प्रत आणि या संदर्भात शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या दिनांक २१-०६-२००४ च्या टिपणीनुसार मागितलेल्या अभिप्रायाची प्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असेलेली माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले आणि विधी व न्याय विभागाच्या टिपणीच्या संदर्भात अपिलार्थीस ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे अवगत केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस दिनांक ०६-०४-२००९ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि दिनांक ०६-०४-२००९ पर्यंत जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहितीपैकी विधी व न्याय विभागाच्या टिपणीखेरीज उर्वरित दोन मुद्यांवरील माहिती त्यांना दिनांक १५-०४-२००९ रोजी पोस्टाने विनामूल्य पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ

त्यांनी अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठविल्याचा पुरावा आयोगास सादर केला आहे. (आवक जावक नोंद वहीची प्रत)

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ३ मुद्यांवर माहिती मागविली आहे. त्यापैकी मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पोस्टाद्वारे विनामूल्य पुरविली आहे. तथापि ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली नाही असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी या मुद्यांवर पाठविलेल्या माहितीचे आयोगाने अवलोकन केले असता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सकृतदर्शनी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती, ती माहिती शासनाच्या विधी व न्याय आणि सामाजिक न्याय या विभागाकडे उपलब्ध होती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीच्या अर्जाची प्रत शासनाच्या या दोनही विभागाकडे, अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत पाठवून या पत्रांच्या प्रती अपिलार्थीस देणे या प्रकरणी गरजेचे होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची कृती न केल्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती प्राप्त होऊ शकली नाही. अशा प्रकारे अपिलार्थीस संपूर्ण माहिती प्राप्त न होण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी हे जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती संबंधित विभागांच्या मंत्रालयातील कार्यालयातून स्वत: प्राप्त करुन घेऊन तदनंतर ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती पुरविण्याच्या दृष्टीने आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती

त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी, त्यांना ही माहिती टपालाद्वारे हवी आहे की व्यक्तिशः हवी आहे याचा कोणताही उल्लेख केला नसल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त कालावधीमध्ये कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधितांकडून स्वतः हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विजयकुमार गुरुनाथ पवार, रा. सोमनाथपूर, ता. उदगीर, जि. लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर विभाग,

लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८९५

निर्णय दिनांक २५-०३-२०१०

१ श्री. पांढरपोटे ज्योतीराम सर्जेराव, : अपिलार्थी

रा. शेलापुरी (नवीन वसाहत), माजलगांव,

तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत, घळाटवाडी, पवारवाडी,

हिंगणवाडी, ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय, घळाटवाडी,

तालुका माजलगांव, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगांव,

तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी त्यांनी त्यांच्या प्रथमी अपिलाच्या सुनावणीच्या वेळेस सुनावणीची तारीख वाढवून देण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांना विनंती अर्ज दिला होता. परंतु या अर्जाचा विचार न करता जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील फेटाळल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ग्रुप ग्रामपंचायत घळाटवाडी, पवारवाडी व हिंगणवाडी यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. तथापि संबंधितांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगांव यांच्याकडे दिनांक २५-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील खारीज केले. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगा-समोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देताना, जन अपिलीय अधिकारी यांनी ग्रामसेवक, ग्रामपंचायत घळाटवाडी यांच्याकडील माहितीचा विचार करुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय दिला. सदर निर्णय देताना, त्यांनी अपिलार्थीस त्यांचे म्हणणे पूर्णपणे मांडण्याची संधी दिली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगांव यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगांव यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २५-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पांढरपोटे ज्योतीराम सर्जेराव, रा. शेलापुरी (नवीन वसाहत), माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत, घळाटवाडी, पवारवाडी, हिंगणवाडी, ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय, घळाटवाडी, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२४४

निर्णय दिनांक २५-०३-२०१०

१ श्री. राऊत भिकन गणपत, : अपिलार्थी
रा. मठबोरगांव, पो. जानेफळ, तालुका जाफ्राबाद,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद
उपविभाग, भोकरदन, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-१०-२००९ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलाचा निर्णय बेकायदेशीर असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे मठबोरगांव येथील को. प. च्या झालेल्या दुरुस्ती कामाच्या

संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - को. प. चे पहिल्यापासून व नंतर झालेल्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक, एम. बी., मोजमाप पुस्तिकाच्या झेरॉक्स प्रती, रेती, खडी, सिमेंट, टेस्टींग रिपोर्ट, हार्ड रॉक घेतला आहे काय ? असेल तर किती खोल, काम केव्हा सुरु झाले व काम केव्हा संपले - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४२ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. अशा प्रकारे अपेक्षित माहितीपासून वंचित राहिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी तयार करुन ठेवली होती, तथापि अपिलार्थी ही माहिती घेऊन जाण्यासाठी त्यांच्याकडे कधीही न आल्यामुळे आणि त्यासाठी आवश्यक असलेले शुल्क न भरल्यामुळे, ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, अपिलार्थीने ज्या कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-याच्या दुरुस्तीचा उल्लेख त्यांच्या मूळ अर्जामध्ये केला

आहे तो कोल्हापूरी बंधारा बांधल्यापासून आतापर्यंत फक्त एकदाच २००७ या वर्षी दुरुस्ती करण्यात आला होता.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती, तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित राहिले नाहीत, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४२ इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०१-१०-२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (३) (क) मध्ये अपेक्षित असलेल्या या शुल्काचा तपशील अपिलार्थीस पुरविला नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ०१-१०-२००७ रोजीच्या पत्र अवैध असल्याचे सिध्द होत आहे. परिणामी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील, हार्ड रॉक घेतला होता काय ? हा मुद्दा क्रमांक ३ मधील भाग वगळता, उर्वरित मुद्दयांवरील संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मधील ' हार्ड रॉक घेतला आहे काय ' ? या मुद्दयावरील माहिती वगळता, उर्वरित सर्व माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मधील प्रथम भागाव्दारे, जन माहिती अधिकारी यांनी हार्ड रॉक घेतला आहे काय ? ही माहिती, जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित करणा-या स्वरुपाची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे खुलासे अथवा अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती, या अधिनियमा-

तील ' माहिती ' या शब्दाच्या कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होण्यासारखी नसल्यामुळे अपिलार्थीस ही जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस उपरोक्त निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मधील प्रथम भाग वगळता, उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राऊत भिकन गणपत, रा. मठबोरगांव, पो. जानेफळ, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद उपविभाग, भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२४५

निर्णय दिनांक २५-०३-२०१०

१ श्री. शामराव सुंदरराव खरात, : अपिलार्थी
रा. पाथरवाला बु., तालुका अंबड, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अधीक्षक अभियंता, दक्षता पथक व परिमंडळ,
(पाटबंधारे विभाग), औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, दक्षता पथक व परिमंडळ,
(पाटबंधारे विभाग), औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता, दक्षता पथक व परिमंडळ,
(पाटबंधारे विभाग), औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०८-२००९ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक ३०-०५-२००८ रोजी माहिती मागवूनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास नकार दिला व तसेच त्यांनी दिनांक ३०-०६-२००८ रोजी प्रथम अपील करुनही त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दिनांक ०१-०४-२००६ ते ३०-०५-२००८ या कालावधीतील, त्रयस्थ पक्ष श्री. एस. बी. झगडे, कार्यकारी अभियंता यांच्याविरुध्द जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेल्या चौकशी अहवालाची प्रत, अशी माहिती रजिस्टर्ड पोस्टाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८ (१) (ञ) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८ (१) (छ) व ८ (१) (ज) अन्वये अपिलार्थीस देता येणार नसल्याचे, अपिलार्थीस कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती उघड केल्याने, अधिनियमातील कलम ८ (१) (ञ) चा भंग होतो. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित

केलेल्या तक्रारीवर त्यांनी चौकशी करुन त्यांचा अहवाल शासनाकडे पाठवून दिला आहे, तथापि या प्रकरणाची चौकशी अद्यापपावेतो पूर्ण झाली किंवा कसे हे त्यांना माहीत नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन अपिलीय अधिकारी यांनी, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८ (१) (छ) व (ज) च्या तरतुदीनुसार नाकारली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे स्पष्ट करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी जर त्यांनी शासनाकडे पाठलेल्या अहवालावर कार्यवाही अंतिम झाली असेल तर या अहवालाची प्रत त्यांनी अपिलार्थीस, अधिनियमातील कलम १० चा वापर करुन ही माहिती उघड केल्यास अधिनियमातील कलम ८ (१) मधील कोणत्याही उपकलमांचा भंग होणार नाही असे पाहून, ती अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व जर अद्यापपावेतो त्यांच्या अहवालावर शासनस्तरावर अंतीम निर्णय न होता कार्यवाही चालू असेल तर अपिलार्थीस तसे कळवावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शामराव सुंदरराव खरात, रा. पाथरवाला बु., तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, दक्षता पथक व परिमंडळ,

(पाटबंधारे विभाग), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, दक्षता पथक व परिमंडळ, (पाटबंधारे विभाग), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२८०

निर्णय दिनांक २५-०३-२०१०

१ श्री. अंकुश एम. पवार, : अपिलार्थी
प्लॉट नं. एफ-४१/१२, एन. ७, सिडको, अयोध्यानगर,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप विभागीय कृषि अधिकारी, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०५-२००८ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या सुनावणीमध्ये निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदणीकृत टपालाव्दारे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५ या प्रमाणे - १) चित्तेगांव ग. क्र. २/१२ मानाब. २) चित्तेगांव ग. क्र. २/१३ मानाब. ३) चित्तेगांव ग. क्र. १/१० मानाब. ४) गाडीवाट ग. क्र. १/५ मानाब. ५) गाडीवाट ग. क्र. १/१२ मानाब. ६) खोडेगांव ग. क्र. १/२३ मानाब. ७) खोडेगांव ग. क्र. १/२६ मानाब. ८) खोडेगांव ग. क्र. ३७ मानाब. ९) खोडेगांव ग. क्र. ३४ मानाब. १०) खोडेगांव ग. क्र. ३६ मानाब.

या वरील गावात गटनिहाय झालेल्या कामावरील सर्व मजुरांच्या रोजगार पत्रिका, फोटोसहित लॅमिनेटेड जॉबकार्ड, ओळखपत्राचा क्रमांक, पोस्ट, बँक खाते क्रमांक तसेच राष्ट्रीय बँकेचे नांव, ठिकाण व मजुरांचे नावे लिहिलेले हजेरीपट आणि मोजमाप पुस्तिका या सर्व मुद्दयांच्या छायांकीत प्रती मिळणेबाबत. "

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी दिनांक ०१-०४-२००६ ते दिनांक २०-०२-२००७ असा होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत म्हणजे, दिनांक १७-०२-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून या माहितीची पाहणी करण्याचे अपिलार्थीस सूचित केले व यानंतर दिनांक २८-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये दोन प्रतिपृष्ठ याप्रमाणे भरावे असे अपिलार्थीस सूचित केले, तथापि यानंतर अपिलार्थीने परत त्यांच्या दिनांक ०७-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना एकूण किती रक्कम भरावयाची आहे याची जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारणा केली, परंतु यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतेही शुल्क कळविले नाही, म्हणून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-

०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न देता त्यांनी दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या त्यांच्या अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्याबरोबर झालेल्या बैठकीचे इतिवृत्त जारी केले. या इतिवृत्तात अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश दिले नाहीत. अशा प्रकारे अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने याच माहितीकरिता वेळोवेळी माहिती आयोग व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे व्दितीय व प्रथम अपिले केली आहेत. अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांनी कधीही नाकारले नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मजुरांचे जॉब कॉर्ड, बँक खाते क्रमांक, राष्ट्रीय बँकेचे नाव इत्यादी मजुरांची वैयक्तिक माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतील काही भाग जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्षात ताब्यातच नव्हता, त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्या-नंतर त्यांनी या अर्जाची प्रत, ही माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध होती त्या प्राधिकरणाकडे, सदर अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठवावयास हवी होती, तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केलेली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती देणे भाग होते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती लक्षात घेता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस

त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली दिनांक १७-०२-२००७ पर्यंतच्या कालावधीशी संबंधीत माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अंकुश एम. पवार, प्लॉट नं. एफ-४१/१२, एन. ७, सिडको, अयोध्यानगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/७०७ व ७०८
निर्णय दिनांक : २६.०३.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सौ. कविता अ.गौर,<br>औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>सदस्य सचिव,<br>विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सदस्य व विभागीय समाज कल्याण अधिकारी,<br>विभागीय जात प्रमाणपत्र समिती क्र.१, औरंगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३.०३.२००९ व १३.०३.२००९ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी श्री. वाकोडे यांच्याकडे अपील क्र.७०७ च्या संदर्भात दि. २४.०२.२००९ रोजी व क्र. ७०८/०९ च्या संदर्भात दि. १२.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले असता, संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती न दिल्यामुळे आणि अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३.०१.२००९ व १२.०१.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ पक्षाच्या जात प्रमाणपत्राच्या संदर्भात विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली होती.

तथापि या दोनही प्रकरणासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जास कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.०२.२००९ व १३.०२.२००९ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले दाखल केली. परंतु या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने व परिणामी अपिलार्थी अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेली विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप व विशेषतः अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा त्रयस्थ पक्षाशी असलेला संबंध लक्षात घेता, या दोनही प्रकरणांशी संबंधित अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा सदस्य व विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,क्र.१,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. २४.०२.२००९ व १३.०२.२००९ रोजीच्या दोनही प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयांनी अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र. ७०७/०९ व ७०८/०९ निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त दोनही प्रकरणी अपिलार्थीच्या दि.२४.०२.२००९ व १३.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक २६-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. कविता अ.गौर,प्लॉट क्र. २, सारानगर, एन-१,सिडको, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव,विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सदस्य व विभागीय समाज कल्याण अधिकारी, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी,समिती क्र.१, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९०३

निर्णय दिनांक : २६.०३.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. वाजेद खान पठाण,<br>रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी,<br>भूसंपादन कार्यालय,बीड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक,<br>भूमी अभिलेख, बीड | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : विशेष भूसंपादन अधिकारी, जा.प्र,बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने आणि या प्रकरणी त्यांनी प्रथम अपील केल्यानंतरही त्यांना संबंधितांकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी, भूसंपादन कार्यालय, बीड यांच्याकडे, "बलभीम चौक ते राजूरी वेस हा रस्ता रुंदीकरणाचा प्रस्ताव नगरपरिषदेने आपल्याकडे केव्हा दाखल केला आणि तो प्रस्ताव काय आहे? आणि ते प्रलंबित का आहे? आणि हे प्रकरण किती दिवसात पूर्ण होईल?", अशी माहिती टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज भूसंपादन कार्यालयास उद्देशून केला होता. परंतु या अर्जाची प्रत त्यांनी

प्रत्यक्षात तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, बीड यांच्याकडे सादर केली. त्यामुळे साहजिकच भूसंपादन कार्यालयाकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे दि.२१.०३.२००९ रोजी अधीक्षक, भूमी अभिलेख, बीड यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर अधीक्षक, भूमी अभिलेख, यांनी दि. ०६.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित ते जन अपिलीय अधिकारी नसल्याचे नमूद करुन अपिलार्थीचा अपील अर्ज निकाली काढल्याचे अपिलार्थीस कळविले. अशाप्रकारे प्रत्यक्षात माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,सहायक जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी माहितीसाठीचा मूळ अर्ज तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,बीड यांच्याकडे सादर केला. त्यावेळी ही माहिती अपिलार्थीस देता येत नसल्याचे तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांनी त्यांना तीस दिवसांच्या आत कळवावयास हवे होते. तथापि भूसंपादन विभागाने किंवा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यांनी मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

भूसंपादन कार्यालयातील सहायक जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, मूळात अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज त्यांच्याकडे प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देऊ शकले नाहीत. एवढे असूनही त्यांनी अपिलार्थीस दि. ०९.०२.२०१० रोजी त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या विषयावरील माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज भूसंपादन कार्यालय,बीड यांना उद्देशून केला, परंतु प्रत्यक्षात तो तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडे सादर केला. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता,

ही माहिती भूसंपादन कार्यालयाकडे त्यांनी मागावयास हवी होती व त्याप्रमाणे ही माहिती भूसंपादन कार्यालयाकडे मागितली गेली आहे. तथापि अर्ज सादर करताना अपिलार्थीने तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, बीड यांच्याकडे त्यांचा अर्ज सादर केल्याचे दिसून येत आहे. तालुका निरीक्षक यांनी सदरचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून अपिलार्थीच्या अर्जाची प्रत भूसंपादन कार्यालयाकडे पाच दिवसांच्या आत पाठविणे त्यांना अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीप्रमाणे गरजेचे होते. परंतु तालुका निरीक्षकाने अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही न करता अर्ज विनाकार्यवाही त्यांच्याकडेच ठेवून दिला. यानंतर अपिलार्थीने अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय,बीड यांच्याकडे प्रथम अपील केले. अधीक्षक, भूमी अभिलेख,बीड यांना अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज पाहिल्यानंतर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची कल्पना आली. यानंतर अधीक्षक भूमी अभिलेख यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज, त्यांच्याशी काहीही संबंध नसल्याचे कारण दर्शवून निकाली काढला. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी तालुका निरीक्षक,भूमी अभिलेख,बीड हेच जबाबदार असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीच्या मुद्यांचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने सार्वजनिक प्राधिकरणाकडे जी माहिती मागितली आहे, ती त्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडून कारणे व स्पष्टीकरणे अपेक्षित करणाऱ्या स्वरुपातील असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे निर्णय घेणे इतकीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे मूळात अपिलार्थीच्या मूळ माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ (च) मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याचे दिसून येत आहे. परिणामी, ही माहिती अपिलार्थीस कोणत्याही जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अशाप्रकारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना मूळात देय होत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक २६-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. वाजेद खान पठाण,पैठण गेट, सब्जी मंडी,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, जा.प्र.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. अधीक्षक,भूमी अभिलेख, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२९०३
निर्णय दिनांक २६/०३/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विलासराव विठ्ठलराव खरात,<br>रा.अंबड, जि.जालना | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| १ | जन माहिती अधिकारी,<br>कृषी कार्यालय, घनसावंगी, जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कृषी अधिकारी,<br>कृषी कार्यालय, अंबड, जि. जालना | | |

**<u>निर्णय</u>**

श्री. विलासराव विठ्ठलराव खरात यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०४.०५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. १९.०४.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २६.०५.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २१८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २६/०३/२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विलासराव विठ्ठलराव खरात, रा.शिवाजी हाऊसिंग सोसायटी, बसस्टँडच्या बाजूला, अंबड, ता.अंबड, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२९०४
निर्णय दिनांक २६/०३/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विलासराव विठ्ठलराव खरात,<br>रा.अंबड, जि.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी,<br>जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी,<br>जि.जालना | | |

**निर्णय**

श्री. विलासराव विठ्ठलराव खरात यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०४.०५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. १९.०४.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २६.०५.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २१८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विलासराव विठ्ठलराव खरात, रा.शिवाजी हाऊसिंग सोसायटी, बसस्टँडच्या बाजूला, अंबड, ता.अंबड, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२९०५
निर्णय दिनांक २६/०३/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके,<br>रा.आलमगांव, ता.अंबड, जि.जालना<br>श्री.ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे,<br>रा.पावसे पांगरी, ता.अंबड, जि.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>कृषी कार्यालय, अंबड, जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कृषी अधिकारी,<br>कृषी कार्यालय, अंबड, जि.जालना | | |

**निर्णय**

श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके व श्री.ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०४.०५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. १९.०४.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २५.०५.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २१९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थींचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके, रा.आलमगांव, ता.अंबड, जि.जालना.
२. श्री.ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे, रा.पावसे पांगरी, ता.अंबड, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२९०६
निर्णय दिनांक २६/०३/२०१०

१ श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके, : अपिलार्थी
रा.आलमगांव, ता.अंबड, जि.जालना
श्री.ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे,
रा.पावसे पांगरी, ता.अंबड, जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबड, जि.जालना
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबड, जि.जालना

**निर्णय**

श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके व श्री.ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०४.०५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. १९.०४.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २५.०५.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २१९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २६/०३/२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके, रा.आलमगांव, ता.अंबड, जि.जालना.
२. श्री.ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे, रा.पावसे पांगरी, ता.अंबड, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२९०७
निर्णय दिनांक २६/०३/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके,<br>रा.आलमगांव, ता.अंबड, जि.जालना<br>श्री.ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे,<br>रा.पावसे पांगरी, ता.अंबड, जि.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>जि.प.बांधकाम उपविभाग, अंबड, जि. जालना | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,<br>जि.प. (बांधकाम) उपविभाग, अंबड, जि.जालना | | |

**निर्णय**

श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके व श्री.ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०४.०५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. १९.०४.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २५.०५.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २१९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके, रा.आलमगांव, ता.अंबड, जि.जालना.
२. श्री.ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे, रा.पावसे पांगरी, ता.अंबड, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२९०८
निर्णय दिनांक २६/०३/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके,<br>रा.आलमगांव, ता.अंबड, जि.जालना<br>श्री.ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे,<br>रा.पावसे पांगरी, ता.अंबड, जि.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>लघुपाटबंधारे स्थानिक स्तर उपविभाग, अंबड,<br>जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,<br>लघुपाटबंधारे स्थानिक स्तर उपविभाग, अंबड,<br>जि.जालना | | |

## निर्णय

श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके व श्री.ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०४.०५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. १९.०४.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २५.०५.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २१९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके, रा.आलमगांव, ता.अंबड, जि.जालना.
२. श्री.ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे, रा.पावसे पांगरी, ता.अंबड, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९००

निर्णय दिनांक २६-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बबन माणिक भातलवंडे,<br>मु. पो. दहिफळ, ता. कळंब, जि. उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,<br>कळंब, जि. उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,<br>कळंब, जि. उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, कळंब, जि. उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, कळंब, जि. उस्मानाबाद

त्रयस्थ पक्ष : १) श्री. घुंटे सी.जे. २) श्री. जाधव ३)श्री. बडे ४) श्री. जाधवर डी. व्ही.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी न दिल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"मला जि आपल्या कार्यालयातुन माहितीच्या अधिकाराखाली जि माहिती दिली त्यांची मापन पुस्तीका व इस्टीमेंन्ट व अपूर्ण माहिती अधिकाऱ्यांवर पोलीस केस करुन उपलब्ध करुन घेणे बाबद व नियमाप्रमाणे दंड करने बाबद."

(टीप :- अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जशाचा तसा घेतलेला आहे.)

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने हा अर्ज तालुका कृषि अधिकारी, कळंब यांच्याकडे केला होता. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या जन माहिती अधिकाऱ्याच्या प्रत्यक्षात ताब्यात होती, ते उमरगा येथे बदली होऊन गेल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज तालुका कृषि अधिकारी, उमरगा यांच्याकडे दिनांक ०८-१२-२००८ रोजी पाठवून दिला होता. परंतु यानंतरही अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २९-१२-२००८ रोजी तालुका कृषि अधिकारी, कळंब यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर तालुका कृषि अधिकारी, कळंब यांनी कोणताही निर्णय न देता फक्त दिनांक १३-०१-२००९ रोजी अपिलार्थी आणि त्यांच्या विभागाचे अधिकारी यांच्या बरोबर झालेल्या बैठकीचे इतिवृत्त जारी केले. परंतु अपिलार्थीस कोणतीही माहिती उपलब्ध न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष श्री. घुंटे सी.जे., जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी चुकीच्या पध्दतीने अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची केलेली हाताळणी या बाबी पाहता, जन अपिलीय अधिकारी

यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास ते अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार द्वितीय अपील अथवा कलम १८ नुसार या संदर्भात लेखी तक्रार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालील-प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक २९-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २६-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बबन माणिक भातलवंडे, मु. पो. दहिफळ, ता. कळंब, जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, कळंब, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कळंब, जि. उस्मानाबाद यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९०१

निर्णय दिनांक २६-०३-२०१०

१ श्री. लक्ष्मण अर्जून ठोंबरे, : अपिलार्थी

घर नं. १-२१-६४४, जय भीमनगर, घाटी रोड, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

उपअभियंता, जलनिःस्सारण विभाग, महानगरपालिका

औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

महानगरपालिका, जलनिःस्सारण विभाग, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : वॉर्ड अधिकारी, वॉर्ड 'अ', महानगरपालिका, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक २१-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना दिली नसल्यामुळे आणि ते ज्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती मागण्यासाठी गेले होते त्यावेळी त्यांना संबंधितांनी उडवाउडवीची उत्तरे देऊन मूळ मुद्दा बाजूला ठेवून चुकीची माहिती दिल्या कारणाने त्यांनी

विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील कडूबा हिवराळे यांच्या घरापासून ते शाहुबा दाभाडे यांच्या घरापर्यंत झालेल्या गटाराच्या बांधकामाचे अंदाजपत्रक आणि अंतिम मूल्य, ही माहिती सत्यप्रतीच्या स्वरुपात व्यक्तिशः मागितली होती.

अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जलनिःस्सारण विभागाच्या जन अपिलीय अधिकाऱ्याकडे दिनांक ०३-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीस आयोगास या प्रकरणाशी संबंधित कोणतीही माहिती देता आली नाही. या प्रकरणाशी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी ते पुर्णतः अनभिज्ञ असल्याचे आयोगास आज रोजी सुनावणीच्या वेळी आढळून आले आहे.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार विहित मुदतीत देय होत आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात

आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांना देण्यासंदर्भात जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणत्याही कार्यालयाने या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर सकारात्मक कार्यवाही केलेली नाही. आजच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने एकमेकांवर जबाबदारी ढकलून देण्याचे आयोगासमोर प्रयत्न केले. त्यांच्या एकंदरीत अभिनिवेशाद्वारे या प्रकरणाशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी अपिलार्थीस ही माहिती कोणी देऊ शकेल असे आयोगास वाटत नाही. सबब आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप अत्यंत मर्यादित होते. जर संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपलब्ध नसेल किंवा ती माहिती अपिलार्थीस त्यांना देता येत नसेल तर अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस तसे कळवावयास हवे होते. परंतु या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलीही नाही किंवा ती न देण्याचे कारण देऊन नाकारलीही नाही. हे पाहता, अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी आणि त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. महानगरपालिका आयुक्त, औरंगाबाद यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

३. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी आणि त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २६-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. लक्ष्मण अर्जून ठोंबरे, घर नं. १-२१-६४४, जय भीमनगर, घाटी रोड, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा वॉर्ड अधिकारी, वॉर्ड 'अ', महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९०२

निर्णय दिनांक २६-०३-२०१०

१ श्री. विष्णू नागोजी म्हस्के, : अपिलार्थी
मु. समर्थनगर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार, तहसील कार्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अधिकारी, उपविभाग कार्यालय,
सिल्लोड, जि. औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातर्फे दिनांक ०१-०१-२००८ ते १५-०१-२००९ या कालावधीमध्ये केल्या गेलेल्या रॉकेल पुरवठ्यासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - हॉकर्स धारकांना प्रत्येकी रॉकेल टाक्या किती आहेत व एका हॉकर्सला किती रेशन कार्ड व एका रेशन कार्ड धारकास किती रॉकेल दिले जाते याचा सरकारी

भाव किती व कसा, हॉकर्स धारकांना रॉकेल विकण्यास नेमून दिलेली जागा व त्याचे ठिकाण कोणते व ते कोठे कोठे आहे - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, म्हणून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या कालावधीमध्ये माहिती उपलब्ध न झाल्याने अपिलार्थीने दिनांक १७-०४-२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने व अपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे. त्यांच्या मूळ अर्जामधील, एका रेशन कार्ड धारकास किती रॉकेल मिळते याची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली नाही आणि प्राप्त झालेली माहिती त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्राप्त झाली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दिनांक ३०-०४-२००९ रोजी पुरविली आहे. प्रत्येक रेशन कार्ड धारकास किती रॉकेल मिळते या मुद्यासंदर्भात त्यांनी आयोगास असा खुलासा केला की, त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये प्रत्येक रेशन कार्ड धारकास त्यांच्या कार्यालयामार्फत दिले गेलेले रॉकेलचे परिणाम त्यांनी अपिलार्थीस दिले आहे व त्याबरोबर संबंधित हॉकर्सला एकूण किती रेशन कार्ड जोडले आहेत याचाही तपशील त्यांनी या माहितीमध्ये

अपिलार्थीस दिलेला आहे. सर्वसाधारण परिस्थितीत प्रत्येक रेशन कार्ड धारकास प्रतिमहा दोन लिटर या दराने त्यांच्या कार्यालयातर्फे रॉकेल वाटप केले जाते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १५-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यांनी अपिलार्थीस मूळात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणी नंतर दिनांक ३०-०४-२००९ रोजी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली आहे. तसेच अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता आयोगास असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०१-०१-२००८ ते १५-०१-२००९ या कालावधीशी संबंधित माहिती मागविली असताना, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त जानेवारी २००९ या महिन्याशी संबंधितच माहिती दिली आहे. यावरुन अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण व विलंबाने माहिती पुरविल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस अशाप्रकारे विलंबाने माहिती देऊन संबंधित जन माहिती अधिकारी आणि या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याचे सिध्द होत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब महसूल आयुक्त, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक ज्यांना अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजण्याची तरतूद आहे, या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित - प्रत्येक रेशन कार्ड धारकास किती रॉकेल मिळते - या मुद्यावरील माहिती आणि दिनांक ०१-०१-२००८ ते १-१२-२००८ या कालावधीशी संबंधित मूळ

अर्जातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. महसूल आयुक्त, औरंगाबाद यांना, संबंधित जन माहिती अधिकारी आणि या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर, प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २६-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विष्णू नागोजी म्हस्के, मु. समर्थनगर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, तहसील कार्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उपविभाग कार्यालय, सिल्लोड, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ महसूल आयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९०४

निर्णय दिनांक २६-०३-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. मोतीराम गयबू काळे,<br>मु. जानापुरी, पो. वडेपुरी, तालुका लोहा, जिल्हा नांदेड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सहायक संचालक, सामाजिक वनीकरण विभाग,<br>नांदेड | : प्रतिवादी |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी | : | सहायक संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड |
| जन अपिलीय अधिकारी | : | उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलाथीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००१-०२ ते २००६-०७ या

कालावधीशी संबंधित संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेसदर्भात, विस्तृत व्याप्ती असलेली काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीने सदर अर्ज उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड यांच्याकडे केला होता, तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित लागवड अधिका-याकडे असल्यामुळे सहायक संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत संबंधित लागवड अधिका-याकडे पाठवून दिली व तदनंतर संबंधितांकडून माहिती प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस ती प्रथमतः दिनांक ०१-०१-२००९ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पुरविली. या माहितीमध्ये परिक्षेत्र नांदेड, देगलूर व भोकर यांच्या माहितीचा समावेश होता. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत त्यांच्या दिनांक २२-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे उर्वरित तालुके कंधार, किनवट, यांच्याशी संबंधी माहिती अपिलार्थीस पुरविली, तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०२-२००९ रोजी निर्णय पारीत केला. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील खारीज केले. अपिलार्थीचे प्रथम अपील खारीज करताना त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०१-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस सविस्तर उत्तर दिलेल्या पत्राचा आधार घेतला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती तथा अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस अद्यापपावेतो वन परिक्षेत्र बिलोली, हदगांव, लागवड अधिकारी, कंधार यांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाबाबत

माहिती द्यावयाची बाकी आहे. ही माहिती अपिलार्थीस ते तीस दिवसाच्या आत उपलब्ध करुन देऊ शकतील.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांचा अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक १७-०२-२००९ रोजी दिलेला निर्णय हा पूर्णतः चुकीचा आहे. त्यांनी या निर्णयामध्ये अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०१-०१-२००९ रोजी पुरविल्याचे नमूद करुन अपिलार्थीचे अपील खारीज केले, तथापि संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०१-०१-२००९ रोजी संपूर्ण माहिती न देता अपिलार्थीस अर्धवट माहिती दिली आहे. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-०१-२००९ रोजी अपिलार्थीस कंधार, किनवट, मुखेड या परिक्षेत्राशी संबंधित माहिती दिली आहे व अद्यापही अपिलार्थीस लागवड अधिकारी बिलोली, कंधार यांच्याकडील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेबाबतची माहिती आणि लागवड अधिकारी हदगांव यांच्याकडील संपूर्ण माहिती प्राप्त होणे बाकी आहे, असे जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादावरुन स्पष्ट होत आहे. तथापि या वस्तुस्थितीची नोंद अपिलीय अधिका-याने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देताना घेतली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने आता उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार पुरविणे भाग आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, बिलोली, कंधार व हदगांव परिक्षेत्राशी संबंधित उर्वरित संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी लागवड अधिकारी, बिलोली, कंधार व हदगांव यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत न पुरवून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल व अशा प्रकारच्या त्यांच्या कृतीव्दारे स्वतःला अधिनियमातील कलम २० या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र

ठरविल्यामुळे त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस संचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, बिलोली, कंधार व हदगांव परिक्षेत्राशी संबंधित उर्वरित संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २६-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोतीराम गयबू काळे, मु. जानापुरी, पो. वडेपुरी, तालुका लोहा, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९०५

निर्णय दिनांक २६-०३-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. मोतीराम गयबू काळे,<br>मु. जानापुरी, पो. वडेपुरी, तालुका लोहा, जिल्हा नांदेड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप वन संरक्षक, उप वन संरक्षक वन विभाग, नांदेड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सहायक वन संरक्षक, सहायक वन संरक्षक (रोहयो),<br>वन विभाग, नांदेड | : प्रतिवादी |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : मुख्य लेखापाल, उप वनसंरक्षक कार्यालय, वन विभाग, नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | : सहायक वन संरक्षक, (रोहयो), नांदेड |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयामार्फत संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सन २००१-०२ ते २००६-०७ या कालावधीत झालेल्या कामाच्या लेखा परीक्षणाच्या सत्यप्रती, प्राप्त

निधी, एकूण धान्य, एकूण कुपन व धान्याचे वजन किलोमध्ये, या योजनेत जिल्ह्यात कोणकोणती कामे करण्यात आली, त्यापैकी किती पूर्ण किती अपूर्ण व प्रत्येक कामावरील मजुराच्या मजूरी वाटपाच्या सत्यप्रती, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रत्यक्षात संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी यांच्या ताब्यात असल्यामुळे, त्यांच्याकडे अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत पाठवून, अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले, तथापि यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०२-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले, परंतु या कालावधीमध्ये अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०८-०३-२०१० रोजीच्या पत्राव्दारे माहिती पुरविल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०३-२०१० रोजीच्या पत्राव्दारे पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थी हे आजपर्यंत देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त होण्या-पासून वंचित राहिल्याचे आयोगास आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-०३-२०१० रोजीच्या पत्राव्दारे पुरविलेल्या कथित माहितीमध्ये लेखा परीक्षण

अहवालाच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस दिल्या नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस मजूरी वाटपाच्या मस्टरच्या सत्यप्रती न देता ही माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (९) च्या तरतुदीप्रमाणे देण्याचे नाकारल आहे. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस माहिती नाकारण्या-ची ही कृती चुकीची असून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांच्याकडे या कालावधीतील मस्टरच्या सत्यप्रती मागितल्या आहेत. या सत्यप्रती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचे मनुष्यबळ प्रमाणाबाहेर वळवावे लागेल, असे आयोगास वाटत नाही. अपिलार्थीस माहिती नाकारताना, जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी लागणारा खर्च जास्त असल्याचे दुसरे कारण दर्शविले आहे, हे कारण देखील आयोगास मान्य नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांनी संदर्भित केलेल्या सन २००१-०२ ते २००६-०७ या कालावधीतील संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या लेखा परीक्षणाच्या प्रती आणि मजुराच्या हजेरीपत्रकाच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असा खुलासा केला आहे की, त्यांना त्यांच्या कार्यालयाचे वन परिक्षेत्र अधिकारी यांनी विलंबाने माहिती दिल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लागला. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना ज्या वन परिक्षेत्र अधिका-यांकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही ते सर्व वन परिक्षेत्र अधिकारी या प्रकरणी अपिलार्थीस अपेक्षित माहिती न देण्यासाठी जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील सर्व वन परिक्षेत्र अधिका-यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविली नाही.

त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस स्वतःला पात्र ठरविले आहे. सबब, मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद यांना, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २६-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोतीराम गयबू काळे, मु. जानापुरी, पो. वडेपुरी, तालुका लोहा, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल, उप वनसंरक्षक कार्यालय, वन विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), वन विभाग, नांदेड यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२४९
निर्णय दिनांक : ३०.०३.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुर्यकांत दत्तोपंत धावणे,<br>जालना. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, जालना. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक,भूमी अभिलेख, जालना | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९.०९.२००९ रोजी फेरसादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, कसबे जालना, तालुका जिल्हा जालना येथील सिटी सर्व्हे नं. ७८९४/१ व ७८९४/२ मधील दि. ०८.०३.१९९५ ला मंजूर झालेला फेर कशाच्या आधारे मंजूर केला, त्याबाबतची लेखी माहिती, वाटणीपत्र, करारनामा, दि. २१.१२.१९७७ ची नक्कल, ७८९४/२ ची पोटविभागणी कोणत्या आदेशाच्या आधारे केली, त्या आदेशाची नक्कल, राजाराम अण्णाजी यांच्या वारसा फेर ऐवजी मृत्युनंतर वाटणी फेर कशाच्या आधारे घेतला, राजाराम अण्णा यांचे वारसांना व अर्जदारास नोटीस

दिली का, काढलेल्या जाहीर प्रगटनाची प्रत व फेरची नोंद घेणाऱ्या व मंजूर करणाऱ्या तत्कालीन अधिकाऱ्यांची नावे व पत्ते, या मुद्यांची माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०९.०४.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.०५.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दि. २३.०५.२००८ पर्यंत माहिती देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी वेळोवेळी संपर्क साधूनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिलेली नाही. आजही जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेल्या माहितीमध्ये त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील 'फेर'ची नक्कल नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती ते अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. आज त्यांनी त्यांच्यासोबत आणलेली,अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आयोगाच्या अवलोकनास्तव सादर केली असता, या माहितीमध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या, फेर घेणाऱ्या व तो फेर मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे व पत्ते, याबाबतची माहिती नाही, असे दिसून येत आहे. या मुद्यावरील माहितीसह ते अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत संपूर्ण माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देतील, असे त्यांनी आयोगासमोर नंतर कबूल केले आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील, प्रश्नार्थक व जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती वगळता, उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील त्यांना देय होत असलेली संपूर्ण माहिती तीन दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना विहित मुदतीत उपलब्ध करुन देण्याचे तर सोडाच परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.०५.२००८ रोजी अपिलार्थीस दि. २३.०५.२००८ पर्यंत माहिती देण्याचे आदेश देऊनही त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी, श्री. चव्हाण तालुका निरीक्षक,भूमी अभिलेख,जालना (सध्या निलंबित,मुख्यालय जालना) यांनी कोणतीही माहिती न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस आयुक्त (जमाबंदी) तथा संचालक, भूमी अभिलेख,पुणे यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण देय माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. आयुक्त (जमाबंदी) तथा संचालक,भूमी अभिलेख,पुणे यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,भूमी अभिलेख,जालना, श्री. चव्हाण (सध्या निलंबित, मुख्यालय,जालना) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुर्यकांत दत्तोपंत धावणे,अमर टेलर,शनीमंदीर चौक,जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक,भूमी अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त (जमाबंदी) तथा संचालक,भूमी अभिलेख,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२५०
निर्णय दिनांक : ३०.०३.२०१०

१. श्री. निळकंठ भिवनाजी राऊत, : अपिलार्थी
रा.तळणी,ता.हदगाव,जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
गट विकास अधिकारी कार्यालय,
पंचायत समिती, हदगाव,जि.नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी,
गट विकास अधिकारी कार्यालय,
पंचायत समिती, हदगाव,जि.नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी त्यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगाव यांच्याकडे दि. १९.०४.२००८ रोजी पाठविलेला प्रथम अपील अर्ज स्वीकारण्यास नकार दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या प्रकरणी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती,हदगाव यांना उद्देशून लिहिलेल्या दि. ०४.०३.२००८ रोजीच्या पत्रान्वये मागविलेल्या खुलाशाची लेखी प्रत व उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्या दि. २७.०९.२००७ रोजीच्या आदेशाप्रमाणे त्यांच्या कार्यालयाने चौकशी केली नसल्यास जबाबदार अधिकाऱ्यावर जन माहिती अधिकारी काय कारवाई करणार? , अशी माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १९.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि हे अपील स्वीकारण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी नाकारल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक आहे, असा युक्तिवाद आयोगासमोर केला.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी, 'उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,नांदेड यांनी त्यांच्या दि. २७.०९.२००७ रोजीच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने चौकशी केली नसल्यास, जबाबदार अधिकाऱ्यावर जन माहिती अधिकारी हे काय कारवाई करणार?' या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण अशाप्रकारच्या माहितीमध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून भविष्यकाळातील माहिती मागविली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेल्या माहितीपैकी जी माहिती प्रत्यक्ष ताब्यात असते, तिच माहिती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी हे अर्जदाराच्या एखाद्या प्रकरणावर भविष्यकाळात काय/कोणत्या प्रकारची कार्यवाही करणार, ही भविष्यकाळाशी संबंधित असलेली माहिती अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून वर्तमानकाळात मागता येणार नाही. या कारणास्तव अपिलार्थीस या प्रकरणातील त्यांच्या मूळ अर्जातील जन माहिती अधिकारी यांच्या भविष्यकाळातील नियोजन/कृतीबाबत त्यांच्याकडून कोणतीही माहिती देय असणार नाही. मात्र त्यांच्या मूळ अर्जातील उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नांदेड यांच्या दि.

०४.०३.२००८ रोजीच्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही म्हणजेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांचे दि. ०४.०३.२००८ रोजीचे पत्र प्राप्त झाल्यानंतर या विषयासंदर्भात त्यांनी विविध प्राधिकरणाशी दि. ०६.०३.२००८ पर्यंत केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व यासंदर्भातील अभिलेख्यावरील त्यांच्याकडील टिपणीच्या प्रती,एवढीच माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे किंवा त्यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्या दि. ०४.०३.२००८ रोजीच्या पत्रावर दि. ०६.०३.२००८ पर्यंत कोणतीही कार्यवाही केली नसेल तर, त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस तसे कळवावे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे देय असलेली माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. निळकंठ भिवनाजी राऊत,रा.तळणी,ता.हदगाव,जि.नांदेड-४३१ ७४३.

२. जन माहिती अधिकारी, गट विकास अधिकारी कार्यालय,पंचायत समिती, हदगाव, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी,गट विकास अधिकारी,पंचायत समिती, हदगाव,जि.नांदेड यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२९०९
निर्णय दिनांक ३०/०३/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके,<br>रा.आलमगांव, ता.अंबड, जि.जालना<br>श्री.ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे,<br>रा.पावसे पांगरी, ता.अंबड, जि.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>लघुपाटबंधारे स्थानिक स्तर उपविभाग, घनसावंगी,<br>जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>लघुपाटबंधारे स्थानिक स्तर उपविभाग, घनसावंगी,<br>जि.जालना | | |

**निर्णय**

श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके व श्री.ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०४.०५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. १९.०४.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २६.०५.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते.  तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २१८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक :   ३०/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके, रा.आलमगांव, ता.अंबड, जि.जालना.
२. श्री.ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे, रा.पावसे पांगरी, ता.अंबड, जि. जालना.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२९१०
निर्णय दिनांक ३०/०३/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके,<br>रा.आलमगांव, ता.अंबड, जि.जालना<br>श्री.ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे,<br>रा.पावसे पांगरी, ता.अंबड, जि.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी,<br>जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी,<br>जि.जालना | | |

## निर्णय

श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके व श्री.ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०४.०५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. १९.०४.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २६.०५.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २१८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके, रा.आलमगांव, ता.अंबड, जि.जालना.
२. श्री.ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे, रा.पावसे पांगरी, ता.अंबड, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९१८

निर्णय दिनांक ३०-०३-२०१०

१ श्री. संजय बाबुराव यरपुरवाड, : अपिलार्थी
मु. पो. जांब बु., ता. मुखेड, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय,
मुखेड, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व शिक्षा अभियान पुनर्रचित अभ्यासक्रमाच्या संदर्भात, शिक्षक प्रशिक्षण मानधन वाटप रजिस्टरची सन २००१ ते २००८ पर्यंतची

नक्कल, तालुक्यातील शिक्षण संस्थांचा पडताळणी अहवाल व भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे, अशी माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. या प्रकरणी ही माहिती अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत उपलब्ध न होण्याची कारणे, सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे आणि आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. तथापि अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, संबंधित गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, मुखेड तथा जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १९-१२-२००८ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न पुरवून संबंधित जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, मुखेड यांनी स्पष्ट

केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस, शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांना, संबंधित जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, मुखेड यांच्यावर, प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** — **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०-०३-२०१०** — **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संजय बाबुराव यरपुरवाड, मु. पो. जांब बु., ता. मुखेड, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, मुखेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ. बाबासाहेब

आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटलजवळ, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२४८

निर्णय दिनांक ३०-०३-२०१०

१ श्री. एम. बी. शिंदे, : अपिलार्थी

मु. इतवारा, मोमीन गल्ली, गौतम निवास, जुना जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

आयुक्त, अपंग कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे -१

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

आयुक्त, अपंग कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे -१

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १०-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा आयुक्त, अपंग आयुक्तालय यांच्याकडे अपंग आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००५ ते २००८ या कालावधीतील काही माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

"१)  सर्व प्रवर्गाच्या मिळून शाळा चालू करणेकरीता किती शाळांना अनुज्ञाप्ती सन ०५ - ०६ ते आजपर्यंत अनुज्ञाप्त्या नवीन दिल्या आहेत. २)  सर्व प्रवर्गाच्या मिळून २००५-०६ ते आजपर्यंत किती कार्यरत असलेल्या नवीन शाळांना अनुज्ञाप्ती दिली आहे. "

(टीप :- अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतलेला आहे.)

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर देखिल जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक असलेली माहिती पुरविली नाही. या प्रकरणी त्यांनी स्वतः जन माहिती अधिकारी यांच्याशी दिनांक ०४-०२-२००८ रोजी संपर्क साधला होता.  तथापि दोन वर्ष इतका कालावधी व्यपगत होऊनही त्यांना श्री. गायकवाड, आयुक्त, अपंग कल्याण यांनी कोणतीही माहिती पुरविली नाही. त्यांनी स्वतः कर्ज काढून एक एकर जमीन विकत घेऊन बदनापूर येथे अपंग कार्यशाळा सरु करुनही, अपंग कल्याण आयुक्तालयाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने त्यांच्या अर्जाची दखल घेतली नाही.  त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

अपिलार्थीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अथवा अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर कोणीही उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी काहीशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी काहीशी सुसंगत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही दखल न घेऊन व अपिलार्थीस, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना देय असलेल्या माहितीची मागणी करुनही त्यांना कोणतीही माहिती न पुरवून, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे येथे नि:संशयपणे सिध्द होत आहे. सबब सचिव (सामाजिक न्याय) यांना संबंधित जन माहिती अधिकारी, अपंग कल्याण आयुक्तालय यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंग-विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव, सामाजिक न्याय यांना, संबंधित जन माहिती अधिकारी, अपंग कल्याण, आयुक्तालय यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. एम. बी. शिंदे, मु. इतवारा, मोमीन गल्ली, गौतम निवास, जुना जालना

२ जन माहिती अधिकारी तथा आयुक्त, अपंग कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, अपंग कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे -१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सामाजिक न्याय विभाग), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२५१

निर्णय दिनांक ३०-०३-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. शंकर इंगळे,<br>आनंदनगर चौक,<br>नांदेड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर,<br>तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर,<br>तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलाचा निकाल अद्यापपावेतो त्यांना मिळाला नसल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे लहान येथील स्वस्त धान्य दुकानदाराने पूर्ण धान्य उचलून सर्व

गावात नेले नसल्याबाबत आणि रॉकेल दुकानदाराच्या चौकशीबाबत व्यक्तिशः माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अर्धापूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे या प्रकरणी संयुक्तिक होईल असे आयोगास वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अर्धापूर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी राज्य माहिती आयोगाकडे, अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अर्धापूर यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०७-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शंकर इंगळे, आनंदनगर चौक, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८८१

निर्णय दिनांक ३०-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. श्रीकांत सुधाकर डहाळे,<br>७ - रचनाकार कॉलनी, स्टेशन रोड, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, सिल्लोड,<br>तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप आयुक्त, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | उप मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-११-२००८ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी विचाराधीन अपील जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाच्या नाराजीने केले आहे. त्यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत उत्तरे दिली नाहीत आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर योग्य प्रकारे कार्यवाही केली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सिल्लोड शहरातील सर्व्हे नंबर १४/३ मधील १५ मीटर रुंद रस्त्याच्या कामासंदर्भात दिनांक ०१-०१-१९९१ ते दिनांक १०-११-२००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण दहा मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही 'प्रश्नार्थक' स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस देण्याचे प्रथमतः नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-१०-२००७ रोजी निर्णय दिला, तथापि हा निर्णय देण्यापूर्वी दिनांक १५-१०-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे त्यांना आढळल्याने त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व प्राप्त माहितीने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ' ए ' व्दारे, सर्व्हे नंबर १४/३ मधील १५ मीटर रस्ता कोणकोणत्या जमीन मालकाच्या जमिनीमधून जातो, अशी माहिती मागितली असता त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जमीन मालकांची नावे न कळवून सदर रस्ता हा सर्व्हे नंबर १३ व १४ मधून जातो असे कळविले. याचबरोबर अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास असेही

अवगत केले की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ' डी ' आणि ' ई ' व्दारे मागणी केलेली, ' सदरील जमीन, जमीन मालकाकडून केव्हा संपादित केली आणि ती कशाच्या आधारे ताब्यात घेतली व केव्हा ताब्यात घेतली ' या संदर्भातील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची दिली आहे. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ' ए, ' ' डी ' व ' ई ' व्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त व्हावी आणि त्यांना प्रथमतः माहिती नाकारल्याने आणि तदनंतर ६४ दिवस इतक्या विलंबाने माहिती दिल्याने, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई व्हावी, अशी त्यांनी आयोगासमोर अंतीमतः विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १५-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांच्याकडील उपलब्ध माहिती विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ' ए ' व्दारे ' सदरील रस्ता कोणत्या जमीन मालकांच्या जमिनी-मधून जातो ' अशी माहिती मागितली होती, तथापि ही माहिती नगरपरिषेकडे उपलब्ध नव्हती, ती माहिती महसूल विभागाकडे उपलब्ध असणे अपेक्षित असल्याने त्यांनी ही माहिती अपिलार्थीस पुरविली नाही. याचबरोबर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ज्या रस्त्याविषयी माहिती मागितली आहे तो रस्ता तयार केलेल्या आणि सक्षम प्राधिकरणाकडून मंजूरी घेतलेल्या लेआऊटमध्ये असल्यामुळे अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ' ई ' च्या संदर्भात त्यांनी मागितलेली माहिती त्यांना देता येत नाही, तथापि ही माहिती आता महसूल विभागाकडून प्राप्त करुन घेऊन आणि या प्रकरणाशी संबंधित कागदपत्रे पुन्हा तपासून ती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे त्यांनी आयोगासमोर अंतिमतः मान्य केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा वरील परिच्छेदामध्ये केलेला युक्तिवाद आयोगास मान्य करता येण्यासारखा नाही. जर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेला रस्ता ज्या जमीन मालकाच्या जमिनीमधून जातो ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर, त्यांनी या प्रकरणी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मधील तरतुदीचा वापर करुन

अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज सक्षम महसूल प्राधिकरणाकडे, सदरचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे अभिप्रेत होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कार्यवाही केली नाही आणि परिणामी अपिलार्थीस ही माहिती आजतागायत प्राप्त होऊ शकली नाही. अपिलार्थीने मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ' डी ' व्दारे, ' सदरील जमीन जन माहिती अधिकारी यांनी केव्हा संपादित केली, ' अशी माहिती मागितली आहे. या मुद्दयावर अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांनी संबंधित जमीन मालकाकडून रस्ता बांधण्यासाठी जमीन कधी घेतली, ती तारीख अपेक्षित असावी असे दिसून येत आहे. अपिलार्थीस या मुद्दयावर माहिती देताना, सदरील रस्ता हा मंजूर लेआऊटमध्ये दाखविला असल्यामुळे भू-संपादन करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही, अशी अर्धवट माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली आहे. अपिलार्थीस या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी संदर्भित केलेली जमीन, जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे कोणत्या तारखेस घेतली ती माहिती अपेक्षित असताना, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देताना भू-संपादनावर भाष्य केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्दयावर दिलेली माहिती चुकीची आहे. जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे जरी संदर्भित रस्ता हा मान्य लेआऊटमधील असला तरी रस्त्याचे काम प्रत्यक्षात करताना या रस्त्याची मोजणी करुन नंतरच या जमीन मालकाकडून ती हस्तांतरीत करणे अशा प्रकारची सर्वमान्य पध्दत सर्व प्राधिकरणाकडे सर्वसाधारणतः प्रचलीत आहे, त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस या मुद्दयावरील माहिती पुरवावी लागेल. मुद्दा क्रमांक ' ई ' च्या बाबत देखील हाच युक्तिवाद लागू होत असल्याने या मुद्दयावरही जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित

मुद्दयांवरील (' ए, ' ' डी ' व ' ई ') संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात् या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ११-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १३-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेला प्रतिसाद हा पूर्णतः चुकीचा असल्याचे संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. अपिलार्थीस प्रथमतः संबंधित जन माहिती अधिकारी यांनी केवळ अपिलार्थीने ही माहिती प्रश्नार्थक स्वरुपात विचारली आहे म्हणून माहिती द्यावयाचे नाकारले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील सर्व मुद्दयांचे अवलोकन केले असता यातील मुद्दा क्रमांक ' एच ' मधील अंशतः ' - सदरील स्कीम मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडून मंजूरी घेतली आहे काय ? ' - हा भाग वगळता उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने ज्या मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अथवा एखाद्या निर्णयाबाबतची स्पष्टीकरणे मागणारी अशा प्रकारची माहिती जर मागितली असेल तरच ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. केवळ ' प्रश्नार्थक स्वरुपात ' एवढ्या कारणाने अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना टाळता येणार नाही. या प्रकरणी अपिलार्थीस प्रथमतः जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १३-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे चुकीच्या कारणास्तव माहिती देण्याचे नाकारुन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक 'ए,' 'डी ' व 'ई' शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व टपालाव्दारे पुरवावी.

३. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३०-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. श्रीकांत सुधाकर डहाळे, ७ - रचनाकार कॉलनी, स्टेशन रोड, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई - ३० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६५९
निर्णय दिनांक : ३१.०३.२०१०

१. श्री. मिलींद निवृत्तीराव खरात, : अपिलार्थी
रा. सातोना (खु.), ता.परतूर, जि.जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी , : प्रतिवादी
यु.जी.सी.ॲकॅडमिक स्टाफ कॉलेज,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कुलगुरु,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : संचालक,
यु.जी.सी.ॲकॅडमिक स्टाफ कॉलेज,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : डॉ. अफाक खान

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४.०३.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जाची कुलगुरु,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांनी कोणतीही दखल घेतली नाही. त्यांना अपुरी व सदोष माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे विद्यापीठाशी संबंधित काही माहिती एकूण दहा मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०६.११.२००८ रोजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही, परंतु यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २२.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.६००/- इतके त्यांच्या कार्यालयामध्ये धनादेशाद्वारे भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. १९.०१.२००९ रोजी केला. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १६.०२.२००९ रोजी काही माहिती दिली. या माहितीने समाधान न झ ााल्याने व ही माहिती सदोष व अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. १६.०२.२००९ रोजी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती त्यांना सशुल्क उपलब्ध करुन दिली आहे. तथापि उर्वरित माहिती त्यांच्याकडे तयार असूनही अपिलार्थी त्यांच्याकडे ही माहिती घेण्यासाठी कधीही उपस्थित झाले नाहीत. दि. १६.०२.२००९ रोजी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधितच माहिती देऊ केली होती. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यासाठी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ व ६

अंशतः- ('--- त्यांचा उत्पन्नकर भरला आहे काय?') या भागातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मुद्दा क्र. ६ मधील उर्वरित भागावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे. तथापि अपिलार्थी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झालेले नाहीत. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्याकडे तयार असलेली माहिती आयोगास दाखविली. ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सकृतदर्शनी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ शी संबंधित माहिती त्यांना वर उल्लेखिल्याप्रमाणे देय होत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. या परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ५ व ६(अंशतः) हा भाग वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध करुन ठेवावी. अपिलार्थीस असे अवगत करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे, 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

या प्रकरणी आयोगास असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.०२.२००९ रोजी संपूर्ण माहिती दिलेली नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १० मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. त्यापैकी जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.०२.२००९ रोजी अपिलार्थीस फक्त मुद्दा क्र. १ च्या संदर्भात माहिती दिली आहे. उर्वरित

मुद्यांवरील माहिती त्यांनी नंतर तयार करुन ती अपिलार्थीस देऊ केली आहे. या टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडून माहितीपोटीचे शुल्क घेतल्यानंतर त्यांनी पूर्ण दहा मुद्यावरील माहिती देणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अभिप्रेत होते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम अपूर्ण माहिती, ती देखील शुल्क आकारुन दिली असल्यामुळे व संपूर्ण माहिती दिली नसल्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्याकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ६००/- इतके त्यांना परत करावे लागेल. सदर शुल्क त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत परत करावे, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व सदोष माहिती प्राप्त झाल्याचे त्यांचे अभिप्राय नमूद केले आहेत. तथापि अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती ही सदोष कशी आहे, हे स्पष्ट करण्यसासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत अथवा यासंदर्भात त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये कोणतेही भाष्य केलेले नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जातील जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सदोष माहिती दिली हा त्यांचा आक्षेप, आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे देय असलेली मुद्दा क्र. ५ व ६ (अंशतः) वगळता उर्वरित संपूर्ण देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ६००/-इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ३१-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मिलींद निवृत्तीराव खरात,मु.पो. सातोना (खुर्द), ता.परतूर, जि.जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा संचालक,यु.जी.सी.ॲकॅडमिक स्टाफ कॉलेज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६६०
निर्णय दिनांक : ३१.०३.२०१०

१. श्री. सूर्यवंशी अशोक विठ्ठलराव, रा.होंडाळा, ता.मुखेड, जि.जालना. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, ग्रामीण निवासी मूकबधिर विद्यालय, नेहरुनगर, ता.कंधार, जि.नांदेड. : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.०३.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मूळ अर्जास ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र जोडूनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काची मागणी केली. 'माहिती पाठवत आहोत', असे नमूद करुन अपिलार्थीची दिशाभूल केली. या कारणास्तव व माहिती मिळाल्यावर जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, ग्रामीण निवासी मूकबधिर विद्यालय, कंधार यांच्याकडे त्यांच्या शाळेविषयी, सन २००० ते २००७ या कालावधीतील काही माहिती एकूण दहा मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात आहे. अपिलार्थीने सदरचा अर्ज जन माहिती

अधिकारी यांच्याकडे सादर करताना ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले व श्री. सुर्यवंशी विठ्ठल केरबा या दारिद्रयरेषेखालील व्यक्तीच्या प्रमाणपत्राची प्रत व त्यांच्या कुटुंबाच्या शिधापत्रिकेची झेरॉक्स प्रत या अर्जासोबत जोडली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०३.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अनुदान नसल्यामुळे अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २०००/- इतके भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे दि. १२.०१.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.०२.२००९ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती देऊ केली असता, अपिलार्थीने ही माहिती स्वीकारण्याचे नाकारले. आज देखील त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती स्वतःसोबत आणलेली आहे. या माहितीच्या झेरॉक्स प्रती काढण्यासाठी त्यांच्याकडे आवश्यक ते अनुदान (निधी) नसल्यामुळे या माहितीच्या झेरॉक्स प्रती ते पुरवू शकत नसल्याचे त्यांनी आयोगास स्पष्ट केले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्यासाठी ते अपिलार्थीच्या घरी गेले असता, अपिलार्थीने माहितीचे अवलोकन तर केले नाही परंतु अपिलार्थीने त्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून रु.१०,०००/- इतक्या रकमेची मागणी केली व ही रक्कम अपिलार्थीस दिल्यास, 'माहिती प्राप्त झाली',

असे लिहून देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आश्वासित केले. अपिलार्थी हे तालुक्यातील सर्व शाळांकडे अशाप्रकारची विस्तृत व्याप्ती असलेल्या माहितीची मागणी करुन नंतर त्यांच्याकडे पैशांची मागणी करीत असतात.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठे असल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम माहिती मागविताना केलेल्या अर्जासोबत त्यांचे स्वतःचे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र न जोडता दुसऱ्या व्यक्तीच्या नावाचे प्रमाणपत्र त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जासोबत जोडले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती इतकी मोठी आहे की, ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आर्थिकदृष्टया परवडत नाही. या परिस्थितीत अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी,पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची तपासणी करावी. तदनंतर या कागदपत्रातून अपिलार्थीस ज्या कागदपत्रांच्या प्रती आवश्यक आहेत, त्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विनामूल्य पुरवाव्यात. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अत्यावश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीच्या या तपासणीसाठी कोणतेही मूल्य आकारु नये.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर नाकारलेले नाही. हे पाहता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगाकडे केलेली विनंती आयोग अमान्य करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सूर्यवंशी अशोक विठ्ठलराव,मु.होंडाळा, पो.दापका (राजा),ता.मुखेड, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,ग्रामीण निवासी मूकबधिर विद्यालय,नेहरुनगर, ता.कंधार, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी,गट-अ, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६६१
निर्णय दिनांक : ३१.०३.२०१०

१. श्री. अभिमन्यु किसन झांजे, : अपिलार्थी
रा. केकत सारणी, ता.केज, जि.बीड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत,केकत सारणी,ता.केज, जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, केज, जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.०३.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे शास्ती लावावी व अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत केकत सारणी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. ०१.०१.१९९५ ते ०३.११.२००८ या कालावधीतील काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने

मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीत झालेल्या ग्रामसभेच्या संख्या, प्रत्येक ग्रामसभेच्या ठरावाची प्रत, या कालावधीत कोणते सरपंच व ग्रामसेवक कार्यरत होते त्यांची यादी, या कालावधीमध्ये झालेल्या लेखा परिक्षणाच्या प्रती, लेखा परिक्षण करणाऱ्याचे नाव व दिनांक, या कालावधीमध्ये पंचायत समिती, जिल्हा परिषदमार्फत किती विहिरी,बोअर मंजूर झाल्या, त्यापैकी किती विहिरी व बोअर कोणत्या ठिकाणी, कोणत्या खोलीच्या व किती रुंदीच्या आहेत व या कालावधीमध्ये विद्युत मोटार किती वेळेस नादुरुस्त होत्या, त्या दुरुस्तीसाठी कोणत्या दुकानदाराकडे नेल्या त्यांचे नाव, किती खर्च आला व तो खर्च कोणत्या ग्रामसभेत मंजूर करण्यात आला, या ग्रामसभेच्या प्रती - या माहितीचा समावेश होता.

अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १९.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १९.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती, केज,जि.बीड यांनी प्रथमतः सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, केज,जि.बीड यांनी अपिलार्थीच्या दि. १९.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, केज,जि.बीड यांनी अपिलार्थीच्या दि.१९.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अभिमन्यु किसन झांजे,रा. केकत सारणी, ता.केज, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत, केकत सारणी, ता.केज, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, केज, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६६२
निर्णय दिनांक : ३१.०३.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. विष्णू भानुदास चौरे,<br>रा.सोनेगाव,ता.पाटोदा,जि.बीड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, पाटोदा,जि.बीड. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, बीड | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, पाटोदा,जि.बीड
जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पाटोदा,जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३.०३.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ व ६ शी संबंधित माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण सहा मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १५.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन

अपिलीय अधिकारी यांनी दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस मोफत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. या नंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील पंचायत समितीस्तरावरील माहिती दि. १५.०१.२००९ रोजी पुरविली तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०३.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि विस्तार अधिकारी (पं.) उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती, पाटोदा,जि.बीड यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस ग्रामपंचायत स्तरावरील व पंचायत समिती स्तरावरील माहिती अनुक्रमे दि.०७.१२.२००८ व १५.०१.२००९ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्यापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीच्या पोचसहीचा पुरावा आयोगास सादर केला. या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत,केकतसारणी यांना या प्रकरणाची कोणतीही माहिती नसल्याचे आयोगास आढळून आले आहे.

वरील घटनाक्रम, विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती, पाटोदा,जि.बीड यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ग्रामपंचायत स्तरावरील मुद्दा क्र. ३,५ व ६ शी संबंधित माहिती दि. ०७.१२.२००८ रोजी दिली आहे आणि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२ व ४ शी संबंधित पंचायत समिती स्तरावरील माहिती दि. १५.०१.२००९ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये,जी माहिती मागितली आहे (अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ व ६) त्या माहितीचा समावेश आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी या मुद्यावरील दिलेली माहिती सकृतदर्शनी त्यांच्या मागणीशी सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले आहे.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मुद्दा क्र. ३ द्वारे, "मौ. सोनेगाव येथील मालमत्ता रजिस्टर नोंद क्र.१२५,१२६,१२७ ते १६१ पर्यंत घेतलेल्या नोंदीच्या संदर्भातील आदेशाच्या प्रती",

अशा माहितीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली आहे. तथापि असे कोणतेही आदेश जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या वरिष्ठांकडून प्राप्त झाले नसल्याचे त्यांनी अपिलार्थीस दि. ०७.१२.२००८ रोजी कळविले आहे. मुद्दा क्र. ६ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे,"नं.१५४ वर खाडाखोड केली, ती कोणत्या आदेशाने किंवा ठरावाद्वारे केली आहे, त्या आदेश किंवा ठरावाची प्रत", अशी माहिती मागितली आहे. या मुद्यासंदर्भात सदरची खाडाखोड कोणाच्याही आदेश किंवा ठरावाने केली गेली नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०७.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे, असे आयोगास या प्रकरणी आढळून आले आहे.अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व तिची सद्यस्थिती पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.१२.२००८ रोजी, अपिलार्थीस आवश्यक असलेली व त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेली माहिती त्यांना प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. प्राप्त माहितीच्या दर्जाबाबत युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाहीत किंवा यासंदर्भात कोणत्याही पत्रव्यवहाराद्वारे त्यांनी कोणतीही तक्रार केलेली नाही, हे पाहता, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी समाधानकारकरित्या उपलब्ध करुन दिली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २१.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जास तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाटोदा,जि.बीड यांनी अधिनियमाद्वारे (कलम ७(अ)) विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २०(२) च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाटोदा यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाटोदा यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१-०३-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विष्णू भानुदास चौरे,रा.सोनेगाव,पो. दासखेड,ता.पाटोदा,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, पाटोदा,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, पाटोदा,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२९११
निर्णय दिनांक ३१/०३/२०१०

| | | |
|---|---|---|
| १ श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके,<br>रा.आलमगांव, ता.अंबड, जि.जालना<br>श्री.ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे,<br>रा.पावसे पांगरी, ता.अंबड, जि.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>कृषी कार्यालय, घनसावंगी, जि.जालना<br>२. जन अपिलीय अधिकारी तथा<br>कृषी अधिकारी,<br>कृषी कार्यालय, घनसावंगी, जि.जालना | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके व श्री.ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०४.०५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दि. १९.०४.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि. २६.०५.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २१८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्रीमंतराव विश्वनाथराव शेळके, रा.आलमगांव, ता.अंबड, जि.जालना.
२. श्री.ज्ञानदेव गणपतराव सुबुगडे, रा.पावसे पांगरी, ता.अंबड, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२९१२
निर्णय दिनांक ३१/०३/२०१०

१ श्री. विलासराव विठ्ठलराव खरात, : अपिलार्थी
रा.अंबड, जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबड, जि.जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबड, जि.जालना

**<u>निर्णय</u>**

श्री. विलासराव विठ्ठलराव खरात यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०४.०५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने माहितीच्या अर्जासंबंधी दि. २५.०५.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपिलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २१९ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर

केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३१/०३/२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विलासराव विठ्ठलराव खरात, रा.शिवाजी हाऊसिंग सोसायटी, बसस्टँडच्या बाजूला, अंबड, ता.अंबड, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६५५

निर्णय दिनांक ३१-०३-२०१०

१ श्री. ज्ञानेश्वर नामदेव खरात, : अपिलार्थी
रा. आंबेडकर नगर, गल्ली नं. ७, सिडको एन - ७,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय (रोहयो), खुलताबाद,
जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
वनसंरक्षक अधिकारी, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो), खुलताबाद, जि. औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : सहायक वनसंरक्षक, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आयोगासमोर उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ३१-०३-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये त्यांनी विचाराधीन अपील क्रमांक ६५५/२००९ हे, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्ण माहिती मिळाल्यामुळे, ते मागे घेत असल्याचे नमूद केले आहे. याच बरोबर त्यांनी या अर्जामध्ये विचाराधीन अपील रद्द करण्याची विनंती आयोगास केली आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेले त्यांचे विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ६५५/२००९, दिनांक ३०-०३-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३१-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. ज्ञानेश्वर नामदेव खरात, आंबेडकर नगर, गल्ली नं. ७, सिडको एन - ७, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो), खुलताबाद, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, औरंगाबाद यांना या निकाल-पत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६५६

निर्णय दिनांक ३१-०३-२०१०

१ श्री. किशोर भिकनसिंग राजपूत, : अपिलार्थी
रा. एन-६, सिडको, ई-२३/१०, संभाजी कॉलनी, नवीन
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, सेंट लॉरेन्स हायस्कूल (मराठी माध्यम),
सिडको, नवीन औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मुख्याध्यापक, सेंट लॉरेन्स हायस्कूल (मराठी माध्यम), सिडको, औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या शाळेविषयी विस्तृत व्याप्ती असलेली काही माहिती एकूण २० मुद्यांव्दारे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक

१२-१२-२००८ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे या संदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या संदर्भात दिलेला निर्णय आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रामध्ये समाविष्ट नाही. अशाप्रकारे अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद तथा जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १२-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. सबब शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १२-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक १२-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३१-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. किशोर भिकनसिंग राजपूत, एन-६, सिडको, ई-२३/१०, संभाजी कॉलनी, नवीन औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सेंट लॉरेन्स हायस्कूल (मराठी माध्यम), एन-१, सिडको, नवीन औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६५७

निर्णय दिनांक ३१-०३-२०१०

१ श्री. डी. ए. देशमुख, : अपिलार्थी
संपादक, साप्ताहिक जालना - शक्ती, देहडकर वाडी, जुना
जालना, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी, पंचायत समिती जाफ्राबाद,
जि. जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०३-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ३०-०३-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये

अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून या प्रकरणी त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्यामुळे, ते विचाराधीन अपील मागे घेत असल्याचे नमूद केले आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेले त्यांचे द्वितीय अपील आता मागे घेतले असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक ६५७/२००९, दिनांक २४-०३-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३१-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. डी. ए. देशमुख, संपादक, साप्ताहिक जालना - शक्ती, देहडकर वाडी, जुना जालना, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६५८

निर्णय दिनांक ३१-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अजित किसनलालजी कोठारी,<br>घर नं. २-२०-१५, पारसी गल्ली, बेंझजी रोड, काद्राबाद,<br>जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, लेखा विभाग, नगरपरिषद जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगरपरिषद जालना | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कर अधीक्षक, नगर परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक १४-११-२००८ रोजी मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-११-२००८ रोजी पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी दिनांक १५-१२-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. या अपिलाच्या दिनांक २३-१२-२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे .

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक ०१-०१-१९९० ते ३१-०३-२००७ या कालावधीतील लेखा परिक्षण अहवालावरील आक्षेपाची छायांकित प्रत व इतर अनुषंगिक मुद्यांवर अशी एकूण सहा मुद्यांद्वारे काही माहिती अति शिघ्र टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-११-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती व्यक्तिशः हस्तांतरित केली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २६-११-२००८ रोजी प्राप्त झालेल्या माहितीमध्ये त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहितीचा समावेश नाही. या मुद्याद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक ०१-०१-१९९० ते ३१-०३-२००७ या कालावधीतील लेखा परिक्षण अहवालावरील आक्षेपाची छायांकित प्रत मागितली होती. तथापि या मुद्यावरील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो अप्राप्त आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांच्या कार्यालयामार्फत होणाऱ्या खर्चाचे लेखा परिक्षण, स्थानिक निधी परिक्षण, जालना हे नियमितपणे करीत असतात. या लेखा निधीच्या लेखा परिक्षण अहवालावर परत त्रयस्थ पक्षाने पुन्हा ऑडीट करणे अशाप्रकारची कार्यपध्दत त्यांच्याकडे प्रचलित नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती ते देऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १४-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे एकूण ६ मुद्यांवर माहिती मागविली होती. यापैकी मुद्दा क्रमांक ६ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, 'त्यांच्या कार्यालयात माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे नाव व पत्ता दर्शविणारा फलक नगर परिषदेच्या कार्यालयात लावण्यात आलेला आहे का,' अशी माहिती मागविली होती. या मुद्याद्वारे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित आहेत, असे दिसून येते. अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट नसल्याने, अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. उर्वरित ५ मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, त्यांनी अपिलार्थीस मुद्देनिहाय माहिती न देता त्यांनी फक्त मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती पुरविल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीशिवाय त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, ३, ४ आणि ५ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, ३,४ व ५ शी संबंधित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत मुद्देनिहाय व विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास त्यांच्याकडील लेखा

परिक्षणाच्या अहवालाची पध्दत विशद केली आहे. त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या मुद्यासंदर्भात वरील युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, ३, ४ व ५ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत मुद्देनिहाय व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३१-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अजित किसनलालजी कोठारी, घर नं. २-२०-१५, पारसी गल्ली, बेंझजी रोड, काद्राबाद, जालना

२ जन माहिती अधिकारी तथा कर अधीक्षक, नगर परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६६३

निर्णय दिनांक ३१-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुधाकर देविदासराव मोहनाळकर,<br>रा. दास निवास, लातूर रोड, चाकूर, तालुका चाकूर,<br>जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, चाकूर,<br>तालुका चाकूर, जिल्हा लातूर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक भूमि अभिलेख, लातूर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, निमताना मोजणी मोर क्रमांक १/९९ मौजे मोहनाळ, तालुका चाकूर या प्रकरणाशी संबंधित काही माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या प्रकरणामध्ये मोजणीसाठी पाठविलेल्या नोटीसची प्रत, नोटीस मिळालेल्या पत्राची पोच पावती, सर्व्हेअरने केलेला पंचनामा, श्री. रामधने यांनी दिनांक ३०-०८-२००० रोजी केलेल्या पंचनाम्याची प्रत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या अभिलेख्यामध्ये समाविष्ट आहे ते अभिलेखे दिनांक २५-११-२००८ रोजी जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, लातूर यांच्याकडे पाठविल्याने ती माहिती अपिलार्थीस देता येत नाही, असे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, लातूर यांच्याकडे दिनांक ०५-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय त्यांना प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पुरविली आहे, परंतु त्यांनी अपिलार्थीस निश्चितपणे माहिती कधी पुरविली आणि कोणती पुरविली हे ते आयोगास समाधानकारकरित्या स्पष्ट करु शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता विनामूल्य द्यावी लागेल. अपिलार्थीच्या दिनांक १७-११-२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-११-२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या अभिलेख्यावर

उपलब्ध आहे ते अभिलेखे दिनांक २५-११-२००८ रोजी जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, लातूर यांच्याकडे पाठविल्याचे कळवून केवळ या कारणास्तव अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. यानंतर जन माहिती अधिका-याने अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार कार्यवाही करणे सर्वसाधारण परिस्थितीत अपेक्षित होते, तथापि या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १७-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जावर दिनांक २५-११-२००८ पर्यंत कोणतीही कार्यवाही न करुन संबंधित नस्ती वरिष्ठांकडे पाठविल्यानंतर लागलीच दुस-या दिवशी अपिलार्थीस ही माहिती त्यांना देता येणे शक्य नसल्याचे त्यांनी अपिलार्थीस कळविले. यावरुन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळण्याकरिता दिनांक २५-११-२००८ पर्यंत वाट पाहिली आणि दिनांक २६-११-२००८ रोजी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती वरिष्ठांकडे पाठविल्याचे अपिलार्थीस कळविले. संबंधित जन माहिती अधिकारी यांची ही कृती, म्हणजे त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी केलेली हेतूपुरस्सर टाळाटाळ आहे, असे म्हणता येईल. आज देखील आयोगासमोर त्यांना, त्यांनी अपिलार्थीस पुरविलेली कथित माहिती दाखविता आली नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती अद्यापपावेतो दिली नसल्याचा आयोग निष्कर्ष काढत आहे व जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती देण्याचे हेतुपुरःस्सर टाळून आणि अपिलार्थीच्या मूळ अर्जावर अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही न करुन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. सबब, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाव्दारे पुरवावी.

३. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३१-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुधाकर देविदासराव मोहनाळकर, रा. दास निवास, लातूर रोड, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, लातूर यांना या निकालपत्रा-तील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवनासमोर, साधुवासवाणी चौक, रेल्वेस्टेशन जवळ, पुणे यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६६४

निर्णय दिनांक ३१-०३-२०१०

१ श्री. शेख फैजमहंम्मद नूरमहंम्मद, : अपिलार्थी
रा. घर क्रमांक ३-१-४२, मुहंम्मदन चौक, चर्च रोड,
उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या स्वतःच्या दिनांक ३०-०९-१९८६ ते १९-०२-२००८ या कालावधीशी संबंधित वैयक्तिक संचिकेच्या छायाप्रती आणि त्यांना, त्यांचे वेतन व भत्ते अदा करण्यास विलंब झाला आहे काय ? झाला असल्यास त्याची कारणे काय आहेत ? शासकीय

कर्तव्य पार पाडताना होणा-या विलंबास, प्रतिबंध अधिनियम २००५ प्रमाणे विलंबाची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय ? , अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६०२ इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेनुसार अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा डी. डी. व्दारे दिनांक २४-०३-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी दिनांक २६-०५-२००८ रोजी काही माहिती पुरविली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०८-२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०१-०९-२००८ पूर्वी संपूर्ण माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०८-२००८ रोजी उर्वरित माहिती दिली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आवश्यक असून त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून प्रलंबीत वेतन देण्यात आलेले नाही. सदर वेतन त्यांना देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे. त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती त्यांना दोन टप्प्यामध्ये, प्रथमतः दिनांक २६-०५-२००८ व तदनंतर दिनांक ३०-०८-२००८ रोजी प्राप्त झाल्याचे

आयोगासमोर कबूल केले. त्यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, त्यांनी प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे मनीऑर्डरने शुल्क पाठविले असता सदर मनीऑर्डर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्वीकारली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस दोन टप्प्यामध्ये माहिती पुरविली असून प्रथमतः त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस, त्यांच्याकडून माहितीपोटीचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर दिनांक २६-०५-२००८ रोजी व तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०८-२००८ रोजी आदेशित केल्याप्रमाणे दिनांक ३०-०८-२००८ रोजी त्यांना पुरविली आहे. अपिलार्थीस दोन टप्प्यामध्ये माहिती देण्याची कारणे आयोगास विषद करताना त्यांनी असे कारण सांगितले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती अभिलेख कक्षामध्ये वर्ग झाली होती. अभिलेख कक्षाकडून ही माहिती प्राप्त होण्यासाठी त्यांना विलंब लागला. अंतिमतः अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती देण्यात आली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण दोन मुद्दयाव्दारे माहिती मागितली आहे. त्यापैकी पहिल्या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने त्यांच्या स्वतःच्या वैयक्तिक संचिकेची छायाप्रत व दुस-या मुद्दयाव्दारे त्यांचे वेतन व भत्ते प्रदान होण्यासाठी लागलेल्या विलंबाची कारणे आणि त्यांना विलंबाने वेतन व भत्ते अदा केल्याबद्दल विलंबाची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय ? अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या मुद्दा क्रमांक १ मधील त्यांच्या वैयक्तिक नस्तीची छायाप्रत ही माहिती वगळता, उर्वरित मुद्दा क्रमांक २ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना देय होत नाही. कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाच्या अथवा त्यांच्या निर्णयाची कारणे व स्पष्टीकरण मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या कृतीचे समर्थन करणारे स्पष्टीकरण देणे अशा प्रकारची प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत नाही. अधिनियमामध्ये अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास, जन माहिती अधिकारी यांनी देण्यासंदर्भात, अधिनियमातील तरतुदीनुसार निर्णय घेणे इतपत सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे, त्यामुळे मूळात अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना देय होत नाही. त्यांच्या मूळ अर्जातील देय माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक २६-०५-२००८ व दिनांक ३०-०८-२००८ रोजी सशुल्क पुरविली आहे, त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार एकदा अर्जदाराने माहितीसाठीचे संपूर्ण शुल्क भरल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ च्या तरतदीनुसार पूर्ण माहिती देणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस सुरुवातीला माहिती देताना, केवळ अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अभिलेख कक्षामध्ये असल्यामुळे ती अपिलार्थीस सुरुवातीला देता आली नाही, हा जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद आयोग अमान्य करत आहे. एकदा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सूचनेनुसार त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यानंतर, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस कोणत्याही परिस्थितीत संपूर्ण माहिती देणे हे त्यांचे कर्तव्य आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क ज्या पत्राने कळविले त्या पत्राचा दिनांक व अपिलार्थीने शुल्क भरणा केलेला दिनांक यातील फरक लक्षात घेता, अधिनियमातील कलम ७ (३) (क) च्या तरतुदीनुसार या प्रकरणी अपिलार्थीस दिनांक ११-०५-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क माहिती देय होत होती, तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस टप्प्याटप्प्याने, प्रथमतः दिनांक २६-०५-२००८ रोजी व तदनंतर दिनांक ३०-०८-२००८ रोजी, अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा

कालावधी व्यपगत झाल्यानंतर माहिती दिली असल्यामुळे, आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून त्यांनी या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ६०२ इतके त्यांना अपिलार्थीस परत करावे लागेल. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ६०२ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये राज्य माहिती आयोगाकडे त्यांच्या प्रलंबीत वेतना-संदर्भात आयोगाने जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. यासंदर्भात अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अशा प्रकारे सार्वजनिक प्राधिकरणास प्रशासकीय निर्णय देण्याचे आदेशित करण्याची अधिकारिता आयोगास नसल्यामुळे, अपिलार्थीची त्यांच्या थकीत वेतनासंदर्भातील विनंती आयोगास मान्य करता येण्यासारखी नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटीचे दिनांक स्वीकारलेले शुल्क रुपये ६०२ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३१-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख फैजमहंम्मद नूरमहंम्मद, रा. घर क्रमांक ३-१-४२, मुहंम्मदन चौक, चर्च रोड, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६६५

निर्णय दिनांक ३१-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गुलाब किशनराव पाटील,<br>रा. सितारामनगर,<br>लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)<br>उपविभाग, अहमदपूर, जिल्हा लातूर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)<br>विभाग, लातूर | : | प्रतिवादी |

त्रयस्थ पक्ष : श्री. आर. क्यू. कायमी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक २९-०२-२००८ रोजी माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला असताना त्यांना माहिती मिळाली नाही व त्यांच्या दिनांक ०९-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न करता जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपील एकतर्फा निकाली काढल्याने त्यांनी विचाराधीन अपील

आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. आर. क्यू. कायमी, शाखा अभियंता यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात रुजू झाल्यानंतर, रोजगार हमी योजनेअंतर्गत केलेल्या कामावरील मजुरांच्या हजेरीपटाच्या प्रतीची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३९३१ इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता, अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०२-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेले प्रथम अपील मुदतबाह्य झाले असल्याने आणि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने प्रथम अपील करताना विलंबाची कोणतीही कारणमिमांसा सादर न केल्यामुळे अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कळविले होते, तथापि या

शुल्काचा भरणा अपिलार्थीने त्यांच्याकडे न केल्यामुळे ते अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरवू शकले नाहीत. या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती आजही त्यांच्याकडे तयार आहे आणि आजही ही माहिती ते अपिलार्थीस सशुल्क देण्यास केव्हाही तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०२-२००८ रोजी प्रथम अर्ज केल्यानंतर, या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांच्याकडे भरण्याची सूचना दिली. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि हे अपील करत असताना त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) मधील तरतुदीची दखल घेतली नाही. अधिनियमातील कलम १९ (१) मध्ये अशी तरतूद आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडील प्राप्त झालेल्या माहितीने जर अर्जदाराचे समाधान झाले नाही तर हा निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून तीस दिवसाच्या आत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करता येईल. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०४-२००८ रोजी अगर तत्पूर्वी प्रथम अपील करणे हे अधिनियमातील तरतूदीप्रमाणे योग्य ठरले असते, परंतु अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांचे प्रथम अपील, अधिनियमाव्दारे प्रथम अपिलासाठी विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर केले आहे. या विलंबाची कोणतीही कारणे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपील अर्जामध्ये नमूद केलेली नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या, अशा प्रकारच्या विलंबाने प्रथम अपील सादर करण्याच्या कृतीव्दारे, अधिनियमातील कलम १९ (१) चा भंग केला आहे. या सर्वांचा परिणाम, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले आहे. जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती अधिनियमातील तरतुदीप्रमाणे योग्य आहे, त्यामुळे त्यांच्या निर्णयामध्ये बदल करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास उरत नाही. सबब,

अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३१-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गुलाब किसनराव पाटील, रा. सितारामनगर, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/६६६

निर्णय दिनांक ३१-०३-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मनोज बाबुराव शिंदे,<br>रा. मोतीनगर, रिंग रोड,<br>लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>नगरपरिषद, लातूर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर

त्रयस्थ पक्ष : ॲड्. शोभा दुड्डे (गोमारे)

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष " ॲड्. शोभा दुड्डे (गोमारे) या नगरसेविकेने सन २००० पासून दिनांक २४-१०-२००८ पर्यंत दिलेल्या सर्व अर्जांच्या, माहिती अधिकार अर्जांच्या व लेटर हेडवर दिलेल्या सर्व अर्जांच्या छायांकीत प्रती आणि यावर नगरपरिषदेने केलेल्या कार्यवाहीच्या

माहितीच्या व उत्तरांच्या छायांकीत प्रती, " अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याचे त्यांना कळविले व त्रयस्थ पक्षाची लेखी संमती आल्यानंतर अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे आश्वासित केले आणि अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज तात्पुरता निकाली काढला. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची असल्याचे कारण दर्शवून, अपिलार्थीचे अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०३-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी, त्रयस्थ पक्ष गैरहजर व अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना प्रथमतः जन माहिती अधिकारी यांनी चुकीचा प्रतिसाद देऊन, त्यांनी मागणी केलेली माहिती राजकीय दबावाखाली येऊन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली नाही आणि त्यांच्या अर्जाची दखलही घेतली नाही. याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी सुनावणी न घेताच, अपील अर्ज मोघम असल्यामुळे त्यांचे प्रथम अपील फेटाळावयास हवे होते, परंतु त्यांनी तीन वेळा सुनावणीचे पत्र पाठवून दिनांक २९-१२-२००८ रोजी सुनावणी घेतली. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २७-०२-२००९ रोजी पुरविलेली माहिती ही अर्धवट व मोघम स्वरुपाची आहे. तथापि ही माहिती अपिलार्थीस अर्धवट का वाटते असे अपिलार्थीस आयोगाने विचारले

असता, त्यांना त्याचे स्पष्टीकरण आयोगास देता आले नाही. त्यांनी यासंदर्भात आपला लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला. या युक्तिवादामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे आणि त्यांना मानसिक व शारीरिक त्रासापोटी झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी, अशी विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-१२-२००८ रोजीच्या निर्णयाव्दारे अपिलार्थीचे अपील फेटाळले असतानाही त्यांनी दिनांक २७-०२-२००९ रोजी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन दिली आहे. अपिलार्थीस त्यांनी दिलेली माहिती एकूण १६१ पृष्ठांची असून प्राप्त माहितीची अपिलार्थीची पोच त्यांनी आयोगास सादर केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरीही, या माहितीचे स्वरुप सार्वजनिक असल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय नव्हता, तथापि त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०७-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याचे दर्शवून अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले. अपिलार्थीचा अर्ज आल्यानंतर त्यांनी अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीनुसार यासंदर्भात त्रयस्थ पक्षाशी संपर्क साधण्यासाठी कोणतीही कार्यवाही केली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देताना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे. जन अपिलीय अधिकारी यांचा अपिलार्थीच्या मूळ अर्जावरील हा निर्णय चुकीचा आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये विशिष्ट स्वरुपाची व अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत अशी माहिती मागविली आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या व प्रथम अपील अर्जावर माहिती उपलब्ध करुन न देता नंतर दिनांक २७-०२-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती पुरविली आहे.

परंतु प्राप्त माहिती ही अपिलार्थीस अर्धवट असल्याचे वाटत आहे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे कोणती माहिती देणे बाकी आहे, याची अपिलार्थीस विचारणा केली असता, अपिलार्थी आयोगास समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत. खुद्द अपिलार्थीलाच अद्याप जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती यासंदर्भात येणे बाकी आहे हे ठाऊक नसल्याने, आवश्यक त्या सबळ पुराव्याअभावी अपिलार्थीचा, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अर्धवट माहिती दिली हा युक्तिवाद, आयोगास मान्य करता येणार नाही. अद्यापही त्यांना जर जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अर्धवट आहे असे वाटत असेल तर त्यांनी, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना अद्यापपावेतो जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणे बाकी आहे त्या माहितीकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वतंत्रपणे अर्ज करावा, असे अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे, तथापि या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असल्यामुळे, अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची विनंती आयोग अमान्य करत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ३१-०३-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मनोज बाबुराव शिंदे, रा. मोतीनगर, रिंग रोड, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.